भारतवर्ष २० आदा

श्री

आदा

शिवाजीची वंशावळ : अपूर्ण सं

गोविंदपंत बुंदेल्यांची कैफियत

अमात्य बावडेकर यांची कैफियत

४ छत्रपती संभाजी महाराजांचे पत्र

मराठ्यांची रियासत - अ

५ प्रतापसिंह चरित्र - संपूर्ण

उत्तर हिंदुस्थानचे प्राचीन देशविभाग

अपूर्ण

शिवाजीची वंशावळ.

ऐतिहासिक चर्चा.

ह्या लेखास आरंभीं जोडलेली वंशावळ, करमाळें जिल्हा सोलापूर येथील रावरंभा निंबाळकराच्या वंशांतील कोणा पुरुषाजवळ होती. ती आम्च्या एका मित्रानें पंधरा वर्षांपूर्वी नकलेच्या रूपानें पाठविली.

ह्या अगर कोणत्याही वंशावळींत पाहिलें तर बाबाजी ऊर्फ शिवजी, शिवछत्रपतीचा पणजा ह्याच्या मागील शिवाजीच्या पूर्वजांचीं नांवें एकमेळाचीं सांपडत नाहींत.

ह्या करमाळ्याच्या वंशावळींत मूळ पुरुष बरडजी दिला आहे. चिटणीस ज्याला बरबटजी म्हणतात, व भारतवर्षाच्या पांचव्या अंकांत प्रतापसिंह महाराज सातारकर ह्यांनीं तयार केलेली जी वंशावळ दिली आहे तींत दिलेला बरहटजी तो व हा बरडजी एकच. चिटणिसांची व महाराजांची ह्या दोन वंशावळी खेरीज करून रा० रा० बंगदेशनिवासी महाराष्ट्रीय बंधु देऊसकर यांनीं आपण स्वतः तयार केलेल्या वंशावळीसह ज्या इतर वंशावळी (टॉड, भिडे व साने यांच्या) अंक ४ मध्यें दिल्या आहेत त्यांपैकीं कोणतींतच हें नांव आढळत नाहीं. तथापि विश्वसनीय अशा दोन वंशावळींत तें आढळत आहे म्हणून ह्या वंशावळींतील बरडजी हा शिवछत्रपतीच्या पूर्वजांपैकीं एक आहे असें म्हणावें लागतें. जो बनबीर उदेसिंगाशीं लढून पराजय पावून दक्षिणेंत आला त्याच्या नांवाशीं " बरबट " " बरहट " व " बरड " ह्यां शब्दांचें साम्य दिसतें. हें खरें ठरल्यास बुंदेल्याच्या लिहिण्यांत कांहीं तथ्य आहे असें ठरेल. आमच्या वंशावळींत बाबाजी (बाबाजी ऊर्फ शिवजी)चा भाऊ परसोजी म्हणून एक दिला आहे व त्याच्या नांवापुढें " ह्याचा वंश दक्षिणेंत गुप्त " असा शेरा आहे. परसोजी हें नांव नागपूरकर भोंसल्यांत आढळतें. ह्यावरून हाच गुप्त असलेला वंश पुढें नागपूरकरांच्या रूपानें प्रसिद्ध झाला असावा असें म्हणण्यासही जागा सांपडत आहे.

बरडजीच्या नांवापुढें आमच्या वंशावळींत, “ मूळ मिरासी हिंदुस्थान, चितोड, सोमवंशी क्षत्रिय हे बेदरशहा बादशहाचे कारकीर्दींत सार्व-भौमाचे हुकुमानें दक्षिण देशीं आले. हे मूळ पुरुष त्या काळीं इकडे बंडें होत होतीं सबब व्यंग आणिलें होतें ” असा शेरा आहे. ह्यावरून हा मूळ पुरुष बनबीर असावा असें म्हणण्याकडे मन वळतें.

परंतु येथें संशय घेण्यास एक जागा आहे ती अशी कीं, नागपूरकर भोंसल्यांच्या तर्फेनें जर ही वंशावळ प्रथम तयार झाली असेल तर सातारकर व आपण एकच असें दाखविण्याचा यत्न झाला नसेल असें नाहीं. मराठे वतनदार लोकांत खऱ्या वंशावळी हुडकून काढण्याच्या कामीं मोठमोठ्या शहाण्यांना हात टेकण्याची पाळी वारंवार आल्याचे बहुत दाखले आहेत. जेव्हां जेव्हां राज्यक्रांतीचे प्रसंग आले आहेत तेव्हां तेव्हां भलत्याच वंशांतील लोक भलत्या वंशाशीं चिकटून वतनांत भागीदार झाले आहेत. मराठे लोकांत एकच आडनांव असलें कीं पुरे; लागलीच एकादा लेकवळाही—तो हुशार व बहुश्रुत असला म्हणजे—दुसऱ्या नामांकित व थोर कुळाशीं आपल्या वंशास जोडणारी आख्यायिका उत्पन्न करितो; व तशांत त्यास काळ अनुकूळ असल्यास श्रेष्ठ प्रतीचे रीतरिवाज आपल्या घराण्यांत सुरू करितो व असेंच कांहीं पिढ्या चालल्यास तो उत्तमांत सरता होतो. ब्राम्हण लोकांतही आपलें व दुसऱ्याचें गोत्रैक्य आहे येवढ्यावरच कित्येक धूर्त, वतनदार घराण्याशीं जडले आहेत; अशौचादि मात्र धरीत नाहींत, कां तर आमच्या पिढ्या तुटल्या आहेत असें सांगतात !!

ह्यावरून वंशावळींत भानगडी कशा शिरतात तें लक्ष्यांत येईल. शिवछत्रतीच्या वंशावळीची वाटाघाट प्रथम ज्या वेळीं झाली, ती वेळ, शिवछत्रपतीच्या राज्याभिषेकाची होय. धर्मशास्त्ररीत्या प्राचीन क्षत्रियकुलोत्पन्न राजांप्रमाणें आपणास राज्याभिषेक करवून छत्रसिंहासन करावयाचें असें शिवाजीनें ठरविल्यावर त्यास ब्राम्हण आडवे आले, कारण क्षत्रिय म्हटलें कीं, त्यास वैदिककर्मांचा अधिकार आलाच. ही शंका विद्वान् ब्राम्हणांनीं काढली. ही शंका शिवछत्रपतीशीं ब्राम्हणांचा द्वेष होता म्हणून निघाली असें

नाहीं तर धर्मसमजुतीमुळें निघाली.* ह्या वेळीं ज्यांचें क्षत्रियत्व ब्राम्हण लोक बहुतकाळपर्यंत नाकारीत आले ते प्रभु लोक ह्यांत शिरून शिवाजी करितां फार झटले, व हें प्रकरण बरेंच आग्रहावर जाऊन त्यास ग्रामण्याचें स्वरूप आलें होतें. तथापि विख्यात विद्वन्मुकुटमणि गागाभट्ट काशीकर ह्यानीं तो तंटा मोडून टाकून, शिवछत्रपति हे उदेपूरच्या प्रख्यात क्षत्रियवंशापैकीं आहेत असें ठरवून त्यांस राज्याभिषेक केला. ह्या वेळीं जी वंशावळ कायम करण्यांत आली तीच खरी म्हणून आपण चालवें हें रास्त दिसतें. रजपुतस्थानांतील भाट लोकांची राजप्रशस्ति ह्याच वेळीं शोधपूर्वक तयार झाली असली पाहिजे. राज्याभिषेक समारंभाचे वेळीं रजपुतस्थानांतून अनेक भाट कवि आले असतील व त्यांनीं उदेपूरचें राजघराणें व त्यांत अवतार घेणारा शिवछत्रपति ह्यांचे पोंवाडे गाऊन मोठमोठीं बक्षिसें मिळविलीं असतील. ह्या गोष्टी असंभवनीय नाहींत. शिवछत्रपतीजवळ भूषण नांवाचा प्रख्यात कवि (भाट) होताच. महाराष्ट्रदेशांतही भाट होते, हल्लीं त्यांचें चीज नसल्यामुळें ते भिक्षा मागत हिंडत असतात. ह्यावरून असें दिसतें कीं, राजप्रशस्तींतला मजकूर खरा असण्याचा जितका संभव आहे तितकाच अन्यथा असण्याचाही आहे. ह्या वंशावळीच्या बाबतींत इतिहास-शोधक ह्या नात्यानें ऊहापोह करण्याचा प्रत्येक शोधकास अधिकार आहे; परंतु प्रमाणावांचून मिथ्या कल्पना मात्र कोणी करूं नयेत. वंशपरंपरागत शिवछत्रपतींचें बीज शुद्ध क्षत्रियाचें आहे. उदेपुराहून दक्षिणेंत आलेला भोंसल्यांचा मूळपुरुष ज्या क्षेत्रांत उत्पन्न झाला तें क्षत्रियाचें नव्हतें, हा मुख्य वादाचा मुद्दा आहे. ह्याविषयीं आतां विचार करूं.

* ही हकीकत, अलीकडे प्रभुरत्नमाला नांवाचें एक पुस्तक झालें आहे, त्यांत प्रभु ऊर्फ परभू ह्या लोकांतील प्रसिद्ध व अप्रसिद्ध पुरुषांचीं चरित्रें दिलीं आहेत; त्यांपैकीं चिटणिसांच्या चरित्रांत दिली आहे. आमच्या लोकांतील गृहकलह व जातिभेदासंबंधानें होणारे तंटे व ग्रामण्यें ह्यांस परभू लोकांच्या लेखांतून मोठें महत्व दिलेलें असतें. कोणा मराठ्या राजाचें मन वैदिक कर्माकडे वळलेलें आढळतांच हे लोक आपलें घोडें पुढें पुढें ढकलतात व त्यामुळें असल्या प्रकरणास ग्रामण्याचें स्वरूप येतें. परभू लोक वैदिक धर्माचे मोठे अभिमानी असून त्यांच्यांतील क्षात्र-तेज बहुत वेळ चमकलें आहे तथापि ब्राह्मण लोकांनीं हा आपला अधिकार कबूल करावा असें त्यांचें मत दिसतें. आपल्या धर्मास आधार नाहीं म्हणणाऱ्या ब्राह्मणांनीं ह्या धर्माभिमानी लोकांशीं दुराग्रहानें वागून आपलें, आपल्या धर्माचें व आपल्या देशाचें नुकसान होत आहे हें लक्ष्यांत ठेवून ह्या गोष्टीचा निकाल करावा हें चांगलें.

अगदीं प्रथम शाळाखात्याकरितां जीं क्रमिक पुस्तकें छापिलीं त्यांपैकीं चौथ्या किंवा पांचव्या पुस्तकांत—पक्कें आठवत नाहीं—शिवाजीच्या वंशाची हकीकत दिली आहे. लहानपणीं शाळेंत शिकत असतां ह्या वाचलेल्या गोष्टीचें जेवढें स्मरण आहे त्याच्या आधारें तिचा गोषवारा लिहितों.

" उदेपूरचा राजा (नांव ध्यानांत नाहीं) एके दिवशीं शिकारीस निघाला असतां, वाटेंत एका शेतकरी रजपुताची मुलगी डोईवर कांहीं जेवणाचे पदार्थ घेऊन त्यावर आपला डावा हात ठेऊन व उजव्या हातीं एक रेडीची दोरी धरून शेतांत चालली होती ती त्यानें पाहिली. बरोबरच्या मंडळींपैकीं एकानें तिच्या डोक्यावरचें ओझें पाडून मंडळीस हसवावें म्हणून तिच्या शेजारून आपला घोडा नेला. त्या तरुणीनें त्याचा उद्देश समजून त्याच्या घोड्याच्या जेरबंदांत आपल्या रेडीचीं शिंगें अडकवून त्यास खालीं पाडिलें. तेव्हां बरोबरच्या मंडळींत मोठा हशा उडाला. पुढें ती आपल्या शेताकडे गेली व हे शिकारी लोक रानांत गेले. एका रानडुकराच्या मागें ते लागले असतां तो डुकर जोंधळ्याच्या एका शेतांत शिरून दिसेनासा झाला. तें शेत त्या मुलीचेंच होतें. डुकर शेतांत आल्याचें पाहून एक मोठें जोंधळ्याचें ताट उपटून घेऊन, बिल्यानें त्यास शिप पाडून, तें ताट भाल्यासारखें त्या डुकराचे पोटांत खुपसून तो डुकर मारून, ही घ्या आपली शिकार म्हणून शेताच्या बाहेर उभे असलेल्या राजपुत्रापुढें टाकून निघून गेली. पुढें राजपुत्र व त्या बरोबरचे लोक नदीच्या कांठीं फराळास व विश्रांतीस बसले असतां एकाएकीं एक गोफणगुंडा येऊन राजपुत्राच्या घोड्याच्या पायावर लागून घोडा जायबंदी झाला. घोडा कोणीकडून आला म्हणून तपास करतात तों तीच मुलगी माळ्यावर उभी राहून गोफण फिरवितांना दृष्टीस पडली. राजपुत्राच्या मनांत ती इतकी भरली कीं तिच्याबरोबर त्यानें लग्न केलें. तिच्या पोटीं शिव छत्रपतीचा पूर्वज उत्पन्न झाला."

ह्या गोष्टीशीं मिळती अशी गोष्ट सातारा तालुक्यांतील बेणेगांव येथील एका पाटलानें सांगितली. पाटलाच्या सांगण्यांत विशेष फरक आहे, तो असा.

" एके दिवशीं सर्व राजपुत्र मिळून शिकारीस गेले असतां भोंसल्या-

च्या पूर्वजानें दुसऱ्या राजपुत्रांस सहजगत्या विचारलें कीं, " हें जवळचें झाड कशाचें ? " राजपुत्रानें उत्तर केलें कीं, आमच्या आईबापांनीं कधीं शेतीचा धंदा केला नाहीं, आम्हांस ह्या झाडाचें नांव काय ठाऊक! हें उत्तर ऐकतांच सर्व राजपुत्र खदखदां हसले. ही आपली हेटाळणी पाहून भोंसल्याच्या पूर्वजास संताप आला व वाईट वाटलें. ह्याचे व इतर राजपुत्रांचे नेहमीं तंटे होऊं लागले तेव्हां त्यास बापानें दक्षिणेंत जाण्याची आज्ञा दिली. पुढें तो दक्षिणेंत येऊन पुंडाई करून होता. "

ह्या वरील हकीकतीवरून लक्षांत येईल कीं, शिवाजीचा पूर्वज हा उदेपूरच्या अस्सल राजवंशांतील आहे. त्याचे आईबाप अस्सल रजपूत. आई मात्र राजकुलांतील नसून गरीब शेतकरी रजपुताची मुलगी होती. वरील पाटीलबुवाच्या सांगण्यांत झाडाचें नांव विचारल्याची हकीकत आहेच. झाडाचें लांकूड होतें. लांकूड काम सुतार करतो. तेव्हां ज्यानें झाडाचें नांव विचारलें त्याची आई सुताराची मुलगी. असा बादरायण संबंध कोणी तरी अक्कलमंदानें जोडून दिला. ह्याप्रमाणें दंतकथा बनली आणि चालू झाली!! ऐकली तशी लिहिणारानीं ग्रंथांत लिहून टाकली! शिवाजीच्या शत्रूंना तर ही उत्तम संधि मिळालेली, ते कां व्यर्थ दवडतील? बनबीर हा दासीपुत्र होता, तो उदेसिंगापासून पराभव पावून दक्षिणेंत आला, व त्याच्यापासून ही एका भोंसले कुळाची उत्पत्ति झाली. ह्या गोष्टीचा व वरील दंतकथेचा संगम होऊन बुंदेल्याचा लेख तयार झाला असेल!

वरील* क्रमिक पुस्तकांतील हकीकत टॉडच्या इतिहासावरूनच दिलेली असेल असें वाटतें. टॉड साहेबाप्रमाणें रजपुताचा माहितगार दुसरा कोणीही नाहीं हें प्रसिद्ध आहे. तेव्हां त्याचा लेखच प्रमाण मानला पाहिजे. त्याच्या म्हणण्याशीं मागें सांगितल्याप्रमाणें मराठ्यांतही आख्यायिका आहेच म्हणून शिवाजीचा वंश अस्सल क्षत्रिय असेंच आपण मानावें हें योग्य दिसतें.

---

* पूर्वींच्या क्रमिक चौथ्या व पांचव्या पुस्तकांत रजपूत लोकांच्या शौर्यसाहसानीं भरलेल्या गोष्टी पुष्कळ होत्या त्यांपैकीं बहुत गोष्टी सांप्रत काढून टाकिल्या आहेत. टॉडच्या इतिहासाचें मराठींत भाषांतर होणें सांप्रत जरूर आहे. ह्या गोष्टीचा योग कधीं येईल तो न कळे.

ह्या बाबतींत आपणापुढें जीं प्रमाणें आहेत त्यांपैकीं राज-प्रशस्ति, टॉडचा लेख व सातारची वंशावळ हीं मुख्य मानून चाललें पाहिजे. आपण जितक्या अधिक वंशावळी जमा करूं तितके अधिक संशय आपल्यापुढें उभे राहतील. सर्व वंशावळींत साम्य पाहतां हा वंश चितोडच्या राजवंशापासून निघाला आहे व शिवाजीचा पणजा बाबजी ऊर्फ शिवजी ह्याच्यापासून पुढील वंशजाविषयीं सर्वांची एकवाक्यता आहे. बाबाजीच्या पूर्वींच्या पुरुषांचीं नांवें व त्यांचा अनुक्रम ह्याबद्दल सर्व ठिकाणीं कमज्यास्त भेद आहे. वर लिहिलेल्या तीन प्रमाणांपैकीं राजप्रशस्ति मुख्य होय; कारण टॉडचा इतिहास व सातारची वंशावळ—तिच्या अंगभूत चिटणिसांची वंशावळ—ह्यांस मुख्य आधारभूत तीच आहे. राजप्रशस्ति केव्हां झाली असावी व तिजविषयींही संशयास जागा कशी आहे हें मागें दर्शविलेंच आहे. तथापि तिच्यापेक्षां अधिक विश्वसनीय प्रमाण पुढें येईपर्यंत अग्रमान तिलाच दिला पाहिजे. तिच्यांतील समग्र माहिती ती जशीच्यातशी पुढें आल्यावांचून कळण्यास मार्ग नाहीं आणि म्हणून बरबटजी, बरहटूजी (मोडी लिपींत ‘ ब ’ व ‘ ह ’ ह्याच्या आकारांचें सादृश्य आहे ह्यामुळें बचा ह किंवा हचा ब वाचला जाणें साहजिक आहे) व बरडजी हे एकच मानले पाहिजेत; व बनबिराच्या नांवाशीं जरी वरील नांवांचें सादृश्य भासत असलें तरी त्यांचा अर्थाअर्थीं कांहीं संबंध नाहीं असेंच मानलें पाहिजे. बरबटजीचें नांव टॉड देत नाहीं, तरी हा आपल्या पूर्वजांपैकीं एक आहे ही गोष्ट सातारकरांना कबूल आहे.

सातारची वंशावळ श्री भगवान् विष्णु सर्वोत्तमापासून आरंभून श्रीमन्महाराज शिवछत्रपतीपर्यंत आणून पोंचविली आहे. तींत ‘ सिंह ’ हें उपपद तीव्रसिंह ह्या १२७ व्या पुरुषापासून नांवापुढें जोडण्याचा परिपाठ आढळून येतो. ह्या सिंह शब्दाचा “ सिंग ” असा अपभ्रंश होऊन तो शब्द आपल्या नांवापुढें जोडण्याची रजपूत लोकांत प्रवृत्ति पुढें पडली व सांप्रत प्रचारांतही आहे.

सांप्रत मराठे लोकांत सर्वत्र नांवापुढें जोडलें जाणारें उपपद “ जी ” ह्याचा आरंभ, लक्ष्मणसिंहापासून चौथा पुरुष सिंहाजी ऊर्फ शिवाजी ह्याच्या वेळेपासून आढळतो. पुढें हीं उपपदें (सिंह आणि जी) कोठें

एकेकटीं व कोठें दोन्ही एकत्र अशीं आढळतात. व लक्ष्मणसिंहापासून चौदावा पुरुष संभाजी ह्यापासून मग सर्व पुरुषांच्या नांवापुढें " जी " हें मराठी उपपदच आढळतें.

सदर्हू वंशावळींतील नांवांची भाषा आपणांस चार प्रकारची आढळते. (१) पूर्वीच्या प्राचीन राजांचीं नांवें (२) " सिंह " हें उपपद ज्यांपुढें आहे अशीं नांवें (३) " सिंह " व " जी " हीं उपपदें एकत्र अगर एकेकटीं ज्यांपुढें आहेत अशीं नांवें आणि (४) शेवटचीं " जी " उपपद मात्र ज्यांपुढें आहे अशीं नांवें. ह्या चार प्रकारच्या नांवांवरून आपणास खालीं लिहिल्याप्रमाणें अनुमानें काढतां येतात.

पहिलें—मुसलमान लोक ह्या देशांत येण्याच्यापूर्वीं जे क्षत्रिय राजे इकडे राज्य करीत होते त्यांचीं निरनिराळ्या प्रकारचीं, पराक्रमसूचक अर्थ ज्यांत आहे अशीं, नांवें १२६ वा पुरुष कृतवर्मा ह्यापर्यंत आहेत. येथपर्यंतचे सर्व राजे हे मुसलमानांच्या पूर्वींचे असावेत.

दुसरें—तीव्र-सिंहापासून लक्ष्मणसिंहापर्यंतचे राजे हे, मुसलमान लोक येऊं लागल्यापासून त्यांस ज्यांनीं हरकत केली ते होत. मदोन्मत्त गजावर सिंह धांवून जातात त्याप्रमाणें यवनावर घसरणाऱ्या ह्या लोकांत सिंह शब्द आपल्या नांवापुढें जोडण्याचा प्रचार तेव्हांपासून पडलेला दिसतो.

तिसरें—सजनसिंह आपल्या चितोडच्या गादीवरचा हक्क सोडून दक्षिणेकडे आला म्हणून जी हकीकत आहे त्यावरून तो महाराष्ट्रांत आला असें समजतां येत नाहीं. तो ज्या सोंधवाडा प्रांतांत आला तो प्रांत उत्तरेकडचाच आहे. पुढें ह्या कुळांतले लोक जसजसे दक्षिणेकडे येऊं लागले; तसतसा " सिंह " आणि " जी " ह्या उपपदांची त्यांच्या नांवापुढें मिसळ झालेली दिसते.

चौथें—लक्ष्मणसिंहापासून चौदावा संभाजी ह्यापासून पुढील पुरुषांच्या नांवांपुढें " जी " हें उपपद कायमचें जोडलेलें आढळतें. म्हणून ह्यापुढें ते महाराष्ट्रांतले कायमचे रहिवासी झाले असें समजण्यास हरकत नाहीं. असो.

खरी वंशावळ हुडकून काढण्याचें लौकिकप्रमाण एक आहे. तें लोकरूढि हें होय. लोकांत अशी एक चाल आढळून येते कीं, मागील प्रसिद्ध

पुरुषांचीं नांवें आपल्या पुत्रांस द्यावयाचीं; किंवा एकाद्या देवतेस नवस करून पुत्र झाल्यास त्या देवतेचें नांव द्यावयाचें; किंवा जन्मानंतर एकादें अशक्त मूल जगण्याची आशा नाहींशी झाल्यावर ज्याचा निर्वंश झालेला असतो अशा एकाद्या आपल्या वंशांतील पूर्व-पुरुषाच्या नांवानें मुलास अंगारा लावतात. जर तें मूल जगलें तर त्या पुरुषाचें नांव त्यास ठेवतात. ह्या रूढीच्या कसोटीस निरनिराळ्या वंशावळी ताडून पाहूं.

भोंसल्याच्या वंशांतील बाबजी (शिवाजीचा पणजा) पासून पुढील पुरुषांपैकीं कोणाच्या नांवाविषयीं आपणांस संशय नाहीं. हीं नांवें लोकरूढी-प्रमाणें पाहतां तत्पूर्वीं झालेल्या वंशजाच्या नांवाशीं मिळतीं असलीं पाहिजेत. तीं कितीशीं मिळतीं आहेत तीं पाहूं.

खुद्द बाबजी ऊर्फ शिवजी ह्याचें नांव, रा० रा० देऊसकर यांनीं अंक ४ मधील आपल्या लेखाच्या शेवटीं ज्या वंशावळी जोडल्या आहेत त्या सर्वांत आहेत. बाबजीचे पुत्र मालोजी व विठोजी ह्यांपैकीं मालोजीच्या नांवा-शीं मेळ दिसतो. माहुलजी व मालकर्ण हीं नांवें डॉड व भिडे ह्यांच्या वंशावळींत आहेत. परंतु अशा प्रकारचें नांव चिटणिसांची व साताराची (अंक ५ मधील) ह्या वंशावळी सांगत नाहींत. विठोजी हें नांव तर निवळ मराठी आहे, ह्या नांवावरून पंढरपूरच्या विठोबाचें नांव ज्या प्रांतीं गाजत होतें अशा प्रांतांत बाबाजी ऊर्फ शिवजी हा स्थायिक झाला होता असें उघड दिसतें. मालोजीचे मुलगे शहाजी व सरीफजी ह्यांचीं नांवें त्यांच्या पूर्वजांच्या नामावलींत सांपडा-वयाचीं नाहींतच. कारण एका मुसलमान जातीच्या शहासरीफ नामें अवलिया-च्या वरप्रसादानें झालें ही गोष्ट इतिहासप्रसिद्ध आहे. शहाजीचे पुत्र संभाजी, शिवाजी, आणि व्यंकोजी ह्यांपैकीं पहिल्या दोघांचीं नांवें त्यांच्या पूर्वजांचीं आहेत ही गोष्ट डॉड, चिटणीस व सातारादरबार ह्यांस कबूल आहेच. व्यं-कोजी हें नांव शिवाजीच्या पूर्वजांपैकीं कोणाचें होतें, असें प्रसिद्ध झालेल्या वंशावळीपैकीं कोणतीवरून दिसत नाहीं हें खरें; तथापि ह्या लेखाच्या आरंभीं जोडलेल्या वंशावळींत, बाबजी ऊर्फ शिवजी ह्याचा बाप व्यंकोजी, असें लिहिलें आहे. शिवछत्रपतीचे पुत्र संभाजी व राजाराम, ह्यांपैकीं पहिलें नांव पूर्वजांच्या यादींत प्रसिद्ध झालेल्या सर्व वंशावळींत आहेच. (रा० सा० साने

ह्यांच्या वंशावळींत हें नांव नाहीं. ही वंशावळ प्रसिद्ध झालेल्या वंशावळीशीं मेळाची नाहींच.) दुसऱ्या नांवाशीं मिळतें नांव "रामराजा" असें टॉड साहेबांच्या वंशावळींत आहे (अंक ४ पृष्ठ ५ शिवाजीची वंशावळ पहा.)

शिवाजीचा चुलत आजा विठोजी ह्यास आठ पुत्र होते. त्यांचीं नांवें आमच्या (आरंभीं जोडलेल्या) वंशावळींत दिलेलीं आहेत. ह्यांपैकीं त्रिंबकजी व केकाजी किंवा लोकाजी हीं नांवें पूर्वजांच्या यादींत कोठेंच नाहींत. संभाजी, खेलोजी, मालोजी* व बाबजी ह्या चौघांचीं नांवें विश्वसनीय अशा पूर्वोक्त तीनही वंशावळींत आहेत. नागोजी व परसोजी हीं नांवें आमच्या वंशावळींत मात्र आहेत, दुसरीकडे नाहींत.

रा० रा० देऊसकर यांनीं अंक ४ मध्यें दिलेल्या वंशावळीपैकीं मुख्य दोनच होत, एक टॉडची व एक चिटणिसांची. ह्या दोहोंचा मेळ देवराज (टॉडच्या वंशावळींतील ७ वा व चिटणिसांच्या वंशावळींतील ६ वा) नांवापर्यंत बहुतेक आहेच. परंतु त्या पुढील नांवांचा अनुक्रम बहुतकरून एक मेळाचा नाहीं. आतां ह्या दोन वंशावळींपैकीं खरा अनुक्रम कोणता समजावा असा प्रश्न उत्पन्न होतो. मला वाटतें टॉडचा अनुक्रम चुकीचा असावा. कारण सजनसिंह राज्यभ्रष्ट होऊन दक्षिणेकडे गेला व पुढें त्याचे वंशज तर अधिकाधिक दरिद्री होऊन दक्षिणेंतील दूरच्या प्रदेशीं भटकत गेल्यावर त्यांच्या वंशाचा शोध राजस्थानांतील भाटांनीं बरोबर ठेवला असेल ही गोष्ट लटकी होय!

चिटणिसांच्या लेखाबद्दलही संशय घेण्यास जागा आहेच. कारण दक्षिणेंत पाटिलक्या मिळवून आपल्या घराण्याची कायमची स्थापना करणारा बाबाजी हा होय. ह्याच्या पूर्वींच्या पांच सात पिढ्या, अनेक प्रकारच्या धामधुमींत गेलेल्या, क्रमवार ठाऊक असण्याची पंचाईतच. एकेका पुरुषापासून अनेक वंशशाखा फुटल्या असतील व एका शाखेच्या मूळपुरुषाच्या जागीं दुसऱ्या शाखेचा मूळपुरुष अगर भलता कोणी लोकांच्या बोलण्यांत व मग लिहिण्यांत आला असेल असा पुष्कळ संभव आहे.

तात्पर्य, टॉडच्या माहितीप्रमाणें प्रथमचे पांच सहा पुरुष बरोबर असून

* मालोजीचें अगर तत्सदृश दुसरें नांव चिटणीस देत नाहींत.

त्या पुढचे चुकीचे असण्याचा संभव अधिक आहे. व चिटणिसांच्या माहितींत तशा चुक्या असण्याचा कमी संभव आहे, परंतु अगदीं नाहीं असें नाहीं.

ह्यावरून असें दिसतें कीं, शिवछत्रपतीच्या राज्याभिषेकाच्या वेळीं निरनिराळ्या वंशावळी, वृद्ध पुरुषांच्या तोंडची माहिती व राजस्थानांतील भाटांचीं कवनें ह्या सर्वांवरून भोंसल्याची वंशावळ तयार झाली. ती तयार करते वेळीं अनेक प्रकारची सुसंगत व विसंगतप्रमाणें चिटणिसांच्या पुढें येऊन पडलीं असतील. तेव्हां, राणा लक्ष्मणसिंहापासून कांहीं पुरुषांचीं नांवें व बाबाजीपासून शिवछत्रपतीपर्यंत पुढील वंशजांचीं नांवें खेरीज करून मधल्या सर्व वंशजांच्या नांवांत त्यांना विसंगती आढळली असावी व म्हणून त्यांनीं देवराजाच्या पुढील पुरुषांचीं नांवें रजपूत लोकांच्या माहितीप्रमाणें न लिहितां मिळालेल्या विसंगत प्रमाणांचा मराठ्यांच्या माहितीशीं कसा तरी मेळ घालून वंशावळ तयार केली असावी, म्हणून देवराजापुढील वंशावळींत चिटणिसांचा टॉडशीं मेळ नाहीं. तेव्हां हीं मधलीं नांवें खरीं कोणतीं समजावीं? आपल्या पूर्वजांचीं नांवें पुढें आणण्याची चाल जी मागें सांगितली तीप्रमाणें पाहतां चुकी दोहोंमध्येंही आहे असें म्हणावें लागतें.

बरबटजी (साताऱ्च्या वंशावळींतील बरहटूजी) म्हणून जो चिटणीस देतात तोच आमच्या वंशावळींतील बरडजी हें मागें सांगितलेंच आहे. येथपासून पुढील वंशावळ (ह्या लेखाच्या आरंभीं जोडलेली) आमचीच खरी असण्याचा अधिक संभव आहे. तथापि तो संभवच हें विसरतां कामा नये !

वरील प्रकारची कितीही वाटाघाट केली तरी संशयाचें निवारण होणें कठिणच. " हा वंश चितोडच्या राजघराण्यापासून झाला " ह्या गोष्टींत मात्र सर्वांची एकवाक्यता आहे; तसेंच बाबाजीपासून पुढील वंशाविषयी संशय मुळींच नाहीं, आणि लक्ष्मणसिंहापासून पांच सहा पिढ्या टॉड व चिटणीस ह्यांच्या लेखांत सारख्या आहेत (ह्या दोघांनींही ही माहिती रजपुतापासूनच मिळविलेली). मध्यंतरीं सगळा अंधार आहे. ह्या विषयाची कितीही वाटाघाट केली तरी अधिक तथ्य कांहीं निघणार नाहीं असें वाटतें.

चितोडच्या घराण्यांतील इतर पुरुष शेवटपर्यंत यवनांशीं बाण्यानें


वागले इतकेंच, परंतु स्थलभ्रष्ट झालेल्या त्याच घराण्यांतील एका शाखेंत शिवाजीनें जन्म घेऊन गोब्राम्हणांच्या मानेवर पडलेल्या त्या क्रूर यवनांच्या सुऱ्या हिसकावून घेतल्या, व त्यांच्या पायाशीं लोळत पडलेला स्वधर्म गजमस्तकारूढ केला. असें हें कोणालाही अद्भुत वाटणारें कर्म करण्यास क्षत्रिय म्हणविणारांपैकीं कोणीही पुढें आला नाहीं: क्षत्रिय (दुःखापासून सोडविणारा) ह्या नांवाचें सार्थक फक्त शिवाजीनेंच केलें म्हणून तो नुसता क्षत्रिय नव्हे तर क्षत्रियकुलावतंस होय. मराठी साम्राज्याच्या ह्या स्थापकासंबंधानें भूषण (भूखन) हा म्हणतो कीं, " शिवाजी न होते तो सुन्नत होती सबकी " म्हणजे शिवाजी झाला नसता तर सर्वांची सुंता झाली असती !

अशा ह्या महापुरूषाची उत्पत्ति चितोडच्या बाणेदार व प्रसिद्ध क्षत्रिय राजकुलांत झाली. त्या कुलास अनुरूप असेंच, स्वराज्य स्थापण्याचें व स्वधर्म रक्षणाचें असामान्य कर्म त्याच्या हातून घडलें, तुकाराम म्हणतो:—

शुद्धबीजा पोटीं, फळें रसाळ गोमटीं,

विटें, जि० सातारा.
ता० ३० जुलई १८९७. } **कृ० वि० आचार्य कालगांवकर.**

*शिवाजीची वंशावळ.



ह्या पेजावरील टीपा पुढील पानावर पाहवें.

* ज्यास्त खुलाशाकरितां खालील टिपा दिल्या आहेत.

१ ह्याचें नांव चिटणीस व सातारा दरबारची वंशावळ मात्र देतात.

२ हें नांव दुसऱ्या कोणत्याही वंशावळींत नाहीं. ह्या ठिकाणीं संभाजी हें नांव आढळतें.

३ बाबाजीचें दुसरें नांव शिवजी असें आढळतें.

४ सरूपजी हा खानवटकरांचा पूर्वज होय.

५ हा खानवटकराच्या घराण्यांतून कोल्हापुराकडे संभाजीस दत्तक दिला. हा संभाजी राजारामाचा पुत्र राजसबाईपासून झालेला.

६ देवीचे रासीन येथील पाटीलकी व शेटेपणाचें वतन याणें मिळविलें.

७ हा खानवट येथें प्रथम राहूं लागला.

८ जिंती वगैरे चार गांव याजकडे होते, तेथें त्याचे वंशज आहेत.

९ जाधवरावांचा नोकर होता त्यांच्या कार्यार्थ लढाईंत मेला. ह्याला संतति नाहीं.

१० खेलोजी ह्याचा वंश मनरथ, निरगुडी (फलटण हद्दींत ?) मिरज गांव, कळस, वावी ह्या पांच ठिकाणीं आहे.

११ मालोजीचा वंश जेजोरी नजीक कोन्हाळें म्हणून एक गांव आहे तेथें आहे.

१२ ह्याचा वंश तंजावराकडे.

१३ ह्यांचा वंश मुंगी पैठण व बनशंकरी येथें आहे.

१४ ह्यांचा वंश मुंगी, बनशंकरी, नानजव भाबोडें (डी) येथें आहे.

१५ त्रिंबकजी ह्यांचा वंश तंजावराकडे आहे.

१६ केकाजी किंवा लोकाजी ह्याचा निर्वंश.

‘ भारतवर्ष ’ मासिकपुस्तकांत प्रसिद्ध झालेली

गोविंदपंत बुंदेल्यांची कैफियत.

(सागरच्या कैफियतीसह)

ही

अनेक प्रतींवरून शुद्ध करून अर्थनिर्णायक व

अवांतर माहितीच्या टीपांसह

दत्तात्रय बळवंत पारसनीस

यांणीं

प्रकाशित केली.

“ जो बीति गजराजपर सो बीति अब आय ।
बाजी जात बुंदेलन्‌की राखो बाजी राय ॥ १ ॥ ”

पुणें “ ज्ञानप्रकाश ” छा० छा०.

सन १८९७.

गोविंदपंत बुंदेल्यांची कैफियत.

उपोद्घात.

थोरले बाजीरावसाहेब पेशवे ह्यांच्या कारकीर्दींत जे पराक्रमी पुरुष उदयास आले त्यांपैकीं गोविंदपंत बुंदेले हे एक होत. दिल्लीपतीचा अलहाबाद येथील सुभेदार महंमदखान बंगष ह्यानें बुंदेलखंडांतील हिंदुधर्माभिमानी क्षत्रिय राजा छत्रसाल ह्यावर अनेक स्वाऱ्या करून त्यास मनस्वी त्रास दिला. तेव्हां त्यानें बाजीरावसाहेब पेशव्यांस साह्य करण्याबद्दल विनंती केली. तिचा बाजीरावसाहेबांनीं स्वीकार करून स्वसैन्यानिशीं बुंदेलखंडांत स्वारी केली आणि महंमदखानाचा पराभव करून छत्रसाल राजास संकटमुक्त केलें. त्यामुळें त्यानें कृतज्ञतापूर्वक बाजीरावसाहेबांस, उपकारप्रदर्शनार्थ, आपल्या राज्याचा तिसरा हिस्सा समर्पण केला. ह्या नवीन मिळालेल्या प्रांतांचा बंदोबस्त करण्याकरितां त्यांनीं गोविंदपंत बुंदेल्याची योजना केली. हे जातीचे कऱ्हाडे ब्राम्हण असून फार धूर्त व शूर होते. ह्यांनीं आपल्या शहाणपणाच्या जोरावर व समशेरीच्या बळावर त्या प्रांतांमध्यें मराठ्यांची सत्ता उत्तम प्रकारें संस्थापित केली आणि तिकडील प्रमत्त बुंदेले लोकांवर चांगला दरारा बसविला. त्यांनीं सागर व काल्पी येथें मोठीं शहरें वसवून तेथें पेशव्यांच्या वतीनें त्या प्रांताचा राज्यकारभार चालविला. हे शूर पुरुष पानिपतच्या घोर संग्रामांत मारले गेले. पुढें त्यांचे पुत्र त्या प्रांताचा कारभार करूं लागले. तेही आपल्या बापाप्रमाणें मोठे कर्तृत्ववान् व पराक्रमी निपजले. त्यांनीं बुंदेलखंडांत मराठी राज्यसत्तेचें संरक्षण करण्याचे कामीं फार परिश्रम केले. परंतु पुढें मराठ्यांची सार्वभौम सत्ता नष्ट झाल्यामुळें त्यांच्या बुंदेलखंडांतील सत्तेसही ऱ्हासकाळ प्राप्त झाला व शेवटीं ती समूळ नष्ट झाली. अद्यापि ह्या इतिहासप्रसिद्ध घराण्यांतील पुरुषांचे वंशज त्या प्रांतामध्यें पुष्कळ आहेत. त्यांचा व महाराष्ट्रीयांचा दूरांतरामुळें परस्पर संबंध तुटला जाऊन त्यांची ओळख सर्वस्वी बुजण्याची

वेळ सांप्रत आली आहे ! आणि इतिहासांत गोविंदपंत बुंदेले ह्या वीररत्नाचें नुसतें नांव मात्र राहिलें आहे !! एकेकालीं ज्या पुरुषांनीं महाराष्ट्रराज्याभिवृद्धीकरितां जिवापाड परिश्रम केले, अनंत पराक्रम गाजविले, आणि प्रत्यक्ष आपल्या प्राणाच्या आहुति दिल्या, त्यांचा व त्यांच्या वंशजाचा इतिहास आपणास माहीत नसावा ही केवढी शोचनीय गोष्ट आहे ?

जुन्या घराण्यांतील प्रसिद्ध पुरुषांची माहिती होण्यास त्यांच्या इतिहासाच्या प्रकाशनावांचून दुसरा मार्ग नाहीं. हा इतिहास म्हणजे जुने लेख, जुने कागदपत्र, जुन्या बखरी किंवा कैफियती ह्या होत. ह्या जमविण्याचा प्रयत्न ब्रिटिश सरकारच्या अव्वल अमदानींतल्या कित्येक इतिहासप्रिय व शोधक अधिकाऱ्यांनीं केला व त्यांच्याच परिश्रमामुळें आमच्या पूर्वजांची अल्पशी ओळख कायम रहाण्यास कांहीं तरी साधन झालें असें म्हणण्यास हरकत नाहीं. इंग्रजी अंमलाच्या प्रारंभीं जे कित्येक थोर व उदार मनाचे युरोपियन अधिकारी ह्या देशांत आले त्यांनीं जुन्या संस्थानिकांचे, जहागिरदारांचे, आणि इतर इतिहासप्रसिद्ध घराण्यांतील लोकांचे, राजकीय बंदोबस्तासंबंधानें किंवा शोधक बुद्धीनें, इतिहास व कुलवृत्तांत जमविण्याचा प्रयत्न केला हें सर्वांस महशूरच आहे. महाराष्ट्रांतील एल्फिन्स्टन, ग्रांट डफ, जनरल ब्रिग्ज, नागपूरचे जेन्किन्स, म्हैसूरचे कर्नल विल्क्स, मध्यहिंदुस्थानचे मालकम, राजपुतान्यांतील टॉड प्रभृति अधिकाऱ्यांनीं एतद्देशियांच्या इतिहासाचें संशोधन करण्याचे कामीं जसे स्तुत्य प्रयत्न केले त्याप्रमाणें बुंदेलखंडामध्यें कर्नल स्लीमन ह्यांनीं तेथील संस्थानिकांचे इतिहास शोधण्याचे कामीं चांगली खटपट केली. त्यांनीं जुने कागदपत्र पुष्कळ मिळविले व जुन्या लोकांकडून पूर्वापार इतिहासाच्या अनेक कैफियतीही लिहून घेतल्या. त्यांचा त्यांनीं चांगला उपयोग करून कांहीं रिपोर्ट सरकारांत लिहिले आहेत ते फारच महत्वाचे आहेत. ह्यांचा " Rambles and Recollcetions of an Indian official " नामक स्वतःच्या अनुभवानें ओतप्रोत भरलेला एक सुंदर ग्रंथ इंग्रजीमध्यें प्रसिद्ध आहे. ह्यांचें मन एतद्देशियांविषयीं कलुषित व विकारवश नसून ते त्यांशीं प्रेमभावानें वर्तत असत. त्यांच्या वर्तनक्रमाचें तत्व त्यांच्या पुढील शब्दावरून दिसून येईलः—

" We know and feel that the people everywhere *look*

up to and respect us, in spite of our faults, and we like to let them know and feel that we have confidence in them. "

असो. अशा थोर मनाच्या युरोपियन गृहस्थानें गोविंदपंत बुंदेल्यासारख्या रणशूर व वैभवशाली महाराष्ट्रवीराच्या इतिहासाचें पुनरुज्जीवन केल्याचें श्रेय घेतल्यास आश्चर्य तें काय ?

कर्नल स्लीमन हे बुंदेलखंडचे पोलिटिकल एजंट असतांना त्यांनीं गोविंदपंत बुंदेल्यांचे वंशज व सागरचे राजे श्रीमंत बळवंतराव रघुनाथ ऊर्फ बाबासाहेब ह्यांस त्यांच्या घराण्याचा इतिहास मागितला. तो संगतवार लिहिलेला नसल्यामुळें त्यांनीं सागर संस्थानांतील पूर्ण माहितगार व जुने गृहस्थ रा० रा० रामचंद्र कृष्ण लघाटे ह्यांस तो लिहून पाठविण्याची विनंति केली. खुद्द श्रीमंतांनीं त्यांना एक पत्र लिहिलें व त्यांच्या कारभाऱ्यांनीं एक पत्र लिहिलें. त्या पत्रांप्रमाणें रा० रा० रामचंद्र कृष्ण लघाटे ह्यांनीं जुन्या कागदपत्रांच्या आधारानें " गोविंदपंत बुंदेल्याची कैफियत " तयार करून श्रीमंतांकडे पाठविली. ती पावल्याबद्दल श्रीमंतांचें व त्यांच्या कारभाऱ्यांचें आभारप्रदर्शक पत्र त्यांस आलें. हीं चारी पत्रें आम्ही येथें दाखल करितों. म्हणजे ह्या कैफियतीच्या लेखकाची व लेखनप्रसंगाची वाचकांस सहज माहिती होईल. हीं पत्रें येणेंप्रमाणें:—

श्री.

" राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री रामचंद्र कृष्ण मजमदार स्वामी गोसावी यांसी.

सेवक बळवंतराव रघुनाथ नमस्कार विनंति उपरी येथील कुशल जाणोन स्वकुशल लिहीत जाणें. विशेष, सागरीहून स्वारी निघाल्या तागाईत पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं, तरी सविस्तर लिहिणें. विशेष, सदरेहून हुकूम आला आहे जेः—आपले पंतसाहेब राज्य येथें अमलदारी कधींपासून जाहली, व कोणते रीतीनें पंतसाहेबांनीं राज्य मिळविलें, व त्यांचे वेळेस कामदार व हुद्देदार, दरखदार, फौजबंद कोण कोण सरदार होते, व मसलती वकील, त्यांची सर्व नांवनिशीं, व त्याजवर श्रीमंत बाबासाहेबांजवळ, धाकटे बाबासाहेबांजवळ, कामकाजी व दरखदार व फौजबंद सरदार कोण कोण होते तीं नांवें, व

उभयतांची वहिवाट कशी राहिली, नंतर श्रीमंत आबासाहेब व नानासाहेब हे कधींपासून कामकाज सांभाळोन वहिवाट चालविली, ते वेळेस सरदार व दरखदार व कामदार कोण कसे होते, व हल्लीं पावेतों वहिवाट कशी चालली, व कोण कोण सरदार व कामदार व वकील, दरखदार कोणते वेळेंस कोण कोण राहिले तें सर्व सन संमतांत, सागरप्रान्त काल्पी, जालवण प्रान्त यांत जे लोकांनीं जे वेळेस वहिवाट व कामकाजांत आजपावेतों जसे ज्या वेळेस कारभार करीत आले असतील त्याप्रमाणें त्यांचीं नांवनिशीं दोन्ही प्रान्तांतील भिन्न भिन्न तपशील लावून पाठवावी म्हणून हुकूम आहे. याजकरितां वकील यांस साहेब अॅजिट बहादर यांणीं बोलावून मुनशी यांजकडून सांगविलें, त्याजवरून तुम्हांस लिहिलें आहे. तरी पुराणे माहितगार तुम्हीं आहां. आम्हीं येथेंही मसोदा केला आहे, परंतु माहितीची विशेषता तुमची आहे. तुम्हीं वहिवाटींत पहिल्यापासोन हा कालपावेतों होता. आणि पूर्वींपासोन संबंध जो तुम्हांस माहित, आम्हांस ठाऊक नाहीं. आम्ही ऐकोन जाणतों त्याजवर तजवीज केली, परंतु तुमची तजवीज येईल ती पक्की असें जाणोन तुम्हांस लिहिलें आहे. तरी पत्र पावतांच मनन करून तपशीलवार प्रारंभापासून आजपावेतों जी वहिवाट ज्या वेळेस जशी झाली असेल तशी सालसंमत सर्व बिदीवार लिहून आलें पाहिजे. त्याजवरून आम्ही येथें मसोदा करीत आहों तो व आपला मेळवून पक्की कैफियत लिहून देऊं. येविशीं दोन दिवस मेहेनत करून अति सत्वर तजवीज करावी म्हणून पत्र तुम्हांस लिहिलें आहे. व रा० भिकाजी सदाशिव ठाकूर यांस लिहिलें आहे; ते तुम्हापाशीं येतील. लिहिलेप्रमाणें कागद करून यांचे स्वाधीन करावी म्हणजे ते रवाना करून देतील. येविशीं विलंब न लागेल तें करणें. तुम्हीं पुरातन वडिलांचे संग्रहीं आज पावेतों त्या काळांतील तुम्हीं पुरुष आहां. त्या काळची वर्तणूक आहे ती तुम्हीं जाणतच आहां. म्हणून तुम्हांस लिहिलें आहे. तरी यथास्थित चौकशी करून लिहावें. त्याप्रमाणें येथून कैफियत द्यावयास येईल. ज्यांत कोणतेही लिहिण्यांत तफावत न राहे तें करणें. वरकड येथून बंदोबस्त जालियावर स्वारी सागरास लौकरच येईल. मित्ती आश्विन शुद्ध २ सन १८९७ मुक्काम जबलपूर, बहुत काय लिहिणें हे विनंति."

श्रीजगदेव.

" राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री भाऊ स्वामींचे सेवेशीं पो गंगाधर मल्हार मराठे कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति उपरी येथील कुशल तागाईत आश्विन शुद्ध २ रोज पावेतों मुक्काम जबलपूर, आपले कृपेंकरून सुखरूप असों विशेष. आम्ही आलिया तागाईत कांहीं पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तरी असें नसावें. निरंतर कृपापत्रीं आनंदवीत असावें. यानंतर इकडील वर्तमान तरी श्रीमंत यजमान स्वामींचे पत्रावरून सर्व श्रुत होईल. येविशीं कैफियत सदरेस मागितली गेली आहे. तरी आपण पुराणे. सर्व माहितगारी आपणांस आहे, ती दुसऱ्यास ठाऊक नाहीं. आम्ही ऐकून बहुतेक जाणतों; परंतु आपण वहिवाट पाहिली व ऐकिली व स्वतः केली. तें आम्हांस कितेक ठाऊक? परंतु ऐकलेला मसोदा केला, उपयोगी पडत नाहीं. आपला कागद येईल तो पक्का. त्यावरून कैफियत द्यावयास येईल. रा० भिकाजीपंत भाऊंस लिहिलें आहे. ते आपणांपाशीं येतील. ते व आपण मिळोन तजवीज करून सत्वर उत्तर आलें पाहिजे. ज्यांत कागद सत्वर कैफियतीचा दिला जाय असें झालें पाहिजे. सदैव पत्रद्वारें परामर्ष करीत असावा. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंति.

सेवेशीं बळवंतराव आप्पाजी लिंगवेकर साष्टांग नमस्कार. सदैव पत्रद्वारें संतोषवीत असावें. लोभ करावा हे विनंति.

पैवस्ती कार्तिक शुद्ध ७ सन १८९७ मुकाम सागर."

नक्कल.

श्री.

" राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री रामचंद्र कृष्ण मुजुमदार स्वामी गोसावी यांसी.

सेवक बळवंतराव रघुनाथ नमस्कार विनंति उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष कार्तिक वद्य ६ चे मित्तीचें पत्र व प्राचीन वहिवाटीची याद कैफियत तुमचे समजेची लिहून पाठविली ती पावली. सर्व अक्षरशाहा पाहण्यांत आली. त्याजवर जसें येथें लिहिण्यांत येईल तसें लिहून देऊं. तुम्हीं प्राचीन सरकारकामें करीत आलां तशीच तुमची योग्यता

आहे. जसें काम लागेल तसें लिहिण्यांत येत जाईल. येथें अजंट साहेब बहादर यांची भेट होऊन बोलणें चालणें सर्व शिष्टाचार व्यवहार शिरस्तेप्रमाणें, व मीखलेट साहेब बहादर यांचीही भेट होऊन मेहरबानगीची नजर लक्ष ठेवून सदरेस रपोट जाहाली. आल्यावर बंदोबस्त लवकरच होईल. चिरंजीव रावसाहेब जालवणवाले यांसी अकस्मात् ज्वराचा उपद्रव होऊन आश्विन शुद्ध १५ रविवारीं दोनप्रहरीं वैकुंठवासी जाहले. परंतु आपले जिवंतपणीं हुशारी करून दस्तऐवज, खलिते लिहून गेले. मोठा ऐकून चित्तास फार खेद जाहला, तो पत्रीं कोठवर अंतपार लिहावा? लक्षावधि माणसांचें अन्न व छत्र गेलें. कारभारी वगैरे यांणीं पत्रें पाठविलीं. सपिंडी होणें आहे ती तेथें गेल्याखेरीज कशी होत्ये? बुंदेलखंडवाले अजंटसाहेब यांची चिटी येथील साहेब यांस येईल तेव्हां विचार बोलावयास येईल. वरचेवर पत्र पाठवून सविस्तर लिहीत जावें. मित्ती कार्तिक शुद्ध १ संवत १८९७ मुकाम जबलपूर. बहुत काय लिहिणें हे विनंति."

श्री.

"राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री भाऊ स्वामींचे सेवेशीं.

पो। गंगाधर मल्हार साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल ता॥ कार्तिक शु॥ १ पावेतों मुक्काम जबलपूर आपले कृपेंकरून वर्तमान यथास्थित असे विशेष. आपण पत्र कार्तिक वद्य ६ चे मित्तीचें पो। तें पावलें. परम संतोष जाहला. ऐसेंच निरंतर पत्र पाठवून संतोषवीत गेलें पाहिजे. यानंतर, प्राचीन वाकबगारीची कैफियत याद लिहून पाठविली ती पावली. काम जसें त्यांतील समजून लिहून देऊं. सरकारांत वाचून अक्षरशः दाखविली, व विनंति केली, आपण वडील सर्व समजोन माहितगारी आहेच. श्रीमंत राजश्री यजमानांची भेट होऊन मेहेरबानीची नजर देऊन सदरेस रपोट जाहली. बंदोबस्त लवकरच होईल. बंद पाहून पत्रें आलीं. श्रीमंत रावसाहेब जालवणवाले यांसी एकाएकीं बेजार होऊन वैकुंठवासी जाहले. मोठे अनर्थाची गोष्ट जाहली. ईश्वरसत्तेस उपाय नाहीं. व आपले जिवंतपणीं सर्व दस्तऐवज व खलिता यजमान यांचे कलमीचा लिहून गेले. तिकडील कारभारी वकीलमंडळ यांचीं पत्रें येत आहेत. सपिंडीचें श्राद्ध याचा विचार कीं तेथें जाऊन व्हावें

ह्या मानस. परंतु येथील साहेब यांचे नांवें तेथील चिटी येईल तेव्हां याचा विचार. वरकड सविस्तर मागाहून लिहून कळवूं. सदैव पत्रीं संतोषावाप्ति होत असावी. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंति.

हेंच पत्रीं दयाशंकर महता साष्टांग नमस्कार विनंति लिहिलें परिसोन लोभ करावा. मशारनिल्हे पत्रावरून कळेल हे विनंति. "

हीं पत्रें व त्यांत दर्शविलेली " गोविंदपंत बुंदेल्यांची कैफियत " आम्हांस उपलब्ध होण्याचा योग कसा आला तें आतां वाचकांस कळविणें इष्ट आहे. महाराष्ट्राच्या इतिहासाचे पूर्ण अभिमानी विद्वद्रत्नशिरोमणि नामदार न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे ह्यांनीं " मराठ्यांच्या इतिहासाचे अप्रसिद्ध भाग " म्हणून जे कांहीं भाग लिहिण्याचें योजिलें आहे त्यांत तंजावर, बुंदेलखंड, नागपूर (ओरिसा वगैरे), कित्येक प्रांतांतील मराठ्यांच्या राज्यसत्तेचा अंतर्भाव होतो; त्यांपैकीं ज्यांची ज्यांची ऐतिहासिक माहिती कागदपत्राच्या द्वारें मिळेल ती मिळवावी असा उद्देश मनांत आल्यावरून आम्हीं बुंदेलखंडांतील कित्येक मित्रांस पत्रें लिहिलीं व तिकडे प्रवासही केला. त्यामध्यें गोविंदपंत बुंदेल्यांचे वंशज, गुलसराईच्या राजघराण्यांतील पुरुष व सागरचे सुभेदार ह्यांच्या भेटीचा लाभ झाला. त्यांस बुंदेलखंडांतील मराठी राज्यसत्तेचा इतिहास प्रसिद्ध करण्याची इच्छा दर्शविल्यावरून त्यांनीं मोठ्या आनंदानें आपल्या जवळचे जुने कागदपत्र आमच्याकडे पाठवून दिले. त्यांच्या आधारानें " मराठ्यांचे पराक्रम " (बुंदेलखंड प्रकरण) नामक एक पुस्तक स्वतंत्र रीतीनें प्रसिद्ध केलें आहे. ह्या कागदपत्रांमध्यें " गोविंदपंत बुंदेल्यांची कैफियत " नामक एक जुनी बखर कर्नल स्लीमन साहेबांकरितां लिहिलेली आम्हांस उपलब्ध झाली ती आज प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

ही बखर व वरील चार पत्रें सागर येथील सद्गृहस्थ रा. रा. धुंडिराज केशव लघाटे यांचेकडून सागरचे सुभेदार श्रीमंत रा. रा. शंकरराव ह्यांनीं पाठविलीं. रा. रा. धुंडिराज केशव लघाटे हेही बखर लिहिणारे गृहस्थ रा. रा. रामचंद्र कृष्ण लघाटे ह्यांच्या बंधूचे नातू होत. ह्यांनीं आपल्या घराण्याची संक्षिप्त हकीकत पुढें लिहिल्याप्रमाणें दिली आहे:—

" घराण्याचे मूळ पुरुष केशव रघुनाथ लघाटे हे असून त्यांस

गोविंद, विनायक, रामचंद्र, सदाशिव, आणि गोपाळ असे पांच पुत्र होते. पैकीं सदाशिव केशव हे आपले पुतणे कृष्णाजी रामचंद्र ह्यांस समागमें घेऊन गोविंदपंत बुंदेल्यांच्या बरोबर पुण्याहून बुंदेलखंडांत आले. ह्यासमयीं गोविंदपंतांचा अंमल काल्पीपासून अंतर्वेदपर्यंत होता. सदाशिव केशव हे फार पराक्रमी पुरुष असून त्यांनीं गोविंदपंतांस वेळोवेळीं उत्तम साह्य केल्यामुळें त्यांस त्यांनीं अंतर्वेद इलाख्यांतील फफुंद व सकुराबाद ह्या दोन परगण्यांचे फडनविशीचें काम सांगितलें. तें त्यांनीं दहा वर्षें केलें व नंतर संन्यास ग्रहण केला. तेव्हां गोविंदपंतांनीं त्यांचे पुतणे कृष्णाजी रामचंद्र ह्यांस अंतर्वेदींतील इटावा महालाची बक्षीगिरी व फडनविशी दिली. त्यांस सालीना पुढील तनखा मिळत असे.

बक्षीगिरीचें वर्षासन	४६००
फडनविशीचें वर्षासन	८२००
परगण्यावरील हक्क शेंकडा एक रुपया-प्रमाणें तेरा लक्ष जमाबंदीवर ..	१३०००
स्वारांवरील नेमणूक	२०००
प्याद्यांवरील नेमणूक	५०००
एकूण	३२८००

हें काम त्यांनीं संवत् १८३२ पर्यंत केलें. नंतर पुढें श्रीमंत नारायणराव पेशव्यांचा वध होऊन पेशव्यांच्या दरबारांत गोंधळ झाला. त्या वेळीं तो प्रांत लखनौवाल्या नबाबाकडे गेला; सबब कृष्णाजी रामचंद्र पुण्यास परत आले. पुढें संवत् १८३६ मध्यें त्यांस मुजुमदारीची दरख मिळून ते सागरास गेले. त्या वेळीं सागरचे सुभेदार बाळाजी गोविंद ह्यांनीं त्यांस वर्गी परगण्याचें काम दिलें. व त्यांचे चिरंजीव रामचंद्र कृष्ण ह्यांस मुजुमदार नेमिलें. ह्या कामगिरीबाबद त्यांस सालाचे ८३७० रुपये मिळत असत. संवत् १८४२ मध्यें कृष्णाजी रामचंद्रांस देवाज्ञा झाली. ह्यांस रामचंद्र, लक्ष्मण, नारायण व वामन असे चार पुत्र होते. ते चौघेही कर्तृत्ववान् असल्यामुळें त्यांस सरकारी कामें मिळालीं. रामचंद्र कृष्ण हे वर्गीचें काम पाहूं लागले; लक्ष्मणरावांची मुजुमदारीवर नेमणूक झाली;

नारायणराव ह्यांस हट्याचें किल्लेदार नेमिलें; व वामनराव हे फौजी सरदार झाले. गढा प्रांत नागपुराकडे गेल्यावर रामचंद्र कृष्ण दरबारीं हजर राहून, मोरो विश्वनाथ सेनापतींची मुसाहबत करीत असत. व ते वारल्यानंतर त्यांस नायब सेनापति नेमण्यांत आलें. त्याबद्दल त्यांस ३००० रुपये तनखा मिळत असे. संवत् १८५७ मध्यें विनायकराव चांदोरकर ह्यांस सुभायतीचीं वस्त्रें मिळाल्यानंतर त्यांनीं सर्व फौजेचें आधिपत्य व मुसाहबत मुलकी हीं दोन्ही कामें रामचंद्र कृष्ण ह्यांस दिलीं, हे दोन्ही अधिकार त्यांनीं सुमारें १८ वर्षें चालविले. त्यांस दरसाल ६४५६ रुपये मिळत असत. पुढें संवत् १८७४ सालीं सागर प्रांत इंग्रजांकडे गेला. तेव्हां त्यांस पेनशन मिळालें. हे गृहस्थ सर्व राज्याचे पूर्ण माहीतगार व मोठे विद्याव्यसनी होते. ह्यांनींच गोविंदपंत बुंदेल्यांची कैफियत लिहिली आहे.

लक्ष्मण बापू लघाटयांकडे मुजुमदारीचें काम संवत् १८४२ पासून १८७३ पर्यंत होतें. त्यांस २००० रुपये मिळत असत. त्याशिवाय सरंजाम खर्च, व जमाबंदीवरील हक्क मिळत असत. ह्यांस माधवराव, बिसूदादा, दामोदर व केशव असे चार पुत्र होते. ह्यांपैकीं वडील चिरंजीव माधवराव ह्यांनीं राज्य बुडण्यापूर्वीं मुजुमदारीचें काम कांहीं महिने केलें. पुढें दोन वर्षांनीं त्यांस देवाज्ञा झाली, व त्यांची स्त्री सती गेली. केशव लक्ष्मण यांचे चिरंजीव धुंडिराज केशव लघाटे हे सांप्रत सागर येथें आहेत."

वरील हकीकतीवरून ही कैफियत लिहिणारे गृहस्थ राज्यकारभारांतील पूर्ण माहितगार, राजदरबारीं वागलेले व जीवंत इतिहासच होते असें म्हणण्यास हरकत नाहीं, तेव्हां अशा गृहस्थांनीं लिहिलेला इतिहास महत्वाचा असला पाहिजे हें उघडच आहे. ह्याच इतिहासास कर्नल स्लीमन साहेबांनीं फार महत्व दिलें आहे.

" गोविंदपंत बुंदेल्यांच्या कैफियतीच्या " आम्हांस एकंदर चार प्रती मिळाल्या आहेत. एक प्रत श्रीमंत रा० रा० गणपतराव सुभेदार यांजकडून, एक प्रत श्रीमंत रा० रा० कृष्णरावसाहेब गुलसराईवाले यांजकडून, एक प्रत रा० रा० माधवराव फडणीस ह्यांजकडून, आणि एक प्रत रा० रा० धुंडिराज केशव लघाटे यांजकडून. ह्या चारी प्रतींत विशेष भेद न वाटल्यामुळें

रा० रा० लघाटे यांच्याच प्रतीस प्राधान्य देऊन तीच शुद्ध करून छापली आहे. गोविंदपंत बुंदेल्यांच्या प्रतापशाली घराण्याची कीर्ति इतिहासप्रकाशानें चिरकालिक करून ठेवण्याचें श्रेय वर निदर्शित केलेल्या चारी सद्गृहस्थांकडे आहे, तेव्हां त्यांचे सर्व महाराष्ट्रीयांच्या वतीनें जितके आभार मानावेत तितके थोडेच आहेत.

" गोविंदपंत बुंदेल्यांची कैफियत " वाचूं लागलें असतां वाचकांस सागराकडील मराठी भाषेच्या मिश्र स्वरूपाची बरीच मौज वाटेल व तिकडील कित्येक अपरिचित पुरुषांचीं नांवें समजण्यासही बरीच अडचण पडेल, तथापि टीपांच्या द्वारें तत्संबंधीं विशेष माहिती देऊन जेवढा खुलासा करणें शक्य होतें तेवढा केला आहे. त्यामध्यें गैरसमजानें किंवा माहितीच्या कमतरतेमुळें कांहीं चुका झाल्या असल्यास त्याबद्दल वाचक क्षमा करोत आणि हा अप्रसिद्ध इतिहास त्यांच्या आदरास प्राप्त होवो, एवढीच इच्छा आहे. ती सफल होवो.

गोविंदपंतांची कैफियत हातीं आल्यानंतर आम्हांस बुंदेलखंडाच्या राजधानीचें शहर जें सागर त्याची कैफियतही प्राप्त झाली आहे. ती पुरवणीच्या रूपानें ह्या कैफियतीच्या शेवटीं जोडली आहे.

प्रकाशक.

सर्वांस वाटल्या. सर्वांनीं आपल्या विभवानुसार वस्त्रेंभूषणें बाबासाहेबांस दिलीं. नंतर भोजनाचा समारंभ होऊन सर्व मंडळीचीं भोजनें सरकारांत झालीं. याप्रमाणें विधान होऊन पुढें चार वर्षांनीं श्रावण शुद्ध ९ सन १८९४ चे सालीं श्रीमंत बाईसाहेबांचा काळ झाला.

कलम १

२२

येणेंप्रमाणें कलमें श्रीमंत राजेश्री बळवंतराव रघुनाथ बाबासाहेब यांचे आज्ञापत्र आश्विन शुद्ध २ सन १८९७ जबलपूरचे मुक्कामचें रामचंद्र कृष्ण लघाटे मजमदार यांस आलें. त्यानीं आपले वडिलांचे सांगितल्याचें आठवणीचें व आपण पाहिल्याचें सर्व वृत्त लिहून देऊन भिकाजी सदाशिव ठाकूर यांचे हवालीं सरकार आज्ञापत्रान्वयें कैफियत केली. त्याची पावती सरकारची कार्तिक शुद्ध १ सन १८९७ मित्तींची भिकाजी सदाशिव ठाकूर याणीं आणून दिली. मित्ती कार्तिक शुद्ध ७ मुक्काम सागर.

समाप्त.

गोविंदपंत बुंदेल्यांची वंशावळ.

विठ्ठलभट खेर नेवरेकर.
(मूळपुरुष.)
|
नरसोपंत.
|
गोविंदपंत.
|
गणेशपंत.
|
गोविंदपंत.
|
बाळाजीपंत.
|
गोविंदपंत बुंदेले.
(दत्तक बुरमाडकर खेर ह्यांचे वंशांतील बुंदेल खंडांतील पहिले सुभेदार संवत १७८६।१८१७.)

(१) बाळाजी गोविंद ऊर्फ थोरले बाबासाहेब
(सागर संस्थानचे अधिपति संवत् १८१७–१८५६.)
|
रघुनाथराव आबासाहेब
(संवत् १८५६–१८५८.)
|
बळवंतराव बाबासाहेब
(दत्तक)
|
रघुनाथराव
(दत्तक; हे जबलपुरास असून त्यांस इंग्रजसरकाराकडून सालीना ५००० पोलिटिकल पेन्शन मिळत असते.)

(२) गंगाधर गोविंद ऊर्फ धाकटे बाबासाहेब
(जालवण संस्थानचे अधिपति संवत् १८१७–१८५८.)
|
गोविंदराव नानासाहेब
(संवत् १८५८–१८७८.)
|
बाळाजी गोविंद
(संवत् १८७९–१८८८.)
|
राव गोविंदराव
(दत्तक; संवत् १८८८–१८९८ त्यांच्या पश्चात् जालवण संस्थान खालसा झालें.)

(गोविंदपंत बुंदेल्यांच्या कैफियतीची पुरवणी)

सागरची कैफियत.

कैफियत सागर वगैरे जागा कधीं आली, पुढें वहिवाट राहिली, व [1]पर्णावाल्याकडून हिश्याची जागा लागली वगैरे कलमें.

सागरप्रकरणीं तपशील. ज्यांत शहरचा किल्ला कधीं कोणीं बांधला, व सागर कोणते इलाख्यांतील व अम्मलदारी कधीं जाहली, वगैरे सर्व मजकूर समजे ऐसें लिहिण्याची आज्ञा जाहली, त्याजवरून विनंति लिहिली आहे.

१ पूर्वी सागराहून गडपहारा उत्तरेकडे दीड कोसावर पहाडावर व कांहीं खाल पावेतों वस्ती व पहाडाचेवर आसपास [2]पथरी कोटासारखी लहान भिंत, कोठें कोठें बुरूज, त्याचे आंत वस्ती, व तेथील राजे दांगी जातीचे प्राचीन दहा वीस पिढ्यांपासून राज्य करीत आले, त्यांचे महाल बैठकी पक्क्या होत्या. याचे खालीं जागा दुदगड पहारा, तालुके रणवली व जैसिंग नगर हे तालुके एकूण तीन तालुके लहानसें राज्य होतें. परंतु दैव विपरीत. तेसमयीं थोडे कारणावरून नाशास पावलें. त्याचा संबंध छत्रसाल राजाकडील वकील पुण्याहून येतेसमयीं गडपहाऱ्याचे उत्तर दक्षण दोहींकडे दोन तळीं होतीं, तेथें डेरा करून राहिले. वकील राजे यांचे नातलगांतील होते, परंतु एकाक्ष. हे दांगी राजानें ऐकोन बरदास्त करणेकरितां मेजवानी देऊन भले माणूस पाठविले, ते सर्व एकाक्ष निवडून पाठविले. भले माणसाचे स्वारीचा घोडा, ज्यावर बसून गेला, तोसुद्धां काणा. हें छत्रसालराजाचे वकिलानें पाहून आपली तर्क केली हे जाणोन पर्ण्यास जाऊन, प्रथम दांगी राजाचे मस्तीचें वृत्त कळवून, क्रोध आणून फौज रवाना केली, आणि गडपहारा किल्ला पाहून घेऊन वस्ती लुटली. दांगी राजानें पूर्वीच पलायन केलें होतें. त्याचे महाल वगैरे

---

१ पर्णावाल्याकडून—पर्णा-पन्ना येथील राजा छत्रसाल याजकडून.

२ पथरी—दगडी.

लुटोन घेतलें. ते वेळेपासून उजाड जाहलें. परगण्याचे बहुत गांव लुटून जाळिले. तेंव्हां रयत पाहिजे तिकडे निघोन गेली. तेसमयीं सागर तळें मोठें म्हणून नांव पडलें होतें. त्या तळयाचे उत्तरेकडे बांध, त्याजवर पूर्वी दांगी राजांनीं शिकार खेळण्यास लहानशी गढी बांधली होती, परंतु आबादी कांहीं नव्हती. शिर्फ[1] चहूंकडे डांगे[2] आहे. तेंव्हांपासून राजाचें राज्य जाऊन बुंदेल्यांचे हस्तगत. परंतु दुही बखेडयामुळें बुंदेल्यांनीं कुरवाईवाले नबाबांस ती जागा दिली. कांहीं दिवस नबाबाकडे राहिली. तंव बादशाही सुभेदार महमदखा बंगस छत्रसाल यांजवर फौज घेऊन आले. त्याचें पारिपत्य पेशवे सरकार येऊन करून बंगसास बुंदेलखंडांतून हाकून दिल्हा. छत्रसाल राजांनीं राज्याचे तीन भाग करून एक पेशवे सरकारास दिल्हा. ही लढाई सन (संवत) १७८२ त जाहली. नंतर कांहीं वर्षांनीं पेशवे सरकारांतून पंतसाहेब आले. ठरावाप्रमाणें वांटा दिला. तेसमयीं नबाबाकडून गडपहाऱ्याची जागा घेऊन यांचे स्वाधीन केली. वांटणीची जागा व हिऱ्याचे खदाणींत[3] तिसरा हिस्सा करून दिल्हा.

कलम १

१. श्रीमंत पंतसाहेब याणीं वांटयाची जागा निराळी नव्हती, आणि दिवसगत जाहली, म्हणोन उभयता बंधु जगतराज व हिरदेसा याणीं आटोपली. सर्व जागा म्हणून आपआपले जाग्यांतून तिसरा वांटा जमाबंदी कमी बसे-बाढवून आंख[4] पुर्ता करून राजी केले. तेसमयीं गडपहाऱ्याचे दांगी राजे खराबींत होते ते शरण आले. तेंव्हां दहा हजारांची जागा त्यास लावून दिल्ही. ते स्वस्थ बसले. आणि राजधानी कोठें करावी तो विचार पाहून सागर तळयाचे आसपास डांग कापवून किल्ला थोर करण्याचें काम लाविलें, व वस्तीचे आबादानीचा प्रारंभ केला. छत्रपुराहून व माखाडेहून व गुजराथेंतून व शिरोंजेहून कौल करार देऊन थोर नामांकित बोलाविले. त्यांचे मागें आणखी आपले दक्षणी लोक दक्षणेहून व

१ शिर्फ—फक्त.

२ डांग—जंगल.

३ खदाण—खाण.

४ आख—अंक ठरावाचा आकडा.

किरकोळ दांगीराज्यांतील तेही आले. व जमीदारांस गांव इजारा पांच पांच शेर तूप घेऊन दिले, वस्ती करविली. नंतर जशी जशी अमदानी गांवगन्ना पाहून जमाबंदी वाढवून घेऊं लागले. तेव्हांपासून सागरचा लौकिक प्रसिद्ध होऊं लागला. किल्लाही तयार जाहला व वस्तीही बहुत होऊन गेली, प्रथम दरगांवचे ऐवजाशिवाय जमा होय त्याचा तिसरा हिस्सा देत होते. उपरांत सभासिंग राजाचे वेळेस जागा कापून दिल्ही व खदाणेवर गुमास्ता व शिबंदी पाठविले. दांगीराजाचा वंश आपणावर राज्य करितात ते आजपावेतों आहेत, परंतु उबारी लागूं लागली. तो रुपया वसूल न होय सबब गांव घेतले. तरी सहा सात हजारांची जागा हल्लीं पावतात. कलम.

१ दांगी राज्याचे तीन तालुके, रणावली, भैंसिगनगर, तरी पूर्ववत् कायम ठेविले. परंतु गडपहाऱ्याचे गांव सागराकडे लावून घेऊन सागरपरगणा गेला. सागर खास कसब्यांत वस्तींत जागा बहुत आली. त्यांत तीन चार गांव शाले. परंतु देहें, सुकारी व लंबर हे तालुके भिन्न भिन्न चालले आहेत. एक मौजे ललई ठेरी दुसरा मौजे बाबनसेरी वस्तींतच आहेत. सागर कसब्याची डांग कापली, बगीचे व धान्याचे गडे वगैरेकरितां नवीन जागा निराळी, त्यांत कांहीं माफी व कांहीं अमलांत आली. याप्रमाणे सागर कसब्याचा लंबर(!) आपले अम्मलदारीपासून गांव पंतसाहेब व बाबासाहेब आदिकरून मालिक बहुतकरून काल्पीप्रांतांत राहणें करीत. इकडे कारभारी आज्ञांकित राहून वहिवाट करीत असत. गढामंडल्याची जागा आल्यावर श्रीमंत कैलासवासी आबासाहेब राहूं लागले. परंतु अखेरी त्याच प्रान्तीं जाहली.

कलम.

१ बुंदेल्याकडील वांटणींत दांगी राजाची लिहिल्याप्रमाणें जागा जाहली, अशी कोणाची स्वतंत्र राज्याची नाहीं. याखेरीज वांटणीशिवाय आणखी आसपासचे किरकोळ राजे लोधी, अहिर गोंड या कुळांतील यांस व कांहीं बुंदेले लहानसहान जागा दाबून होते त्यांस जरबेंत आणून त्यांची जागा घेऊन, त्यांस दुसरी जागा देऊन,ताबेदारींत राहवें ऐसें करून ठेविलें. ते आज तागायत चालू आहेत. कुरई, खेमलासें, हटें वगैरे याच रीतीचे आहेत. राजगिरी तालुका राहिलीचे पोटीं सागराहून पूर्वेकडे

दक्षणेचे मध्यें आठ नऊ कोस, राजगिरींत श्री देवीची मूर्ति देवालय आहे. वस्ती थोडीच. खालून नदी पहाडी निघाली आहे. तेथून रहिली हलके (बाके) तीन कोस आहे, राजगिरीस वस्ती जवळ उत्तरेचे आंगे तळें आहे. देवालय प्राचीन परंतु श्रीमंत मातुश्री लक्ष्मीबाई साहेबांनीं श्री पंढरपूरचें देवालय बांधिलें, ते समयीं श्री देवीचे देवालयाची दागदोजी कांहीं नवें काम केलें.

कलम.

१ पंतसाहेब येथील बंदोबस्त व जमाबंदी आदिकरून खर्च थोडा ठेविला. येणेंकरून द्रव्याचा संग्रह बहुत जाहला. व बुंदेलखंड येथील जाबसाल पुण्यांत करूं लागले. येणेंकरून सर्वत्र लौकिक प्रसिद्ध झाला. पुण्याचे दरबारीं विश्वास आणि अख्त्यार होऊन ज्या कामांत पडत तें होय. छत्रसालराजाचे वंशांतील बुंदेले कोणी होते त्यांस छत्रसाल याणीं बेवतन केलें. तेव्हां त्यांस बरोबर घेऊन पुण्यास गेले. तेथें बोलणें करून आठ लक्षांची ८००००० जागा उभयतांचे वांटयांतून घेऊन आपले जवळ ठेविले. सागराहून आठ कोस पूर्वेकडे गढाकोटा हरदेनगरीं स्थापन केली. तोंपावेतों त्यांचीं बायकामुलें आपले इलाख्यांत ठेवून खर्च चालवीत गेले. त्यांस जागा मिळाल्यावर आपली चौथ लावून त्यांजवर गृहस्थ तैनात केले. येणेंकरून सर्व बुंदेलखंड व सर्व मुसलमानी संस्थानें भोपाळ व कुरवाइ वगैरे यांचे वकील नेहेमीं पंतसाहेब यांजवळ राहूं लागले. दरवर्षीं पुण्यास जाणें त्याच प्रसंगीं कर्नाटकचे स्वारींत प्रसंग खर्चाचा पडला. तेव्हां पेशवे सरकारांत शहाण्णव लक्ष ९६००००० रुपये दिल्हे. त्यासमयीं मर्जी प्रसन्न होऊन बरोबरचें पत्र व मुतालकी शिक्के देऊन सन्मान बहुत केला, आणि अंतरवेदीची जागा शिंदे होळकर यांचे जिम्मेस होती ती पंतसाहेबांचे स्वाधीन केली. त्या कामावर आपण राहून व पुण्यास वकिलीवर बाबूरावजीस व गढामंडळ्याचे राजाकडे खंडणीचे कामावर वगैरे आपले बंधु काशीपंत व बिठलपंत बुरमाडकर यांची योजना केली.

कलम.

१ थोरले श्रीमंत माधवरावसाहेब पेशवे यांणीं आपला अंतकाळ जवळ आला हें समजोन पेशवाईंतील कलमबंदी लिहून दिल्ही. कलमें स्वदस्तुरीं

सहा. त्यांत आपले सरदारीप्रकरणीं कलम लिहिलें कीं, पंतसाहेब व त्यांचे मागें बाळाजीबावांनीं हिंदुस्थानांत नकशा सरकारचा चांगला ठेविला व ऐवज बहुतसा दिल्हा; व पंतसाहेब सरकारकामास आले, सबब त्यांचे व आपले वंशांत कोणी असेल तोंपावेतों संस्थानाची घालमेल करूं नये व पुण्यास आल्यावर कोशभर सामोरें जावें. व खिलत, दागिने, वस्त्रें तपशीलवार द्यावीं. हें लिहून दिल्हें. चौघडा व लगी गोहोदचे मुकामीं दादासाहेब यांणीं दिल्ही. मुतालिकी शिक्के पंतसाहेबांस पेशजीच श्रीमंत नानासाहेब पेशवे यांणीं दिलेच होते. कलम.

१ स्मरणार्थ.

१ श्रीमंत पेशवे थोरले बाजीरावसाहेब परण्याचे मदतीस आले सन १७८२ अथवा सन १७८४.

१ जागेची वांटणी होऊन तीन हिस्से जाहले, त्या कामावर पंतसाहेब गोविंदपंत. छत्रसाल सन १७९६ पावेतों हिस्सा देत गेले. नंतर देण्यास तक्रार जाहली. तेव्हां पंतसाहेब आले. सन १७९८ येऊन जप्ती केली. ऐवज घेत राहिले. नंतर वांटणीची जागा अलाहिदा करून घेतली सन १८०२.

१ नबाब गाजुदीनखान वजीर लखनौवाल्यांकडील त्याचा व पेशवे सरकारचा इकलास[१] सबब नबाब यासी जहागीर पुण्याहून सनद करून जागा लावून दिली. यमुना तीर काल्पीसुभा येथील बावनी सनद चंद्र २२ जिल्काद सन सलास सबैन सन १८२९.

१८७००० किता.

१३०००० लक्ष्मण बल्लाळ यांसी जहागीर जैसिंग नगर व खेमलासें. प्रांत बुंदेलखंड. सनद चंद्र २९ मोहोरम. सन तिसा सबैन सन १८३५.

२००००

१ इकलास—स्नेह, सख्य.

अमात्य बावडेकर यांची कैफियत.

कैफियत अमात्य बावडेकर यांचें मूळ वतन कल्याण भिवंडीनजीक कोलवणांतील देशमुखी तेथील. यांचे दायाद यांणीं दावा करून अमात्य यांचे पूर्वजांचा कंटाळा केला. त्यांत एक स्त्री गरोदर होती ती पळून सुरतेकडे जाऊन फिरत फिरत देशीं पुणेप्रांतीं शिवापुरीं ठकार दीक्षित देशस्थ होते त्यांचे घरीं येऊन जाहलेलें वर्तमान सांगून फार कष्टी जाहली. ते समयीं दीक्षित यांनीं त्या बाईचें समाधान करून सांगितलें जें—तूं माझी धर्मकन्या आहेस. म्हणोन वचन देऊन त्या बाईस घरीं ठेवून घेतली. नंतर त्या बाईचे पोटीं सोनभट जाहले. ते बहुत विद्वान्. त्या कालीं श्रीमन्महाराज छत्रपति शककर्ते यांहीं राज्यक्रमास प्रारंभ केला होता. आणि किल्ले सिंहगड घेऊन दीक्षित ठकार यांजकडून मुहूर्त विचारण्याचा विश्वास होता; व ठकार दीक्षित यांस वर्षासनें व इनाम जमीन देऊन कुटुंबाची स्वस्थता करून दिली होती. पुढें सोनभट बहुत चतुर विद्वान् निघाले. यामुळें महाराजांकडे मुहूर्त सांगण्यास व ठकार दीक्षित यांचें वर्षासन मागून घेण्यास दीक्षित यांजकडून सोनभट महाराजांकडे जात होते; व महाराजांचा विश्वास सोनभटजी यांजवरही होता. त्यास सोनभटजी यांस पुत्र दोन. ज्येष्ठ पुत्र आबाजी सोनदेव. धाकटे पुत्र निळो सोनदेव. हे उभयतां कर्ते, व निळो सोनदेव हे लिहिणार व बहुत चतुर. यांस किल्ले भोर येथील सबनिसीचा धंदा सांगून कुटुंब आणवून ठेविलें. ज्येष्ठ पुत्र आबाजी सोनदेव याजकडे महाराजांनीं सरदारीचें काम सांगितलें; आणि निळो सोनदेव (हे उभयतां) यांसी हणमंते यांजकडील मुजमीचा धंदा दूर करून मुजमीचें काम सांगितलें. ज्येष्ठ पुत्र आबाजी सोनदेव यांनीं कल्याण भिवंडी सर करून महाराजांचा अम्मल बसविला, आणि आपले दायाद यांणीं आपलें पूर्वजांचे खून केले होते त्याचा कट करून मोबदला केला; व कल्याण भिवंडी येथील सुभा विजापुराकडून रजपूत याजकडे होता. तो सुभेदार पळून गेला. त्याचें कुटुंब सांपडलें.

तें कुटुंब कैद केलें. त्यांत सुभेदार याची सून अति सुंदर रूपवान् होती. त्या सुनेस ठेऊन घेऊन, झाडयानिशीं कुटुंबाचीं मनुष्यें सोडून दिलीं. आणि सुभेदार याचे सुनेस पालखींत घालून पुणें मुक्कामास महाराजांचे सेवेसी आणून नजर केली. तेव्हां महाराजांनीं सुभेदार याचे सुनेस कचेरींत आणून पाहून महाराज बहुत संतोष होऊन महाराजांनीं आज्ञा केलीजे. तीर्थस्वरूप मातोश्री जिजाऊ महाराज या बाईप्रमाणें सुंदर असती तरी आम्हींही अति सुंदर जाहलों असतों. सरदार लोकांनीं हुजूर नजर या बाईस आणून दिली, हें काम फार अयोग्य केलें. म्हणून आज्ञा करून त्या बाईस वस्त्रें व अलंकार महाराजांनीं देऊन, पालखी व वृद्ध असाम्या बरोबर देऊन त्या बाईस विजापुरास भ्रताराकडे पाठवून दिली. आणि महाराजांनीं त्याच सभेंत आबाजी सोनदेव यास बोलावून आणून महाराजांनीं आज्ञा केलीजे, तुम्हीं या स्त्री बायकोस कैद करून हुजूर नजर आणली हें बहुत खोटें कर्म केलें. अन्य ज्ञातीचा कोणी असता तरी त्याचा शिरच्छेद केला असता. तुम्ही ब्राम्हण आणि सेवेचे उपयोगीं बहुत पडलां, यास्तव तुमचे कुटुंबाची बेजमी करून देतों. आजन्मपर्यंत भोरच्या किल्ल्यास सबनिसाचा धंदा करून रहावें. सरकारांत अतःपर येऊं नये तुमचें मुखावलोकन सरकारांत होणार नाहीं. याप्रमाणें महाराजांनीं आज्ञा करून त्याचे कुटुंबाचा बंदोबस्त करून देऊन किल्ले मजकुरास सबनिसीचे धंदेचे कामावर रवाना केलें. त्यास आबाजी सोनदेव याचा वंश भोर येथें आहे. त्या वंशास दर्शन कोणत्याही महाराजाचें जाहलें नाहीं. कोणत्याही महाराजांनीं आबाजी सोनदेव याचे वंशाकडील भोर येथील सबनिशीचे धंदेची घालमेल केली नाहीं तो किल्ला सचीवपंत यांजकडे आहे. १ कलम.

महाराजांचे राज्यांत स्वामिसेवा रामचंद्र निळकंठ अमात्य यांणीं करून आपले स्वपराक्रमानें मौजे तांदळी निमेगांव व जोशी व कुळकर्णपणाचें वतन मौजे मजकूर येथील मिळविलें आहे. १ कलम.

नारो शंकर हे मौजे गांडापूरचे कुळकर्णी. हे रामचंद्र निळकंठ अमात्य यांचे सन्निध शागिर्दीची सेवा करून होते. पुढें श्रीमन्महाराज शंभु छत्रपति महाराज–श्रीमन्महाराज शाहू छत्रपति महाराजांचे वडील–यांहीं शके १६१०

सालीं ज्येष्ठ शुद्ध १० तुळापूर मुक्कामीं कैलासवास केल्यावरी श्रीमन्महाराज राजारामसाहेब महाराज यांहीं तीर्थस्वरूप श्रीमन्महाराज मातोश्री येसूबाईसाहेब यांसी व चिरंजीव श्रीमन्महाराज शाहूमहाराज यांसी किल्ले रायगडीं ठेवून किल्लेवरी कारभारी पिंगळे यांस ठेवून, महाराजांची स्वारी किल्ले विशाळगड येथें येऊन राहिली, नंतर कांहीं दिवसांनीं शके १६११ सालचे अखेरीस श्रीमन्महाराज राजारामसाहेब महाराजांची स्वारी विशाळगडाहून चंदीस पशरव जाहली; आणि राज्याचे बंदोबस्तास देशीं किल्ले विशाळगडास रामचंद्र निळकंठ अमात्य यास ठेविलें होतें. महाराजांची स्वारी चंदीस गेल्यावरी अमात्य याणीं विशाळगडीं राहून फौजा जमा करून औरंगजेब पादशहाचे फौजेबरोबर लढाया देऊन मुलूख काबीज करीत होते. ते समयीं परशराम त्रिंबक कुळकर्णी किनईकर, व नारो शंकर कुळकर्णी मौजे गांडेकर व बाळाजी विश्वनाथ भट श्रीवर्धनकर देशमुख हे त्रिवर्ग अमात्य यांची सेवा शागिर्दीची करून होते. त्यांस, त्रिवर्गांचें चातुर्य व शहाणपण पाहून कामें योजून त्रिवर्गांस सांगितलीं.

१ परशराम त्रिंबक यांस दफ्तरच्या लिहिण्याचें काम सांगितलें.
१ नारो शंकर यांस पागेचें काम सांगितलें.
१ बाळाजी विश्वनाथ यांस कोठीचे लिहिणेचें काम सांगितलें.
—
३

पुढें परशराम त्रिंबक, व नारो शंकर ह्या उभयतांचे आंगीं शौर्यत्व पाहून फौजेच्या सरदारीचीं कामें अमात्य पंतांनीं सांगितलीं. नंतर फौजा बरोबर घेऊन जाऊन, पादशहाचे फौजे बरोबर लढाया देऊन, किल्ले, कोट, तालुके सोडविले हें वर्तमान महाराजांस चंदी मुक्कामीं निवेदन जाहल्यावरी महाराजांनीं उभयतांस किताबयुक्त आज्ञापत्रें सादर जाहलीं. बि॥

१ परशराम त्रिंबक समशेर बहादर यास आज्ञा केली ऐसीजे.
१ नारो शंकर मदारूलमहाम यासी आज्ञा केली ऐसीजे.

या अन्वयें महाराजांनीं उभयतांस किताब देऊन, किल्ले, कोट व तालुके उभयतांनीं सर केले होते ते उभयतां यांजकडे महाराजांनीं कायम ठेविले. पुढें शके १६०८ सालीं महाराजांची स्वारी धाता नाम संवत्सरीं

चंदीहून देशीं आली. त्यास महाराजांची स्वारी चंदीहून निघाली ती किल्लेचे बाहेर गुप्तरूपें स्वारी होती. चंदीचा किल्ला शके १६१८ धाता नाम संवत्सरीं चैत्र शु॥ १ प्रतिपदा ते दिवशीं झुल्पिकारखान यांनीं घेतला. त्याचे अगोदर महाराजांची स्वारी पाळण्यांतून खंदक पार होऊन लष्करांत गुप्तरूपें सात आठ रोज राहिली होती. नंतर किल्लेंतून श्रीमन्महाराज राण्यासाहेबांच्या स्वाऱ्या तीन व नाटकशाळा एक व श्रीमन्महाराज या उभयतांच्या स्वाऱ्या लष्करांत येऊन पोहोंचल्यावरी देशीं महाराजांची स्वारी निघोन आली. त्यास प्रथम महाराजांची स्वारी विशाळगडास दाखल होऊन किल्ले मजकुरीं राण्या साहेबांच्या स्वाऱ्या व महाराज उभयतां यांस ठेऊन, महाराजांची स्वारी राज्य काबीज करीत किल्ले सिंहगडास दाखल जाहली. नंतर शके १६२१ सोळाशें एकवीस सालीं किल्ले सिंहगडाहून औरंगाबाद येथें पादशहाचा मुक्काम होता तेथें जाऊन फौजसुद्धां चिरंजीव शाहूमहाराज यांनीं हस्तगत करून घेऊन यावें, असें साधन करून महाराजांची स्वारी फौजसुद्धां जाहली होती; परंतु श्रीमन्महाराज शाहूमहाराज छत्रपति हस्तगत जाहले नाहींत, सबब पादशहाचे फौजेवरी छापा घालून फौजेची नासाडी फार केली. आणि परत येतेसमयीं जालनापूरची पेंठ लुटून खंडण्या घेत बेंहा मांडव्यावरून कात्राबाद मांडवगणचे मागें येत असतां फकीर याचा गांव होता.

त्या गांवीं पादशहाची फौज होती त्या फौजेनें चाल केली; सबब लढाई होऊन तो गांव लुटून पुण्यावरून किल्ले सिंहगडास स्वारी येऊन दाखल जाहल्यावरी महाराजांस नवज्वर होऊन शके १६२१ प्रमाथीनाम संवत्सरीं फाल्गुन वद्य ८ स कैलासवास जाहला. नंतर श्रीमन्महाराज मातोश्री ताराबाईसाहेब यांहीं श्रीमन्महाराज शिवछत्रपति महाराज यांस किल्ले पन्हाळे मुक्कामाहून किल्ले विशाळगडास घेऊन जाऊन श्रीमन्महाराज शिव छत्रपति महाराज यांसी सिंहारूढ करण्याचे समयीं अमात्य–पद ह्मणमंते यास श्रीमन्महाराज राजाराम साहेब छत्रपति यांहीं चंदीचे मुक्कामीं दिलें होतें. ते देशीं आल्यावरी प्रल्हाद निराजी प्रतिनिधि यांचा काल जाहला होता; व प्रतिनिधिपद त्यांचे पुत्रास होतें, तें दूर करून ह्मणमंते यास प्रतिनिधिपद देऊन रामचंद्र निळकंठ यांस अमात्यपद दिलें, व हुकुमत पन्नाहपद अगोदरच दिलें

दिलें होतें. प्रतिनिधिपद श्रीमन्महाराज शिव छत्रपति महाराज यांचे राज्या-भिषेक समयीं हणमंते यांजकडील दूर करून परशराम त्रिंबक यांस प्रतिनि-धिपद दिलें. सचीवपद हेबळीकर कीरवंत ब्राम्हण यास चंदीचे मुक्कामीं महाराजानीं दिलें होतें; तें दूर करून नारो शंकर यास सचीवपद दिलें. पुढें धनसिंगराव जाधव याजकडे सेनापतीचें पद होतें. याजकडे बाळाजी वि-श्वनाथ हे लिहिणार फार, याजकरितां मशारनिल्हेस सेनापतीचे पंत अमात्य यानीं स्वाधीन केलें. ते त्यांचे पदरीं वाढले; आणि सेनापतीचे पदरीं बा-ळाजी विश्वनाथ सरदारी व मामलतीही करीत होते. नंतर शाहू महाराज देशीं आल्यावरी राज्यांतील सर्व सरदार व सरकारकून महाराजांचे शेवेसी हजीर जाहले. परशराम त्रिंबक याजकडे सातारा किल्ला होता. तो किल्ला लढ-वीत होते. किल्ला सर करून महाराजांनीं घेतला. परशराम त्रिंबक प्रतिनिधि सांपडले. तेसमयीं एक वर्ष कैदेंत होते. नंतर खंडो बल्लाळ चिटणीस यांचे विद्यमानें मर्जी संपादून मोकळे जाहले.

गदाधर प्रल्हाद नासिककर हे महाराजांबरोबर लष्करांत मर्जींत होते. त्यांस प्रतिनिधिपद दिलें होतें. तें दूर करून प्रतिनिधिपद परशराम त्रिंबक यास दिलें. गदाधर प्रल्हाद हे पद गेल्यावरी दोन महिनेनीं वा-रले. परशराम त्रिंबक यांणीं महाराजांस अर्ज करून किल्ले विशाळगडास अम्मल शाहू महाराजांचा होता सबब कुटुंब ठेवण्यास मागून घेतला. ते समयीं किल्ला निळो बल्लाळ चिटणीस याचे धाकटे बंधू याजकडे होता, तेथें कुटुंब नेऊन ठेविलें. व ज्येष्ठ पुत्र कृष्णाजी परशराम यांणीं श्रीम-न्महाराज मातोश्री ताराआईसाहेब व शिवछत्रपति महाराज यांची मर्जी सं-पादून किल्लेसुद्धां आपण हुकमांत वागून प्रतिनिधिपद घेतलें. हें वर्तमान शाहूमहाराजांस निवेदन होतांच परशराम त्रिंबक प्रतिनिधि यास पुन्हा कैद करून अवधूत बाबूराव व हणमंते यांस प्रतिनिधिपद सांगितलें. पर-शराम त्रिंबक तीन वर्षें कैदेंत होते. श्रीनिवास परशराम यांणीं महारा-जांची मर्जी बहुत तऱ्हेनें लढाईंत वगैरे संपादून परशराम त्रिंबक यास सोडवण्याचे उद्योगांत होते, तों कृष्णाजी परशराम यांणीं फौज घेऊन शाहूमहाराज यांचे प्रांतांत दंगा केला. हें वर्तमान निवेदन जाहलेवरी

परशराम त्रिंबक याचे डोळे काढणेविशीं हुकूम होऊन उरावर तख्ता ठेविला. हें वर्तमान श्रीनिवास परशराम यांणीं खंडो बल्लाळ चिटणवीस यास सांगितलें. ते समयीं चिटणीस स्नान करीत होते; तसेच भिजले धोत्रासुद्धां धांवून येऊन उरावर न्हावी बसला होता त्याचे तोंडांत मारून उरावरील तख्ता काढून परशराम त्रिंबक यास हातीं धरून महाराजांस अपशब्द बोलोन परशराम त्रिंबक यास आपले घरीं नेऊन स्नानास घालून भोजन ते व आपण एक पंगतीस करून तिसरे प्रहरीं परशराम त्रिंबक यास आपण महाराजासन्निध घेऊन येऊन सेवेसी अर्ज केलाजे. परशरामपंत आपला घ्यावा, आणि सेवकास निरोप द्यावा.

ते समयीं महाराजांनीं खंडो बल्लाळ चिटणीस यांचें बहूत प्रकारें समाधान केलें; व चिटणीस यांनींही विनंती केली. परशराम त्रिंबकासारखा सरदार यास यामुळतीनें मारूं नये. लढाईंत मारवावा. मुलांनीं अपराध केला हें महाराजांनीं मनांत आणूं नये. चिरंजीवानीं धन्याचे आज्ञेप्रमाणें फौज घेऊन आले. महाराजानीं यास आज्ञा केल्यास हेही फौज घेऊन हेही प्रांतांत जातील. ऐशी विनंती चिटणीस याणीं केले वरी महाराजांची मर्जी बहुत संतोष होऊन आज्ञा जाहली जे तुम्ही सांगाल त्याप्रमाणें परशराम त्रिंबक याचा बंदोबस्त करून देतों. तेव्हां चिटणीस याणीं विनंती केलीजे, यास प्रतिनिधीचें पद देण्याविषयीं महाराजांची आज्ञा व्हावी. त्यावरून महाराजांही आज्ञा केली कीं, आंगरे याचे पारपत्यास पिंगळे पेशवे व जिवाजी खंडेराव चिटणीस या उभयतांस पाठविलें. ते लढाईंत आंगरे यास सांपडले आहेत; त्याचें पारपत्यास बाळाजी विश्वनाथ शककर्ते यास फौज देऊन पाठविले आहेत. त्यास पिंगळे नाकर्ते. यास्तव परशराम त्रिंबक यास प्रधानपदाचीं वस्त्रें देतों. आज्ञाप्रमाण ह्मणोन खंडो बल्लाळ चिटणीस याणीं विनंती केली. त्यावरून शके १६३५ सालीं चैत्र प्रतिपदेस प्रधानपदाचीं वस्त्रें परशराम त्रिंबक यास झालीं. नंतर बाळाजी विश्वनाथ याणीं आंगरे यासी तह करून पिंगळे व चिटणीस यांस हातीं घेऊन आंगरे यास महाराजांचे भेटी सातारेस घेऊन आले. आंगरे याणीं महाराजांची सेवा एकनिष्ठपणें (करावी) ऐसें ठरलें वरी आंगरे यास किताब महाराजानीं सरखलपणाचा दिला. त्या संधींत अवचित

बाबूराव हणमंते प्रतिनिधि याचा काल जाहला; व बाळाजी विश्वनाथ कर्ता मनुष्य यास प्रतिनिधिपद द्यावें, ऐसें महाराजांचे मनांत आलें.

त्यावरून खंडो बल्लाळ चिटणीस यांणीं विनंती केलीजे जुने व नूतन हे स्वामीचे पदरचे. जो कर्ता तो सरकारचे उपयोगी; सेवक विनंती करितो; महाराजांचे मर्जीस आल्यास मान्य करावें. त्या समयीं महाराजांनीं आज्ञा केलीजे काकासाहेब, तुम्ही वृद्ध. स्वामीचे दौलतीकरितां सुख दुःख बहुत भोगलें. या दौलतीचे अहित तुम्ही करणार नाहीं. ही खात्री आहे. आपण विनंती कराल त्या अन्वयें करण्याविषयीं आज्ञा होईल, ऐसी महाराजांची आज्ञा जाहल्यावरी खंडो बल्लाळ चिटणीस यांणीं विनंती केली कीं, प्रतिनिधिपद परशराम त्रिंबक यास द्यावें. पिंगळे नाकर्ते यास्तव त्याचें पद परशराम त्रिंबक यास दिलें. ते बाळाजी विश्वनाथ यास प्रधानपद द्यावें. आणि रामचंद्र नीळकंठ अमात्य याचा काल जाहला असतां त्याचे चिरंजीव इकडे आले नाहींत. दफ्तरचें काम निळो बल्लाळ चिटणीस याजकडून चालविलें आहे. त्यास अमात्य पद हणमंते याचे चिरंजीवास द्यावें. व निळो बल्लाळ यास प्रधानपंताची चिटणिशी द्यावी. पिंगळे यांणीं स्वामीचे राज्यांत वडिलार्जित सेवा केली आहे यास्तव त्यास सरंजाम देऊन मरातिबेनी स्वामींनीं ठेवावें. ऐसी विनंती चिटणीस यांची ऐकून महाराजांची मर्जी बहुत संतोष जाहली. शके १६३५ विजयीनाम संवत्सर आषाढ शुद्ध सप्तमी पदाधिकाराचीं वस्त्रें जाहलीं.

१ परशराम त्रिंबक यास प्रतिनिधिपदाचीं वस्त्रें जाहलीं. त्या दिवसापासून उभयतां महाराजांकडील या वंशांत प्रतिनिधिपद आहे.

१ बाळाजी विश्वनाथ यास प्रधानपदाचीं वस्त्रें जाहलीं. त्या वंशांत बाजीराव रघुनाथ पेशवे शके १७३९ ईश्वरनामसंवत्सरपर्यंत चालली पुढें इंग्रज बहादूर यांचा अम्मल जाहला.

१ निळो बल्लाळ चिटणीस यास प्रधान पदाचे चिटणिसीचीं वस्त्रें जाहलीं. तीं बाजीराव रघुनाथ पेशवे पुणें सोडून जाईपर्यंत त्यांचे वंशांत चिटणिशी करीत आले. हल्लीं पुणें मुकामीं राजश्री दादा चिटणीस त्या वंशांतील आहेत. त्याजकडे दोन गांव मोकास बाबेचे व पेनशन दरमहा रु० १०० शंभर प्रमाणें १००० रुपये इंग्रज बहादूर यांजकडून पावतात.

१ अवचित बापूराव हणमंते यांचे पुत्र यांस अमात्य पदाचीं वस्त्रें जाहलीं. तीं शाहूमहाराजांनीं कैलासवास केल्यावरी रामचंद्र नीलकंठ अमात्य यांचे पुत्र शिवराम रामचंद्र, यांचे पुत्र बाबूराव शिवराम यांस अमात्य पदाचीं वस्त्रें राजाराम महाराजांचे कारकीर्दीस जाहलीं. तें समयीं मातोश्री ताराबाईसाहेब सातारे मुक्कामीं होती. हणमंते यांस इनामगांव ४ चार मौजे बरये व मौजे कनेरी, व पुणें प्रांतीं गांव दोन, शिवाय दहा हजारांचा सरंजाम मोंगलाईत चालत होता. तो पेशवाईंत जप्त जाहला. चार इनाम इनाम गांव चालत होते, त्यांपैकीं पुणें प्रांतांतील दोन गांव बाजीराव याणीं वंश नाहीं म्हणोन जप्त केले. मौजे कनेरी व वरये येथें त्यांचा वंश आहे. सबब त्यांजकडे दोन्ही गांव सातारे इलाखेंत चालत आहेत.

१ पिंगळे यांस तीन हजारांचा सरंजाम देशीं व मोंगलाईत देऊन ठेविले. त्यांचा सरंजाम बाळाजी बाजीराव प्रधान ऊर्फ नानासाहेब यांचे अखेरीपर्यंत चालला. पुढें मोंगलाईतील सरंजाम जप्त जाहला. देशीं दोन इनाम गांव मौजे वाटार प्रांत वांई व मौजे सिरवडें प्रांत कराड. हे दोन गांव इनाम पांच हजारांचा सरंजाम मोकासबाबेंचा वांई प्रांतीं व कराड प्रांतीं चालत होता तो बाजीराव रघुनाथ पेशवे यांणीं निमित्य ठेवून जप्त केला. त्या वंशांत राजश्री माधवराव पिंगळे सांप्रत आहेत. त्यांजकडे किल्ले प्रतापगड येथील श्री देवीचे अधिकाराचें काम, थोरले महाराजांपासून तें काम त्यांजकडे आहे. त्या चाकरीबद्दल कोंकणीं खेड एक इनाम आहे. तें सांप्रत चालत आहे. श्री देवीच्या अधिकारही त्यांजकडेसच आहे. इंग्रज बहादूर हे पुणें मुक्कामाहून दरमहा रुपये १०० शंभर पेनशन देतात. सातारकर महाराजांकडून दरमाहे रुपये ५० पन्नास देऊन मशारनिल्हे पिंगळे यांस सातारें मुक्कामीं ठेवून घेतले आहेत. कलम.

१ नारो शंकर गांडेकर कुळकर्णी यांस सचींव पदाचीं वस्त्रें पन्हाळे मुक्कामीं जाहलीं. पुढें शाहूमहाराज देशीं आल्यावरी भेटीस बोलाविलें. तें समयीं नारो शंकर याणीं मातोश्रीस तारा—आईसाहेब यांजपाशीं शफत केली होती; व भोर मुकामीं होते. सबब बोलावणें येतांच सन्यास घेऊन जहर घे

तळेवरी काल भोर येथें जाहला. नंतर त्यांचे चिरंजीव शंकराजी नारायण यांस सातारे मुकामीं आणवून सचीव पदाचीं वस्त्रें दिलीं. त्यांचे वंशीं सचीवपद सातारेकडील अद्यापि चालत आहे.

कलम.

१ शककर्ते महाराजांचे कारकीर्दीस आण्णाजी दत्तो सचीव प्रभुणीकर होते. त्यांस रत्नागिरी तालुक्याचे देशपांडेपण दिल्हें. व शके १५९९ सालीं किल्ले सामानगड बांधला, तेथील सबनिशीचा धंदा दिला. त्यांस सचीवपद श्रीमन्महाराज शंभु छत्रपति, शककर्ते महाराजांचे ज्येष्ठ पुत्र यांचे कारकीर्दीत कबजीचे वेळेस संगमेश्वरीं असतां महाराजांची गैरमर्जी जाहली. सबब आण्णाजी दत्तो यांस महाराजांनीं आज्ञा करून चुन्याचे भटींत घालून पाणी घालविलें. तें समयीं मशारनिल्हे जवळून मेले. त्यांचे पुत्राकडे सचीवपद सांगितलें नाहीं. त्यांचे वंशज देशपांडेपण व सबनिशीचा धंदा अनुभवून आहेत.

कलम ५

रामचंद्रपंत अमात्य यांचे तीर्थरूप निळो सोनदेव ठकार दीक्षित यांजकडून आले. त्या समयीं शाहाजी महाराजांपासून मुजुमीचा धंदा हणमंते यांजकडे होता. रघुनाथराव त्रिमल हणमंते हे शाहाजी महाराजांपाशीं चंदावरीं राहिले; व जनार्दन त्रिमल हणमंते यांजकडे मुजुमी चालत होती. त्यास निळो सोनदेव हे लिहिणार फार चांगले, सबब हणमंते यांजकडील मुजुमी दूर करून निळो सोनदेव यास मुजुमी सांगितली. व हणमंते यांजकडे सुरनिशी सांगितली. नंतर शाहाजी महाराज यांहीं कैलासवास केला. व्यंकोजी महाराज हे चंदावरीं अधिकार करूं लागले. ते समयीं महाराज मुसलमान यांचा संग्रह करून सहवास बहुत करूं लागले. सबब रघुनाथराव हणमंते महायात्रेस जातों म्हणून महाराजांचा निरोप घेऊन येतां येतां बेदरीं अकण्णा मादण्णा ब्राह्मण कारभारी यांची भेट घेऊन बेदरचे पादशहाची भेट घेऊन, महाराज कर्नाटकास जातील तेसमयीं आपण मार्ग द्यावा. व महाराजांचें व आपलें सख्य असावें, ऐसें ठरवून माहुली मुक्कामीं आले. तेथें शककर्ते महाराज येऊन भेटले. तुम्हीं महायात्रेस जाऊं नये; मजदेशीं रहावें, ऐसी आज्ञा केली. ते समयीं त्यांनीं विनंती केली जे माझी मुजमी मजकडे सांगावी. आणि कर्नाटकांत स्वारी करावी

म्हणजे रहातो. याअन्वयें महाराजांनीं मान्य करून ठेवून घेतलें. हणमंते यांजकडे मुजमी सांगितली. व निळो सोनदेव यांस सुरनिशी सांगितली. शके १५९५ सालीं कर्नाटकची स्वारी करून तालुके घेतले, त्यांचे बंदोबस्तास रघुनाथराव हणमंते यांस ठेवून व्यंकोजी राजे यांचा तह करून भेटून देशीं ठेवून शके १५९६ सालीं सिंहासनाधीश्वर रायगडीं जाहले. त्यासमयीं रामचंद्र निळकंठ यांस अमात्यपद दिलें. व जनार्दन त्रिमल हणमंते यांस सुमंतपद दिलें. पुढें संभाजी महाराज यांचे कारकीर्दींत रघुनाथराव हणमंते कर्नाटकांतून देशीं येऊन महाराजांस विनंती करून, आपले नांवें अमात्यपद करून घेऊन आपण परत कर्नाटकांत गेले. आणि जनार्दन त्रिमल हणमंते अमात्यपदाची वहिवाट संभाजी महाराज यांचे अखेरीपर्यंत करीत होते. सचीवपद रामचंद्र निळकंठ यांजकडे होतें. राजाराम महाराज यांचे कारकीर्दींत रामचंद्र निळकंठ यांस अमात्यपद सांगून देशीं ठेवून आपण चंदीस गेले. चंदी मुक्कामीं रघुनाथराव त्रिमल बहुत उपयोगी पडले. यांणीं भीड घालून आपलें अमात्यपद आपणाकडे करून घेतलें. रामचंद्र निळकंठ देशीं राहून साहेब चाकरी बहुत केली. त्यांस चंदी मुक्कामाहून हुकुमतपन्नाहपद नूतन करून पाठविलें. नंतर देशीं महाराजांची स्वारी आली. रामचंद्र निळकंठ बहुत आजुर्दे सबब किल्ले विशाळगड मुक्कामीं महाराजांचे सेवेसी रामचंद्रपंतांनीं विनंती केली जे आजपर्यंत स्वारी देशीं नव्हती म्हणून सेवा करून महाल मुलूख, किल्ले कोट यांचें रक्षण केलें. हे आपले स्वाधीन महाराजांनीं करून घेऊन सेवकास महायात्रेस जाणेस आज्ञा व्हावी म्हणोन अर्ज केला. त्याजवरून खंडो बल्लाळ चिटणीस व बाळाजी नीळकंठ पारसनवीस या उभयतांस बोलावून आणून महाराजांनीं आज्ञा केलीजे, रामचंद्र नीळकंठ बहुत उदासीन जाहले आहेत. हणमंते यांची योग्यता मोठी. त्यांस दोघांची समजी कशी करावी येविषयींची विनंती करणें म्हणोन आज्ञा जाहली. तेसमयीं उभयतांनीं विनंती केलीजे. उभयतां निष्ठेचे सेवक. सेवाही पराकाष्ठेची केली आहे. यास्तव स्वामींनीं कृपाळू होऊन उभयतांची योग्यता समान राखून स्वामिसेवा होय ऐसें महाराजांनीं केलें पाहिजे. ते समयीं कसें करावें म्हणोन आज्ञा त्याजवरून उभयतांनीं विनंती केलीजे. प्रल्हाद निराजी प्रतिनिधि वारले. त्यांचे पुत्राकडे प्रतिनिधिपद आहे. त्यांस त्यांचे इतमामाप्रमाणें सरंजाम देऊन त्यास

श्रीमन्महाराज राजा शंभु छत्रपति यांणीं दिलेलीं राजशक ९ दुंदुभी-नाम संवत्सरे रंगो नारायण कारखानीस किल्ले विशालगड यांशीं आज्ञपत्र.

श्रीमन्महाराज राजाराम छत्रपति यांणीं दिलेलीं राजशक १९ काशी रंगनाथ उपनाम बोर्दे यांशीं मौजे शेंबवणें तर्फ मलकापूर हा गांव इनाम गडकरी यांचीं शेतें खेरीज करून दिल्याविशींचें पत्र वैशाख शुद्ध ११.

१ राजशक २२ त्रिंबकभटाचे पुत्र महादेवभट आठल्ये काश्यपगोत्री आश्वलायन सूत्र वास्तव्य कसबा देवळें यांणीं चंदीचे मुक्कामीं केल्यावरून २५ होनांची जमीन कसबा देवळें येथें दिल्ह्याचें पत्र आहे.

श्रीमन्महाराज राजा शिवछत्रपति यांणीं दिल्हेली.

१ कागलकर घाटगे यांशीं कागल प्रांतीं कांहीं नवीन होते ते सर्जेराव घाटगे शाहूमहाराज यांजकडोन निघोन शिवाजी महाराज यांजकडे येऊन त्यांणीं कागल संस्थान संपादन केलें. तें शालिवाहन शक १६९९ राज शक २७.

१ विठोजी कसरकर पंचहजारी राहणार मौजे गावडी तालुके मलकापूर यांस पत्र तुमचे सेवेचा मजुरा जाहला, तुम्ही स्वामी सेवेच्या उपयोगीं बहूत पडलां, तुमचे चखोट(?) त्या प्रांतीं स्वामी आले म्हणजे करतील. स्वामींची जागा राखावी म्हणोन राजशक २७.

येणेंप्रमाणें आहे.

श्रीमन्महाराज राजा शाहू छत्रपति यांचें पत्र.

१ राजशक ३८ खरनाम संवत्सरे नरहर कृष्ण व केसो कृष्ण सर मुकादम मौजे पोमेंडी तालुके हातखंबें हा गांव इनाम दिल्ह्याचें पत्र.

१ राजशक ६१ बाळंभट्ट बिन शिवभट्ट साठये यांशीं वाडा बसणी पैकीं ५॥ बिघे इनाम जमीन दिल्ह्याचें पत्र.

श्रीमन्महाराज राजा शंभु छत्रपति यांणीं दिल्हेलीं.

राज शक ४४ हेमलंबीनाम संवत्सरे मार्गशीर्ष बहुल ७ नारायण जोशी व कृष्ण जोशी वास्तव्य मौजे पुसाळ कर्यात नवरें यांशीं ३५० साडेतीनशें कहरीचें इनामपत्र.

१ राजशक ४६ विकृतीनाम संवत्सरे मौजे शिपोशी तालुके देवळें हा गांव रुद्रभट बिन विश्वनाथभट आठल्ये यांशीं इनाम दिल्हे विशींचें. गांव दिल्हा.

श्रीमन्महाराज शिवछत्रपति यांणीं दिल्हेलीं.

राजशक १३४ मौजे तळसर तर्फ सावर्डें हा गांव दिल्याचें पत्र शिर्के यांस मिळालें आहे.

श्रीमन्महाराज बाबा साहेब महाराज यांणीं दिल्हेलीं त्याचा तपशील.

१ सन सीत सल्लासीन मैयातैन व अलफ सालीं विठ्ठल आपाजी सबनीस विशाळगड यांस मौजे पाळी तालुके देवळें हा गांव खेरीज वृत्ति एक हजार रुपयांची भरतीचा पुत्रपौत्रादि चालवीत जाणें म्हणोन अमृतराव पंडित प्रतिनिधि यांशीं आज्ञापत्र चंद्र २५ माहे जमादिलावलचें आहे.

येणेंप्रमाणें तपशील आहे.

छत्रपति संभाजी महाराजांचे पश्चात् मराठ्यांची स्थिति.

३

१. आतां राजारामाच्या पश्चात् ताराबाईचा मानस आपला पुत्र शिवाजी याचें मौंजीबंधन करून त्यास राज्याभिषेक करावा व रामचंद्रपंताचे हातून राज्यकारभार चालवावा असा असावा व म्हणूनच तिनें शिवाजीच्या राज्याभिषेकाची गोष्ट पंताजवळ काढिली असावी. ताराबाईनें ही जी गोष्ट पंताजवळ काढली, त्यांत तिचा या वेळीं हेतु म्हणजे सर्व राज्यसत्ता आपल्या हातीं यावी अशा प्रकारचाच होता असें नाहीं. साक्षात् देवीअंबिकेनें प्रसन्न होऊन तुमच्या कुळांत २७ पिढ्या राज्य होईल हा जो मालोजीस वर दिला होता तो सदासर्वकाळ तिच्या डोळ्यापुढें दिसत होता. शाहू औरंगजेबाच्या कैदेंत आहे हें तिला धडधडीत दिसत होतें व आज कित्येक वर्षेपर्यंत ती मोंगलाचें बळ जाणून होती. राजारामानें सतत आठ दहा वर्षें मोंगलाशीं भांडण्यांत घालविलीं व प्रसंग पाहून शाहूच्या मुक्ततेकरितांही युक्ति प्रयुक्ति लढविल्या, परंतु त्यांत त्यांस बिलकूल यश आलें नाहीं. हें सर्व तिला पूर्ण अवगत होतें. शाहूचे प्रतिबंध—विमोचनाचा नाद सोडून देण्यास तिला हें एक कारण झालें. तिनें आपल्या पुत्राचें नांव शिवाजी असें ठेविलें. व हें ठेवण्यांत तिची समजूत कीं, तो थोरल्या शिवाजी महाराजांप्रमाणें सर्वत्र दिग्विजय करून दुष्ट मोंगलांच्या तडाख्यांतून मराठेशाही संभाळून त्यांच्याप्रमाणेंच अत्यंत यशस्वी होईल, व याप्रमाणें देवीनें दिलेला वरही याचेच हातून खरा होईल.* अशा विचाराच्या भरीं भरून तिनें आपल्या पुत्रास राज्याभिषेक कर-

* मरणाचे पूर्वी शिवाजी महाराज सर्व मंडळीशीं बोलत असतां एक घटिकापर्यंत स्तब्ध झाले आणि शेवटीं म्हाणाले कीं, " संभाजी दगा पावेल. राजाराम बंदीहून पुनः राज्य रक्षील. मोरो पंडित, विराजी रावजी, रामचंद्र निळकंठ, संताजी घोरपडे, धनाजी जाधव पुनः राज्यवृद्धीस कारण होतील. पुढें शिवनामें राजा होईल. तो दिल्लीपर्यंत राज्य करील."
मल्हार रामराव.

ण्याविषयीं रामचंद्रपंत अमात्य यांस सुचविलें. परंतु ज्या रामचंद्रपंतावर आज सतत १० वर्षे पर्यंत मनुष्यांची वास्तविक परीक्षा करून त्याचे योग्यतेप्रमाणें त्यांस वाढवून, त्याचेकडून राष्ट्राकरितां महत्कार्यें साध्य करून घेण्याची सर्व जबाबदारी पडली होती, व ज्याअर्थीं त्यानें परशुराम त्रिंबकासारख्या एका यःकश्चित् कुळकर्ण्यास देखील प्रथमतः कारकून म्हणून पदरीं ठेवून तो कर्ता पुरुष आहे असें त्यास दिसून येतांच त्यास समशेरजंग बहादरच्या योग्यतेस नेऊन पोंचविलें, त्या अर्थीं ताराबाईच्या पुत्राची योग्यता अधिक कीं, शाहूची योग्यता अधिक हें तो पक्कें जाणून होता; हेंच ज्यास्त संभवतें. ताराबाईचा पुत्र सतत १० वर्षे पर्यंत त्याच्या डोळ्याखालून गेलेला. तेव्हां रामचंद्रपंतासारख्या धूर्त मुत्सद्याच्या लक्ष्यांत, तो पुढें कसा निपजेल हें केव्हांच येऊन चुकलें असलें पाहिजे. त्याचप्रमाणें संभाजीचे शिरच्छेदापासून शाहूची दिल्लीपती जवळील वर्तणूक रामचंद्रपंतास पूर्णपणें विश्रुत होती. शिवाय राजारामाच्या अवसानकालानंतर शाहूकडून पंतास जो निरोप आला त्यावरून रामचंद्रपंतांनीं त्याची खरी योग्यता अगदीं पूर्णपणें ओळखली. त्यावरून शाहूसंबंधानें राजारामाचें लक्ष्य कोणत्या प्रकारचें होतें हें त्यास पक्कें माहीत होतें. दिल्लीपती औरंगजेब, याचे डोकीवरून सफशेल हात फिरविण्याकरितां, येसूबाई व राजाराम—पक्षीय मंडळी यांनीं चालविलेल्या कपट नाटकाच्या अभिनव प्रयोगाकरितां पोक्त राजकारस्थानीपणाचे जे चित्रविचित्र पडदे रंगविले होते ते रामचंद्र निळकंठांनींच ! तो येसूबाईची योग्यता पूर्णपणें जाणून होता. तशांत शाहू हा राज्यसंस्थापक शिवाजी महाराजांच्या वडील पुत्राचा मुलगा, व ताराऊचा शिवाजी धाकट्या पुत्राचा मुलगा. तेव्हां अर्थातच हिंदुशास्त्र दृष्टीनें पाहिलें असतां मराठ्यांच्या गादीवर शाहूचा हक्क जसा पोंचतो तसा शिवाजीचा बिलकूल पोंचत नाहीं, हें अगदीं उघड आहे. हे सर्व विचार पंतांचे मनांत केव्हांच येऊन गेले असले पाहिजेत. शिवाय धनाजी सारखे रणशूर सेनापतीस, परशुराम त्रिंबक, संक्राजी नारायण, घोरपडे मंडळ व हैबतराव निंबाळकर यासारखे स्वामिकार्यार्थ प्राणही वेंचण्यास तयार होणाऱ्या वीरवर मंडळींचें वीर्य खवळून देऊन त्यांस मोंगलांशीं मोठ्या निकरानें व कडाक्यानें लढावयास लावण्याकरितां शाहूची मुक्तता करण्याचें कारण आपल्यास फार उपयोगीं पडेल असें त्यास वाटणेंही अग-

र्दी साहजिक आहे व तें अत्यंत पोक्तपणाचें व दूरदर्शित्वाचेंच दर्शक होय. इतक्या गोष्टी असतांना ताराबाईची विनंति रामचंद्रपंतास कशी मान्य करवेल ! तशांत पंताचा स्वभाव जात्याच पडला अत्यंत निःस्पृह, तो पुत्रस्नेहानें अंध झालेल्या ताराबाई साहेबांच्या वेडगळ मसलतीस कां म्हणून रुकार देईल ? ताराबाईला आपल्या पुत्राची खरी योग्यता कळली नव्हती. पण रामचंद्रपंतास ती पूर्ण कळली होती. नारायणरावाचे पश्चात् आनंदीबाईचा पुत्र बाजीराव राज्यावर आल्यास राज्याची खराबी होईल हें जसें नाना फडनविसास पूर्वीच समजलें होतें तसेंच या वेळींही ताराऊचा शिवाजी अगदीं दुर्बल व मूर्ख निपजून मराठ्यांचे गादीस धोका येईल, हें पंतास पूर्वींच कळलें होतें. रामचंद्रपंत राजकार्यकौशल्याचे दृष्टीनें पाहतां या वेळचे नानाफडनवीसच होते असें म्हणावें लागेल. पुढें शिवाजी संबंधाचा पंताचा अदमासही अगदीं खरा ठरला. कारण ताराऊच्या शिवाजीस पुढें वेडा शिवाजी असें म्हणूं लागले हें इतिहासज्ञांस सांगणें नकोच. शिवाय नामांकित वैद्य नुसते एखाद्या मनुष्याचें तोंड पाहून जसें बिनचूक रोग निदान करितात. अथवा दुर्बिणीच्या सहाय्याशिवायही जसे कित्येक मोठमोठे शोध भास्कराचार्यां सारखी ज्योतिषी मंडळी करितात, तसेच मुत्सद्दी पुरुष आपल्या कुशाग्र बुद्धीनें, दूरदर्शित्वानें, पोक्तविचारानें व स्वानुभवानें व सर्व गोष्टींचा योग्यायोग्य विचार करून कोणची गोष्ट केली असतां काय होईल हें नीट ठरवून टाकून मग त्याप्रमाणें आपला सर्व वर्तनक्रम ठेवतात. वरील ज्योतिषी व वैद्य या प्रमाणेंच या मुत्सद्दी मंडळीसही एक प्रकारची राजकारणैक दृष्टी म्हणा, अथवा राजशेखर कव्युक्तीप्रमाणें राजषाड्गुण्यचक्षु म्हणा, येतो यांत बिलकूल संशय नाहीं.

२. रामचंद्रपंतानें ताराबाईस सांगितलें कीं:—"एव्हांच (शिवाजीच्या) मुंजीची गडबड कां ! थोरले शिवाजी महाराज लष्करांत आहेत त्यांची मुंज अद्यापि झाली नाहीं. त्यांचें वय वीस वर्षांचें झालें. तेही लवकरच येतील असें जोशीराव वगैरे यांचे सांगण्यांत आहे. त्यांचाही निरोप भक्ताजी हुजरे व बंकी गायकवाड याजबरोबर आपल्यास आलाच आहे. ते आल्यानंतर त्यांची मुंज व आपले पुत्राची मुंज बरोबरच करावी. त्यांची मुंज न होतां आपल्या

पुत्राचीच करणें लोकदृष्ट्या अगदीं गैर दिसेल. आपण या बाबतींत अगदीं घाई करूं नये. माझ्यानें तर अशा गोष्टीस कालत्रयींही रुकार देववणार नाहीं." या उत्तरानें ताराबाईस अर्थातच फार वाईट वाटलें आणि ती रागावून सातार्‍यास किल्ल्यावर जाऊन राहिली. यामुळें रामचंद्रास शत्रु उत्पन्न झाले. सातारच्या किल्ल्यावर यावेळीं फक्त २ महिन्यांचाच काय तो पुरवठा होता. "हा पुरवठा रामचंद्रपंतानें मुद्दामच केला नाहीं. तो औरंगजेबास फितूर झाला आहे" अशा तर्‍हेच्या कंड्या रामचंद्रपंतांचा उत्कर्ष न सहन होणारे लोक पिकवूं लागले. व याच कंड्यांचा औरंगजेबानें आपल्यास फार चांगला फायदा करून घेतला म्हणावयाचा. रामचंद्र निळकंठास उद्देशून लिहिलेलें आपल्या सहीचें एक पत्र औरंगजेबानें परशुराम त्रिंबकाच्या हातीं पडेसें केलें.* त्यावरून रामचंद्रपंताविषयीं सर्वत्रांचीं मनें साशंक झालीं. मराठ्यांत फूट पडली. औरंगजेबाचा हेतु सफल झाला. त्याची युक्ति कांहीं अंशीं फलप्रद झाली. एकंदरींत औरंगजेब मोठा युक्तिवान् खरा. शत्रूंत भेद करून त्यांच्या लठ्ठालठ्ठींत आपला हात यथास्थित साधून घ्यावा हा औरंगजेबाचा फार दिवसांचा विचार व तो साधण्याविषयीं त्याचे नेहमीं डावपेंच चाललेले असत. शत्रूंत यादवी माजविणें व मग त्यांचा पृथक् पृथक् हवा तसा सोयीसोयीनें पाडाव करणें हेंच तत्व कोणत्याही कालांतील कोणत्याही मुत्सद्यांस मान्य असणें अगदीं साहजिक आहे. औरंगजेबाचीही Divide and rule ची पॉलिसी मराठ्यांस बरीच भोंवती. परंतु रामचंद्र-

---

* But Aurangazib marched for Satara, a movement wholly unexpected as the fort was not provisioned for above two months. This neglect was considered a great misfortune and gave rise to a suspicion that Ramchandra had purposely left it unprovided. Of this suspicion Aurangazib afterwards took advantage and when Ramchandra during the seige was called away to Rayagad in consequence of the illness of Rajaram, Aurangazib wrote a letter which fell into the hands of Parsharam Trimbak and widened a breach that had for some time existed between him and Ramchandrapant.

(*Grant Duff Page* 174).

पंताच्या शहाणपणामुळें, औरंगजेबास त्याची युक्ति, रामचंद्रपंताबद्दल इतर मंडळींचीं मनें कलुषित होण्यापलीकडे फलप्रद झाली नाहीं. रामचंद्रपंतांनीं यावेळीं आपण होऊन पडती बाजू घेतली. त्यास आपसांतील कलह नको होता. या वेळेपासून त्यांचें राज्यकारभारांतील मन बहुतेक उडालें.

३. ताराबाईनें यावेळेस शिवाजीच्या राज्याभिषेकाची गोष्ट पंताजवळ काढली, व पंतांनीं त्या गोष्टीस आपली असंमति दर्शविली. त्या वेळेस परशुराम त्रिंबक व नारो शंकर हे दोघेही पंतास म्हणाले कीं, आपण या गोष्टीचा आग्रह कां धरितां!

४. धन्यांची मर्जी, त्यास आपण रुकार द्यावा परंतु रामचंद्रपंत धन्याच्या लागेल तशा तबियतीप्रमाणें वागणारा, व धणी म्हणतील तसा रुकार देणारा, 'हानररी' होयबा नव्हता रामचंद्रपंतानें "धणी म्हणतील तसा रुकार द्यावयाचा मी नव्हे. तुमच्या सर्वत्रांच्या मर्जीस आल्यास लक्ष्य प्रकारें करावें, मी कांहीं नको म्हणत नाहीं" असें साफ उत्तर दिलें. आपल्यांत दोन तट होऊन त्याचा फायदा आपल्या शत्रूंस मिळावा हें जसें रामचंद्रपंतांस इष्ट नव्हतें, तसेंच तें ताराबाईसाहेबांस व तिच्या पक्षीयांसही इष्ट नव्हतें. चिटनीस म्हणतात त्याप्रमाणें आईसाहेबांच्या सांगण्यावरून म्हणा अथवा परशुराम त्रिंबक व नारो शंकर यांसच वाटलें म्हणून म्हणा, त्यांनीं रामचंद्रपंतांची तब्यत पाहून विनंती केली कीं, आपण बरायखुद (स्वतः जातीनें) धणीपणा करीत आलां तसाच महाराज धनी चालवीत गेले परंतु आईसाहेबांची मर्जी एक तऱ्हेची. आपण रुकार दिलाच पाहिजे. यावेळीं रामचंद्रपंतांनीं पड घेतली याचें तरी कारण हेंच असावें. पंतांनीं त्या दोघांस कल्याणप्रद असेल तें करावें, असें सांगितल्याचें चिटनीस लिहितात. यावरून या तिघांही राजकारणी पुरुषांनीं फक्त मराठ्यांच्या गादीकडे दृष्टि ठेवून आपसांत दुही न माजवूं देतां ताराबाईच्या आशयानुसार तिच्या शिवाजीसच राज्याभिषेक करून महाराष्ट्र राज्यशकट जरी मार्गांत इतस्ततः स्खलन पावत होता तरी तो मोठ्या युक्तीनें हळू हळू पुढें चालविला.

५. ताराबाईच्या सप्तवर्षात्मक कारकीर्दीस आरंभ म्हटला म्हणजे राजसबाई व संभाजी यांचा कारागृहवास, परशुराम त्रिंबकाचें नूतन प्रतिनिधित्व,

रामचंद्र निळकंठाचा निस्पृहपणा व तादरथ्य या गोष्टींनीं झाला. राजाराम महाराजांचा काल होण्यापूर्वींच औरंगजेबानें वसंतगड घेऊन साताऱ्यास वेढा दिला होता. किल्ल्यावर अन्नसामुग्री पुरेशी नव्हती हें परशुराम त्रिंबक जाणून होता. तो जरी परळीवर होता तरी तेथूनही त्यानें औरंगजेबाचा पुत्र अझीमशाहा याशीं संधान राखून किल्ल्यावरील लोकांस रसद, दारूगोळा वगैरे सामान पोंचेसें केलें. शेवटीं साताऱ्यावर प्रयागप्रभू फार शिताफीनें वांचला व त्या योगें मराठ्यांस ज्यास्त हिंमत आली. हें पाहून तर औरंगजेबनें सातारा घेण्याचा कृतनिश्चयच केला; व म्हणूनच परशुराम त्रिंबकास अझीमशाहाचे आग्रहामुळें तो किल्ला रिकामा करून द्यावा लागला. अझीमशाहा व परशुराम त्रिंबक यांजमध्यें जें राजकारस्थान सुरू होतें त्याचें योजकत्व तर औरंगजेबाकडेच नसेलना ? अशी एक जबरदस्त शंका येते व ती औरंगजेबनें या वेळेसच साताराचे किल्ल्याचे अझीमतारा म्हणून नांव ठेवलें त्यामुळें किंचित् दृढ होऊं पहाते. परंतु तसें नसून औरंगजेबच्या पश्चात् आपल्यास बादशाही सिंहासनावर सहज आरूढ होतां यावें म्हणूनच अझीमशाहानें परशुराम त्रिंबकाशीं या वेळेपासून मसलतीस आरंभ केला नसेल म्हणून तरी कशावरून? कांहींही असो. यापुढें बादशाही फौजेनें परळी, पन्हाळा, पावनगड, विशाळगड, पुरंधर, रायगड, तोरणा, सिंहगड, पांडवगड वगैरे किल्ले वेढे देऊन घेतले. औरंगजेब शाहूस नेहमीं आपल्या तंबूबरोबरच नेत असे. परळीच्या वेढ्यांत एकवार असा प्रसंग आला कीं, तेलांत कांकडे भिजवून त्याजवर शिजविलेल्या अर्ध कच्या भातावर राहण्याचा शाहू सारख्यावर प्रसंग गुदरला. इतकी पावसानें बादशाही फौजेची फटफजिती उडवून दिली. याचवेळीं ज्या परळीचें नांव श्री रामदास स्वामींनीं सज्जनगड असें ठेवलें होतें त्याचेच मोहरमचे प्रारंभीं तो हातीं लागला म्हणून औरंगजेबनें नौरोजतारा असें नांव ठेवल्याबद्दलचें काफीखान लिहितात. हे किल्ले घेतांना बादशाही फौजेचे व स्वतः बादशाहाचे देखील फार हाल झाले. पायास व्रण झाल्यामुळें औरंगजेबाचे जिवास बिलकूल चैन पडेना. तरी मराठ्यांचे किल्ले, कोट घेण्याविषयीं त्याची अत्यंत हिमतीची खटपट चालली होती, कित्येक

बरसाती त्यानें अंगावर काढल्या. नद्यांस पूर आल्यामुळें त्याच्या सैन्याची फार वाताहात झाली. मराठे सरदार मोंगली फौजेची रसद मारीत. प्रत्यक्ष बादशाही छावणीच्या पंचक्रोशींतील मुलूख बेधडक लुटून फस्त करीत. एका प्रसंगीं तर मराठ्यांनीं मोंगलांच्या छावणीपासून १।४ मैलांच्या टप्यांत चरत असणारे खुद्द बादशहाचे हत्ती धरून नेले, व ते परत आणण्याकरितां महंमद अमीन मराठ्यांवर चाल करून गेला असतां त्यास देखील दरोबस्त लुटून चांभारगोंद्याचें रान दाखविलें.

५. एका किल्ल्यावरून दुसऱ्या किल्ल्यावर, दुसऱ्यावरून तिसऱ्यावर अशा रीतीनें वारंवार किल्ले चाळून पाळून ताराबाईनें सर्व राज्यसूत्रें चालविलीं. धनाजी जाधवानेंही आपल्या घोड्याचे लगाम कधीं एकाच दिशेला फिरविले नाहींत. निंबाळकर, दाभाडे, भोंसले, चव्हाण, थोरात, शिंदे, पवार वगैरे मंडळीही दाहीं दिशांस पसरून सातारच्या मराठ्यांचे गादीचे अंकित म्हणवून चौथ, सरदेशमुखी व घांसदाणा वगैरे हक्क वसूल करीत. गोदावरी व कृष्णा यांजमधील पूर्वदेशीय प्रदेशांत घोरपड्यांनीं आपलें स्वतंत्र निशाण उभारून अत्यंत उच्छेद करून सोडला. व याचप्रमाणें इतर मानकरी जे आपल्यास राज्यसंस्थापक शिवाजी महाराजांच्या वंशजांचे सेवक म्हणवीत असत त्यांनींही सांपडेल तेथें मोंगली फौजेस त्यांची रसद दाणा वगैरे मारून अगदीं जेरीस आणावें व तिला वाटेल तसें बुचाडावें, लुटावें हें व्रत चालविलें. दिवसेंदिवस दक्षिणेंतील जमाबंदी वसुलाचें उत्पन्न फार थोडें होऊं लागलें. त्यांस पूर्वीप्रमाणें प्रचंड सेना ठेवणें फार कठिण जाऊं लागलें. त्यांस पूर्वीप्रमाणें बादशाही थाटानें वागतां येईना. म्हणून त्यांस हिंदुस्थानांतून खजिना आणवावा लागे. कारवानावर कारवान हिंदुस्थानांतून महाराष्ट्रांत लोटत. परंतु रात्रींबेरात्रीं ते जेथें जेथें म्हणून मुक्काम करीत तेथें तेथें त्यांस मराठ्यांच्या छाप्याची भीति ही असेच. यामुळें मराठ्यांच्या तडाक्यांतून जें काय थोडें बहुत सुटून येईल तेवढ्यांवर बादशाही लष्करास राहावें लागे. सैन्यांतील शिपायांस अन्न देखील पोटभर मिळेना. मग त्यांचे कित्येक महिन्यांचे पगार तुंबून राहिले असतील याचें नवल काय ? व असे एकदां पगार देण्याचें तुंबून राहूं लागलें म्हणजे अर्थातच शिपाई

लोकांत अविश्वास व बेदिल उत्पन्न होतो. ते झटून काम करीनातसे होतात. ते वारंवार पगाराचें टुमणें लावतात. सैन्यांतील कैद नाहींशी होते. सर्व शिस्तीचा अस्त होऊन लढाईची खस्त ते खाईनातसे होतात. सर्व सैन्याचें लक्ष्य बहुशा लुटीकडे असतें. हें होणें अत्यंत स्वाभाविक आहे. औरंगजेबाचें सैन्य ह्याच स्थितीला येऊं घातलें.

६. इकडे मराठे प्रतिवर्षीं सुरतेवर व बऱ्हाणपुरावर जाऊन मोठमोठ्या रकमा उभ्या करीत. वऱ्हाड, खानदेश, गुजराथ व माळवा वगैरे प्रदेशांत शिरून चौथ व सरदेशमुखीचे हक्क वसूल करीत. व जेथें जेथें हे हक्क वसूल करणें अशक्य होई तेथें लष्करी बळाचा उपयोग करणें अत्यावश्यक होत असे. औरंगजेबनें झुलफिकारखानास माळव्याच्या संरक्षणार्थ गाझीउद्दीनास सुभेदार करून वऱ्हाडमध्यें व गुजराथेंत सर्व सूत्रें आपल्या हातीं घेण्याकरितां अझिमशाहास "अमदाबादेस मोठमोठीं सैन्यें देऊन पाठविलें. परंतु सर्वच इमारत जेथें ढासळूं पहात आहे तेथें एकदोन चिखलाच्या गोळ्यांनीं थापून चोपून काय होणार ? बादशहाचे हे बाहेरून मोठे जोरदार दिसणारे प्रयत्न अगदीं निरर्थक होते. या वेळीं हालचाल व गोंगाट जरी यथास्थित दिसत होती, तरी त्यांत जोम व खरी कळकळ कोणासही नव्हती. बादशहाचें वार्धक्य झालें तरी त्याच्या कंटाळवाण्या व निरर्थक लढाया संपत नाहींत असें पाहून त्याचे मोठमोठे सुभेदार व कामदार शेवटीं शेवटीं आपलें लक्ष्य त्याकडे फारसें पोंचविनातसे झाले. शत्रूशीं त्यांच्या आंतून मसलती होत होत्या. बादशाही दरबारांतील मुत्सद्दी मंडळीपासून तों तहत लढाईंत लढणाऱ्या यःकश्चित् शिपायापर्यंत सर्वत्र भ्रष्टाकार, अक्षम्य उदासीनता व निरुत्साह यांचे प्राधान्य झालें होतें. इकडे मराठे, बादशाही फौजेनिशीं लढतां लढतां युद्धांत फार निपुण झाले होते. हिंदू लोकांचा औरंगजेबाकडून जास्त जास्त होत असलेला धर्मच्छल वाढत चालला. मथुरा, काशी वगैरे हिंदूंच्या पवित्र स्थानांची दिव्य व भव्य देवालयें जमीनदोस्त होऊन त्यांच्या जागीं मोठमोठ्या मशिदी उठूं लागून तेथें रामजन्म दत्तजयंती यांच्या ऐवजीं महंमदजन्म व हैदोसजयंत्या होऊं लागल्या !

छत्रपति संभाजी महाराजांचे पश्चात मराठ्यांची स्थिति.

४

१. मागील लेखाचे शेवटीं सांगितलेल्या कित्येक गोष्टींवरून हिंदूंस मोंगली अंमल नकोसा झाला. महाराष्ट्रीयांचेपासून ज्या अर्थीं लोकांस धर्मसंबंधी त्रास पोंचण्याचा बिलकूल संभव नव्हता त्या अर्थीं त्यांस महाराष्ट्रीयांसच चौथाई व सरदेशमुखी देणें बरें वाटे, व मराठ्यांचा अभ्युदय होण्यास वरील गोष्टी पुष्कळ अंशीं कारणीभूत झाल्या. जिझीया कर व हिंदूंस सरकारी कामें न देण्याविषयींचे त्यांचे सक्त हुकूम ह्या गोष्टींनीं या वेळेस लोकांचीं मनें क्षुब्ध करण्यास पुष्कळ मदत केली, व औरंगजेबाच्या आमरण असणाऱ्या शंकेखोर वृत्तीनेंही मराठ्यांच्या कार्यसाधनास थोडाबहुत हातभार लावला यांत बिलकुल शंका नाहीं. देशकालवर्तमानाप्रमाणें मराठी फौजेची* शिस्त जशी असावी तशी होती; मोंगली फौजेची स्थिति त्यांचे अगदीं उलट होती. औरंगजेब किल्ले घेत घेत पुढें चालला. इकडे मराठे, त्यानें सोडून दिलेले किल्ले घेत चालले. मोंगल पुढें मराठे मागें, अशी विलक्षण शिकार सुरू झाली. जो तो आपापल्या मनांत विजयी झाल्याबद्दल हर्ष मानी. प्रस्तुत अठराव्या शतकाच्या आरंभींचीं पांच सात वर्षें मोठ्या महत्वाचीं होतीं. मोंगली राज्याची अखेरची धडपड जितकी मोंगलांस दुःखदायक होती तितकीच ती मराठ्यांस सुखदायक होती. मुसलमानलोकांविरुद्ध सर्व हिंदूंचीं मनें फार दिवस एकसारखीं खवळून गेलीं होतीं. पुढें मोंगल, मागें मराठे अशी शिकार चालली असतां, रामचंद्र नीळकंठानें शर्तीनें हल्ले नेऊन पन्हाळा व पवनगड असे दोन्ही किल्ले घेतले. पन्हाळा ताराबाई साहेबांचें पुष्कळ दिवस वस्तिस्थान असल्यामुळें त्यावर राहणें त्यांस फार

* एल्फिन्स्टननें दोन्ही सैन्याची तुलना केलेलें वर्णन पहा. pp. 579-80.

आवडे, व तो हातीं येतांच त्या त्यावरच रहावयास गेल्या. या वेळेपासून रामचंद्रपंतावर अधिक विश्वास ठेवून त्याजवर त्या सरकारी जबाबदारीचीं कामें बिनधोक सोंपवीत. यावरून या वेळीं रामचंद्रपंतांनीं ताराबाईच्या कलहजनक हेतूकडे बिलकूल नजर न देतां, केवळ मराठ्यांचे गादीचा अभिमान धरून, आपल्या राष्ट्रांत फार वर्षें धुडगूस घालीत असणाऱ्या शत्रूस, परशुराम त्रिंबक व धनाजी जाधव यांसारख्या वीर मुत्सद्दी मंडळींशीं अत्यंत सलोख्याचें वर्तन ठेवून, अगदीं जेरीस आणलें व आपसांतील वैमनस्यें विसरून जाऊन आपलें मुत्सद्दीपण गाजविलें. सातारा व वसंतगड परशुराम त्रिंबकानें मोठ्या युक्तीनें घेतलें. इकडे शंकराजी नारायणही अस्वस्थ बसला नव्हता. त्यानेंही सिंहगड, रायगड, रोहिरा आदिकरून कित्येक जागा घेतल्या. पन्हाळा व सिंहगड आपले हातचे गेल्यामुळें औरंगजेब फार कष्टी झाला. त्याचें दुखणें त्यामुळें बळावलें. ज्या मराठ्यांच्या किल्ल्यांस पूर्वी मोंगलांचे वेढे पडत असत त्या मोंगली किल्ल्यांस उलट आतां मराठ्यांचें वेढे पडूं लागले. औरंगजेबाच्या पंचाशत् वार्षिकीय कारकीर्दींत मोंगली राज्याच्या अत्यंत विस्तृत अशा राष्ट्रसमुद्राची अप्रतिहत भरतीच सुरू होती. ती संपून त्यास आतां (१७०६ त) थोडीशी ओहोटी लागल्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. ओहोट लागतांच, भरतीमुळें अदृश्य होऊन जाणारीं मराठ्यांच्या दुर्गांचीं तुंगें आतां थोडथोडीं दृश्य होऊं लागलीं. व या तुंगांचे बरोबरीनें मुसलमानी मशिदीचे, उंच आकाशांत झळकत असणारे अर्धचंद्र जाऊन, त्यांचे जागीं हिंदूंच्या देवळांचे कळस चमकूं लागले.

२. इकडे औरंगजेबाचा आवडता पुत्र कामबक्ष याचे विजापुरीं स्वतंत्र राज्य स्थापण्याविषयीं दीर्घ प्रयत्न चालले होते. याच वेळीं कामबक्षानें शाहूची सुटका करून त्यास चौथाई व सरदेशमुखीच्या सनदा करून देण्याविषयीं औरंगजेबाच्या मनांत भरविलें. या बाबतींत धनाजी जाधवाशीं कामबक्षानें काय तें सर्व बोलणें चालणें चालविलें. परंतु मोंगलाची कमकुवत, जसजशी मराठ्यांच्या स्पष्ट नजरेस येऊं लागली तसतशा दिवसेंदिवस त्यांच्या मागण्याही जास्त वाढत चालल्या. ते जास्त हक्क सांगूं लागले. पण औरंगजेबास हें कोठून रुचणार? सर्व राष्ट्राचे मालक मराठ्यांस करून आपण स्वतः त्यांचा

चाकर होऊन त्यांचेवर चौरी ढाळीत त्यांचे ताबेदारींत राहणें त्यास कधीं तरी इष्ट वाटलें असतें काय? मराठ्यांशीं तह करण्याचा घाट त्यानें अजीबात सोडला; व त्यानें त्यांच्यांत अन्य तऱ्हेनें फितवाफितव करण्याचें आरंभिलें. वाकीनखेड्याचा नाईक पुनाषा यास नांवाजून आपल्या पदरीं ठेवण्याची सल्ला कामबक्ष व निजामउल्मुल्क यानें बादशहास दिली. व त्यावरून बादशहानेंही त्यास पोषाख, हत्ती, समशेर व जवाहीर हीं नजर पाठविलीं. परंतु तीं सर्व गट्ट करून टाकून त्यानें औरंगजेबाच्या हातावर चांगल्याच तुरी दिल्या म्हणावयाच्या. मानाजी मोऱ्यास बादशहानें मनसबदारी देऊं केली होती परंतु ती मोऱ्याच्या बिलकूल खातरींत नव्हती. तो बेधडक आपल्या देशबांधवांस मिळाला. या व अशा आणखी कित्येक गोष्टींचा विचार केला म्हणजे या वेळीं बादशहाचे फितुरीचे प्रयत्न बहुशा निष्फलच होत असत असें म्हणावें लागतें. शंकराजी नारायणानें सिंहगड घेतल्याचें त्यास समजतांच त्यानें झुलफिकारखानास तो पुनः घेण्यास पाठविलें. खानानें गड घेतला, परंतु पुनः शंकराजी नारायणानें खानाचा व बादशाही फौजेचा पुरा मोड करून तो परत घेतला. मोंगली सैन्यानें पळ काढला. कंसास ज्याप्रमाणें सर्वत्र कृष्णच दिसूं लागला त्याप्रमाणें सर्व मोंगलांस धनाजी व धनाजीचा घोडा हीं दिसत. मोंगली सैन्यांतील कोणा एकाद्याचा घोडा पाणी प्यावयास नेला असतां तो जर तें पीईनासा झाला तर ते त्यास पाणी कां पीत नाहींस? तुला पाण्यांत धनाजी दिसूं लागला काय? म्हणून विनोदानें म्हणत. एकंदरींत यावेळीं मराठे इतके प्रबळ झाले होते. बादशाही सैन्यानें जो पळ काढला तो थेट अहंमदनगरची वाट धरली. परंतु मार्गांतच बादशाही सैन्याचा एकदा असा कांहीं पुरा मोड झाला कीं त्यावेळीं मराठ्यांचा फारादिवसाचा कट्टा शत्रु जो औरंगजेब तो मराठ्यांच्या अगदीं अजीबात हातीं सांपडावयाचा व असें जर झालें असतें, तर औरंगजेबास अनायासेंच सिंहगडावर देवटाक्यांतील स्वच्छ जलाचें पान करीत व सिंहगडाची थंड हवा खात शेवटपर्यंत राहतां येऊन सिंहगड घेण्याची त्याची अति उत्कट इच्छाही सहज तृप्त होती! परंतु थोडें चुकलें, मराठ्यांस खरी बातमी कळली नाहीं. नाहीं तर त्यांनीं यावेळेस खचित लगट केली असती, व आपल्या हातीं सांपडलेली अशी मोठी शिकार ते कधींही जाऊं देतेना.

३. मराठ्यांच्या तडाख्यांतून सुटून औरंगजेब कसाबसा एकदां अहमदनगरास सुरक्षितपणें जाऊन पोंहोचला. या वेळेस औरंगजेब फार जेरीस आलेला दिसतो. औरंगजेबाचीं यावेळीं झुलफिकारखान वगैरे मंडळीस जीं पत्रें गेल्याचा, काफीखान, स्काट, एल्‌फिन्स्टन, मांटगॉमेरी वगैरे इतिहासकार उल्लेख करितात त्यावरून औरंगजेब या वेळेस फारच पेंचांत आला होता असें म्हणावें लागतें.

औरंगजेबाची पूर्वस्थिति व प्रस्तुतस्थिति (२१ वर्षांनीं अहमदनगरास आल्यावरची) यामधील विरोध अगदीं लक्ष्यांत ठेवण्याजोगा आहे. परंतु त्याच्या मध्यंतरीं घडलेल्या गोष्टींचें ज्या वेळेस आपण पर्यालोचन करावयास लागतों त्या वेळेस तत्कालीन स्थितीचें चकित करून सोडणारें फक्त एक चित्रच आपल्या डोळ्यापुढें उभें राहतें, एवढेंच नव्हे तर एका लुटारू म्हटलेल्या लोकांच्या शक्तीचा अभ्युदय कसा झाला व तिचें संवर्धन होण्यास कोणकोणतीं साधनें तिला साहाय्यभूत होत गेलीं याबद्दलचा एक अपूर्व इतिहास आपल्यापुढें मूर्तिमंत उभा राहतो.

ग्रांट डफ देखील मराठ्यांचे उत्कर्षासंबंधानें इतके थक्क होऊन जातात (परंतु लुटारू हें विशेषण मराठ्यांस लावण्यास ते बिलकूल मागेंपुढें पहात नाहींत!). त्यांच्या पेनांतून ‘Not merely a striking picture, but a curious history’ असे आश्चर्यदर्शक शब्द पडले! मराठ्यांची दृष्टि लुटीकडे होती हें म्हणणें अजीबात वेडगळपणाचें! त्यांचा प्रधानहेतु यवनांचीं मूळें खणून टाकून स्वराज्य स्थापण्याचा. लूट करणें ही अप्रधान गोष्ट. शत्रूस जर्जर करण्याकरितां त्यांस व तत्पक्षीयांस लुटणें मराठ्यांस त्याकाळीं आवश्यक होतें. व त्याच लुटीचा व्यय मराठ्यांनीं स्वबळ वाढविण्यांत केला. कोणाही निःपक्षपाती इतिहासज्ञास अथवा राजकार्यनिपुण पुरुषास हें कबूल करावें लागेल कीं, मराठे हे आर्यधर्माच्या अभिमानानें व गोब्राम्हणप्रतिपालनाच्या इच्छेनें स्वराज्यस्थापनास लागले. लूठ ही केवळ आनुषंगिक गोष्ट होती.

मराठ्यासारख्या लुटारू लोकांनीं ज्या औरंगजेबाचा राज्यविस्तार सर्व हिंदुस्थानभरच काय पण अफगाण व आसाम येथपर्यंतही जाऊन पोंचला होता. त्या औरंगजेबासही “या अल्ला, या खुदा” म्हणावयास लावावें हें अत्यंत

असाधारण व अर्थात् आश्चर्यजनक होय. पृथ्वींत सात अत्यद्भुत गोष्टी असल्याची प्रख्याति आहे. परंतु यःकश्चित् कांहीं लुटारूंनीं औरंगजेबासारख्या दिल्लीपतीस असें वंगवायास लावावें ही आठवी अद्भुत गोष्ट झाली असें म्हणावें लागेल.

" माझें सर्व सैन्य, सरदार व अनुयायी अगदीं माझ्यासारखेच भयभीत, निराश्रित व पीडित झाले आहेत. खजिन्यांत एक फुटकी कवडीही शिल्लक नाहीं. आणि या लष्करी लोकांचे कित्येक महिन्यांचे पगार तर अगदीं तुंबून राहिले आहेत. त्यांत या चांडाळ पायदळ लोकांच्या गोंगाटानें तर माझे कान अगदीं किटून गेले. कावळ्याच्या घरट्यांत कोणी शत्रु आला म्हणजे ते जसे कावकाव करूं लागतात त्याप्रमाणें हे ओरडत आहेत. तर कोणी जर द्रव्य लपवून छपवून ठेवलें असेल तर त्याचा शोध कर. आणि जर तें कोणाच्या हातास लागल्याचें तुला कळलें तर तें हुडकून काढ, व यांच्या-या लष्करी लोकांच्या जाचांतून (देण्यांतून) मला एकदां मोकळें कर. मला हें सैन्यही नको आणि राज्यही नको. तुला वाटेल तशी तूं यांची व्यवस्था कर. " या प्रकारचे उद्गार झुलफिकारखानास उद्देशून या वेळीं औरंगजेबाकडून निघाल्याचें लेखांतरीं आढळतें, तसें असेल यांत नवल तें काय ?

४. इकडे झुलफिकारखान मराठ्यांत फूट पाडण्यांत गुंतला होता. संताजी घोरपड्याचा पुत्र व पुतण्या हे ताराबाईच्या मुलुखांत जाऊन लुटालूट करीत होते त्यांस योग्य शासन करण्याकरितां धनाजी जाधव त्यांजवर चालून गेला. धनाजी जाधवाविरुद्ध अर्थात् ताराबाईविरुद्ध घोरपडेमंडळीस मदत व फूस देणें हें झुलफिकारखानास अत्यवश्यक होतें. त्याप्रमाणें त्याची खटपट व कारस्थानें चाललींच होतीं. यावेळेस जर घोरपडे ताराबाईच्याच पक्षास मिळते तर औरंगजेबास खचित सिंहगड अथवा पन्हाळाच पहावा लागता ! औरंगजेबाची प्रकृति अत्यवस्थ असल्याचें ऐकून झुलफिकारखानानें आपला मोर्चा नगराकडे फिरविला. यावेळीं मोंगलांच्या ठिकाणीं, मराठ्यांविषयीं बहुतकाल असणारी तिरस्कारबुद्धि जाऊन तिची जागा भीतीनें पटकाविली होती. मराठे घोडेस्वारांच्या त्या पीळदार व कल्लेदार मिशा, दोन्ही गालांवरून येऊन हनुवटी खालून ती ४।५ बोटें रुंदीची पागोट्याची पट्टी गेल्यामुळें त्यांच्या त्या भव्य चेहे-

त्यास आलेली उग्रता, व त्यांचें तें १३।१४ फूट लांबीचे चमकत असणारे लांबसडक भाले हे मोंगली सैन्यानें पाहिले, कीं त्यांस कांपरेंच भरून येई. मोंगली सैन्य चाललें म्हणजे त्यांस एखाद्या डोंगरावरून मराठे चाल करून येतील, कीं ते झाडींतून बाहेर पडून आपल्या अंगावर तुटून पडतील, असा सदासर्वदा धाक असे. अशी यावेळची वस्तुस्थिति होती. झुलफिकारखानाची व औरंगजेबाची एकदां भेट झाली. पण यापुढें औरंगजेबाचे प्रकृतीस आराम म्हणून पडला नाहीं. वीस वर्षांपूर्वीं अहंमदनगरास त्यानें जेथें तंबू ठोकले होते त्याच जागीं या खेपेसही त्यानें ते देवविले. परंतु त्या वेळचें त्याचें अपार वैभव व प्रस्तुतची वैभवहीनता, त्या वेळची कर्तृत्वशक्ति व आतांची निरुत्साहता, त्या वेळचें चतुरंगबल व प्रस्तुत त्याच चतुरंगबलाचा क्षय, या सर्व गोष्टींचें मूर्तिमंत चित्र जेव्हां त्याचे डोळ्यापुढें उभें राहिलें असेल तेव्हां त्याचे तोंडांतून " हीच माझी शेवटची स्वारी व हाच या भूतलावरील माझा अखेरचा प्रवास " असे उद्गार बाहेर पडले असतील यांत नवल तें कोणतें ! औरंगजेबाच्या या उद्गाराप्रमाणें खरोखर त्याच्या आयुष्यांतील हा त्याचा अखेरचा प्रवास व ही त्याची अगदीं शेवटचीच स्वारी होती. या स्वारींत मात्र तो अगदीं विजयी झाला. रायगड व सिंहगड यांहूनही प्रचंड असा जो रामगड तोच त्यानें एकदम हल्ला करून सर केला. व अशा रीतीनें सतत ५० वर्षेंपर्यंत एकसारखें आपल्या अंगच्या अदृष्टपूर्व गुणांस प्रकाशास आणून त्यानें इतिहासलेखकांस अनंतकालपर्यंत लिहिण्यास व विचार करण्यास पुष्कळ अवकाश दिला. या वेळीं त्याचें वय ८९ वर्षांचें होतें. परंतु त्याच्या पंचेंद्रियांच्या सर्व शक्ति अद्याप शाबूत होत्या. मात्र त्यास यासमयीं किंचित् कमी ऐकूं येऊं लागलें होतें. पण हें देखील सहज कोणाच्याही लक्ष्यांत येण्यासारखें नव्हतें. हीं जीं त्याचीं सर्व इंद्रियें जशींच्या तशींच राहिलीं याचें कारण तरी त्याचें अत्यंत मित व नियमितपणाचें वर्तन होय.

याप्रकारें औरंगजेबाचा सर्व कथाभाग संपला. त्याच्या आयुष्याच्या दोरीबरोबरच त्याच्या राज्याचीही दोरी तुटली म्हणावयाची. या वेळीं त्याचे तिघे पुत्र तीनकडे होते. व ते जवळ असूं नयेत अशाबद्दल औरंगजेबानें फारच खबरदारी ठेवल्याचें दिसून येतें. आपण शहाजानाची जी स्थिति केली तीच आपले पुत्र आपली करतील कीं काय अशी त्यास फार भीति होती.

औरंगजेबाचे कारकीर्दींत मोंगली राजसत्तेची परमावधि झाली. दक्षिण हिंदुस्थानांतील बहुतेक राज्यें ज्या वेळेस त्यानें पादाक्रांत केलीं त्या वेळेसच हें सारें हिंदुस्थान-द्वीपकल्प त्याचें झालें. अफगाणिस्थान व आसाम येथेंही त्याचाच अंमल सुरू झाला. औरंगजेबाच्या बादशाही छत्राखालीं जे कोटी प्रजाजन असल्याचें कांहीं शोधक इतिहासकार लिहितात. व तसेंच त्याचें खजिन्यांत त्या वेळीं ३० कोटी रुपये होते असें म्हणतात. पण ज्याअर्थीं त्यास त्यांतील कांहीं भाग आपल्या लष्करी लोकांस देतां आला नाहीं व झुलफिकारखानास हरतऱ्हेनें पैसा उभारण्यास तोंड वेंगाडावें लागलें त्याअर्थीं त्याजजवळ बिलकूल पैसा नव्हता असें म्हणावें लागतें. परंतु वरील विधानास हें विधान अगदीं विरोधात्मक होतें. त्याचा उलगडा कसा काय पाडावयाचा? दिल्लीस खजिना असला पाहिजे यांत बिलकूल संशय नाहीं. मात्र तो दिल्लीहून अहंमदनगरास आणविणें आणि तेंही दिवसेंदिवस प्रबल होत जाणाऱ्या मराठ्यांच्या तावडींतून अज्जीवात सुटून हें अत्यंत धोक्याचें होतें व म्हणूनच औरंगजेब तसें करूं शकला नसेल ही गोष्ट जास्त संभवते. यावरून या वेळीं मराठ्यांचा उत्कर्ष हळू हळू कसा होत चालला होता हें सहज दिसून येईल. या वेळीं औरंगजेबाच्या अवसानकालाची जणूं काय सर्वजण वाट पहात होते असें वाटावयास लागतें. प्रत्यक्ष औरंगजेबाचा प्रियपुत्र कामबक्ष याची विजापुरीं स्वतंत्र पातशाही स्थापण्याबद्दलची खटपट, दुसरा युवराज शहाआलम याचा, बादशहा मृत्यु पावण्याचे पूर्वींच राणा जयसिंग याशीं चाललेला गुप्त तह, बादशाही सुभेदारांची आपण स्वतंत्र नबाब बनण्याची अत्युत्कट इच्छा, दिल्लीदरबारांतील मुत्सद्दी मंडळीचें तटस्थपणाचें वर्तन, हलकट व बेवकूब मंडळीच्या हातीं गेलेलीं राज्यकारस्थानाचीं सूत्रें, बादशाही जमाबंदी वसुलाच्यासंबंधानें कित्येक वर्षें अखंडितपणें चाललेली दिरंगाई, दिवसेंदिवस होत गेलेल्या राज्यविस्तारास अत्यवश्य व योग्य निर्बंधनांच्या जबरदस्त बांधाचा अभाव, बेगमसाहेबांची शाहूच्या प्रतिबंधविमोचनाबद्दलची खटपट, रजपूत लोकांशीं अकबराचें वेळेपासून असणाऱ्या मोंगली सख्याचा बिघाड, या सर्व गोष्टी मराठ्यांच्या उत्कर्षास अनुकूल अशाच होत गेल्या.

५. आतां रजपुतांविषयीं थोडासा जास्त उल्लेख करणें जरूर आहे

तो असा कीं:—अकबरानें ज्या रजपुतांशीं बेटीव्यवहार सुरू करून, त्याचें ते प्रत्यक्ष शत्रु असतांही आपल्या सोज्वल वर्तनानें त्यांस आपल्या जिवाचें कलिद्रे करून सोडलें व बादशाही तख्ताकरितां त्यांस प्रोत्साहनानें कॉकेसस पर्वतावरील हिममयं प्रदेश दाखवून, दांडग्या अफगाण लोकांबरोबर त्यांस लढवावयास लावून त्यांजकडून मोठमोठीं कार्यें करविलीं, त्याच रजपुतांवर—अत्यंत विश्वासू व इमानी रजपुतांवर—औरंगजेबनें झिझियासारखे कर बसवून त्यांच्या चालीरितींचा व धर्माचा उपमर्द करून, त्यांचा मानभंग केला व त्यांनीं इसलाम धर्मानुयायी व्हावें म्हणून त्यांचेवर आपले पंजे व तरवारी फिरविल्या, यांतच त्याचें खरें राजधोरण चुकलें. यांतच त्याच्या राजकारणैकदृष्टीस आंध्य आलें असें म्हणणें भाग पडतें. व औरंगजेबाच्या या अशा वर्तनामुळेंच मराठ्यांचें व इतर हिंदूंचें आंतून सख्य राहिलें व प्रसंगविशेषीं ते एकमेकांस साहाय्य करूं लागले.

मोंगली राज्याच्या ऱ्हासास जितक्या गोष्टी कारणीभूत झाल्या तितक्या गोष्टी मराठ्यांच्या उत्कर्षास साहाय्यभूत होत गेल्या. असें विधान आतां येथें करणें फारसें चुकीचें होणार नाहीं. लष्करी अधिकाऱ्यांकडेच वसुलाचें काम असल्यामुळें रयत लोकांवर फार जुलूम होत असे, व त्यामुळें सर्वत्र हवालदीलपणा व असंतुष्टपणा पसरला होता. जितका भाग रयतेकडून घेतला जाईल त्याचा फारच थोडा अंश खुद्द बादशाही खजिन्यांत जाई. उदेपूरचा राणा राजसिंग यानें औरंगजेबास कांहीं पत्रें लिहिलीं आहेत त्यांपैकीं एकांत तो म्हणतो:—

तुझ्या सार्वभौम बादशाही राज्यछत्राखालीं असणाऱ्या प्रजाजनांच्या हक्कांची अगदीं पायमल्ली झाली आहे. तुझ्या राष्ट्रांतील प्रत्येक प्रदेश निःसत्व व दरिद्री बनला आहे. निर्जनीकरण सुरू असून संकटावर संकटें ओढवताहेत. राजांच्या, राजकुमारांच्या मंदिरापर्यंतही जर दारिद्र्याचा पूर्ण शिरकाव झाल्याचें दिसून येतें तर मग सरदार मंडळी सत्वहीन झालीं असल्यास नवल काय ? इकडे लष्करी लोकांकडे पाहिलें, तर त्यांची सदा कदा कुरकूर चालली आहेच. व्यापारी लोकांच्या तक्रारी, बहुतेक सर्व मुसलमान असंतुष्ट, हिंदु निराश्रयामुळें ससाध्वस, व इतर असंख्य जन आज

संध्याकाळींच खायाला काय मिळेल या फिकिरींत असून सगळा दिवसभर अत्यंत त्रस्त व निराश होऊन एकसारखे आपल्या कपाळावर आपले हात बडवून घेत आहेत. लोक अशा नीचावस्थेला पोंचले असतांही जर एखादा सार्वभौम राजा आपल्या सत्तेच्या जोरावर त्यांजवर जबरदस्त कर बसवूं लागला तर राजवैभवाच्या संरक्षणाबद्दल कोणीतरी फिकीर करितील काय ? यावरून त्या वेळची लोकस्थिति किती शांततेची, किती सुखाची, व किती निर्भयतेची होती याची सहज कल्पना करितां येण्यासारखी आहे !

औरंगजेबची शंकेखोर वृत्तीच त्यास भोंवली. मोठमोठीं प्रचंड सैन्यें बाळगणारे बलाढ्य व कर्तृत्ववान् सरदारांवर वसुलाचीं कामें सोंपविण्या इतका त्यास त्यांचा बिलकूल विश्वास येत नसे. हे स्वतंत्र होतील कीं काय ही त्यास भीति वाटे; व म्हणूनच तो हलकट व बलहीन अशा लोकांची त्या कामाकडे योजना करी. पण ते आपल्या प्रदेशाच्या संरक्षणाकडे बिलकूल लक्ष्य न देतां रयत लोकांस वाटेल तसें लुटून स्वतःची यथास्थित तुंबडी भरून घेत. यामुळें प्रजाजन अर्थातच त्रस्त व असंतुष्ट असत.

८. बहुतेक इंग्लिश इतिहासकार मराठे म्हणजे लुटारू, ते जिकडे जिकडे म्हणून जात तिकडे तिकडे लुटलेले गांव, नाश केलेलीं शेतेंभातें, आणि जळालेलीं खेडींपाडीं मागें ठेवून येत असा सर्व साधारण आरोप करीत असतात व याबद्दल त्यांस अत्यंत दोषी ठरवितात. पण जेथें जेथें त्यांचे चौथ व सरदेशमुखीचे हक्क मुकाट्यानें दिले जात, तेथें मराठ्यांची कधींही इजा अथवा तोशीस पोंचत नसे. आतां जेथें मराठ्यांचे वरील हक्क कबूल केले जात नसत तेथें ते लुटीत असत हें खरें. पण ह्यांत त्यांचा हेतु केवळ शत्रूची रसद, दाणापाणी वगैरे मारून त्यांस जेरीला आणावयाचे पलीकडे हेतु असेलसें संभवत नाहीं. शत्रूच्या रयतेस न लुटतां त्यास सामदामानें आपलेसें करण्याइतकी मराठ्यांची सत्ता या वेळीं सुरू नव्हती व ती असणेंही शक्य नव्हतें. असें जरी होतें तरी देखील चौथ सरदेशमुखी वगैरे हक्क मान्य करणाऱ्यांशीं त्यांचें वर्तन पाहूं गेलें असतां लुटारूपणाचें नसून तें उलट प्रजापालकाचेंच असल्याचें जर इतिहासांतरीं स्पष्ट दिसून येतें तर येवढ्यावरून त्यांच्या राज्याची एकदा घडी बसती व सर्वत्र

शांतता पसरती म्हणजे शत्रूंच्या प्रजाजनांस देखील मराठ्यांचा विश्वास येता. व ते आपणहून त्यांचे हक्क कबूल करिते; असें होत नाहीं काय? परंतु या वेळीं देवदैत्यांप्रमाणें हिंदु यवनांत भांडण लागलेलें त्यांत जरी थोरल्या शिवाजी महाराजांनीं मराठ्यांची रायगडीं गादी स्थापिली होती व राजारामानीं ती जिंजीहून साताऱ्यास आणून पुनः स्थापित केली तरी मराठ्यांची खरोखरी स्थिति राज्य संस्थापनाच्या पूर्वींची होती असें म्हणावें लागतें. या वेळीं मराठे जर औरंगझेबाचे मुलुखांतील खेडीं न लुटते, शेतें उध्वस्त न करिते व गांवें न जाळिते तर ते उलट बादशाही सैन्यास आपल्या विरुद्ध त्यांस मोठ्या निकरानें लढतां यावें म्हणून आपण होऊनच उलट मदत करिते असें होतें. ते जर तीं बादशाही खेडीं न लुटते तर त्याच पैशावर बादशाही सैन्य दिवसेंदिवस वाढलें गेलें असतें, मराठ्यांनीं शेतें जर उध्वस्त केलीं नसतीं तर मोंगली सैन्यास जास्त अन्नसामुग्री मिळून मराठ्यांशीं जास्त दिवस टिकाव धरवता, व ते घरें गांवें न जाळते तर शत्रूंच्या शिपायांस राहण्याकरितां व पावसापाण्यापासून त्यांचा बचाव करण्याकरितां आयत्याच सोयी करून दिल्यासारखें झालें असतें. परंतु तो काल धर्मयुद्धाचा नव्हता. अथवा त्या वेळीं धर्मराजाचें साम्राजही नव्हतें. या वेळीं कृतद्वापार जाऊन कलियुगाच्या प्रथम पादास केव्हांच आरंभ होऊन चुकला होता. लुटारू या शब्दाचा अर्थ शत्रूंची रसद, दाणापाणी मारून त्यांची हरएक तऱ्हेनें गैरसोय करून टाकणारे एवढाच घ्यावयाचा असेल तर मग मराठे लुटारू होते खरे! परंतु शिवाजी महाराजांनीं स्थापिलेल्या गादीचे, व हिंदुधर्माचे, संरक्षणाकडे मराठे मंडळींचें लक्ष्य पूर्ण लागलेलें शत्रूस जेरीस आणण्याकरितां लूट हें एक साधन होतें. व त्याचा त्यांनीं उपयोग केला यावरून ते लुटारू कसे होतात? यावेळीं मराठे जर आपलें वर्तन असें न ठेवते तर औरंगझेब इतका जेरीस कधींच न येता, व राजारामाचा मृत्यु व औरंगझेबाचा मृत्यु या दोहींच्या मध्यंतरीय कालांत मराठ्यांच्या व मोंगलांच्या ज्या ज्या चकमकी झडल्या त्यांत मराठ्यांस यश न येतें! पण या प्रसंगीं मराठ्यांची चढती कला असल्याबद्दल जर मिल्लसारखे एकतर्फी इतिहासकार देखील कबूल करीत आहेत तर तत्कालीन मराठ्यांस आपली ही चढती कला करण्यास ज्या साधनांचा उपयोग करावा लागला

असेल त्या साधनांच्या योग्यायोग्यतेच्या संबंधानें शहानिशा होणें अगदीं जरूर आहे. व म्हणूनच मराठ्यांस एकदम लुटारू म्हणणें जितकें अविचाराचें आहे तितकेंच ते लुटारू नव्हते असें एकदम प्रतिपादन करणें फार घाईचें व उतावीळपणाचें होऊं शकेल. एका हातांत कुराण व दुसऱ्या हातांत तरवार घेऊन सर्व हिंदुस्थानभर जेव्हां मोंगल लोक एकसारखे धुडगूस घालीत चालले होते; व हिंदूंच्या देवळांत गोमयाच्या सड्या ऐवजी गोमांसाच्या रक्तामासांचे जेव्हां सडे पडूं लागले, अगदीं एकांतवासांत कालक्रमण करणाऱ्या निरपराधी साधूसंतांवरही जेव्हां मोंगली समशेरी पडूं लागल्या तेव्हां अर्थातच तो काल शांततेनें कांहीं करण्यास किती अनुकूल होता हें उघडच दिसतें! त्या वेळीं शांतादेवीची आराधना करून नंतर मग प्रतिक्रियेस सुरुवात करणें म्हणजे सर्व घर जळून खाक झाल्यावर मग तें विझविण्याकरितां तयारीस लागण्यासारखेंच होय. हा काळ हमरीतुमरीचाच होता. त्यावेळीं चकमकी झडल्याच पाहिजे होत्या, असें कोणाही विचारी इतिहासज्ञास कबूल करणें भाग आहे. यावेळीं मराठ्यांनीं आपलें वर्तन ज्या धोरणावर ठेवलें त्या धोरणावर जर ते न ठेवते तर त्यांचेकडून पुढें मराठी राज्याचें संस्थापन होतें किंवा नाहीं याची शंकाच आहे. औरंगझेब भागानगरशाही व विजापूरशाही न मोडतां त्यांस आपल्याच कह्यांत वागवून जर मराठ्यांवर जोर करता तर कदाचित् मराठ्यांचें डोकें वर निघण्यास फार मारामार पडती, किंबहुना तें निघालेंही नसतें. जशजशीं कारणें घडून येतात तसतशीं कार्येंही घडून यावयाचीं. हें व्यवहारिक तत्व ऐतिहासिक गोष्टींसही पूर्णपणें लागूं पडतें. लुटारूपणाची जर योग्य मीमांसा करूं गेलें तर प्रत्येक राज्य संस्थापकास प्रथमतः लुटारूपणाचाच आश्रय करावा लागला असल्याचें दिसून येईल. औरंगझेब जी दिल्लीपद पादशाही करीत होता तिचा मूळ संस्थापक जो तैमूरलिंग त्यास आपली गादी स्थापण्यास किती अनन्वित कृत्यें करावीं लागलीं याची कल्पना करणें देखील अंगावर शहारा आणण्याजोगें आहे, हें मॉरिस साहेबासारखे पक्षपाती इतिहासकार देखील कबूल करितात. तैमूरलिंगाचीं एकेक कृत्यें अशीं होतीं कीं, त्यास लुटारूच काय पण दरवडेखोर, दगलबाज, खुनी, हीं व यांहूनही जाडीं जाडीं

विशेषणें विशेष यथार्थत्वानें देतां येतीं. प्रसंगविशेषीं आपला नवीन ठिकाणीं अंमल नीट बसविण्याकरितां सुधारलेलीं राष्ट्रें देखील जर वरील मार्गांहूनही क्रूर मार्गांचें अवलंबन करितात तर मराठ्यांच्या उदयाच्या वेळचा काल, व तत्कालीन सामाजिक व राजकीय स्थिति, या सर्वांचा विचार करितां, मराठयांवर इंग्लिश-इतिहासकारांनीं स्थापिलेला लुटारूपणा राजकारस्थानीपणाच्याच एका सदरांत जाऊन बसतो हें म्हणणें केवळ पक्षपाताचेंच होईल असें वाटत नाहीं.

९. हें इतकें विषयांतर होण्याचें कारण म्हटलें म्हणजे औरंगजेबाच राज्यांत प्रजाजन त्रस्त व असंतुष्ट असण्यास बादशाही प्रदेशांतील मुलकी अंमलदारांचें स्वतःची तुंबडी भरून घेण्याच्या इच्छेनें चालू असलेलें लुटारूपणाचें वर्तन, असा जो वर उल्लेख केला तेंच होय. मोंगली राज्याच्या ऱ्हासाचीं जीं वर कारणें सांगितलीं तींच कारणें मराठ्यांस एकवटून त्यांचा उत्कर्ष होऊं देण्यास कारणीभूत झालीं. मोंगली बादशाहीच्या उच्छेदाच्या कारणांचा विचार करीत असतां आपल्यास एक महत्वाची गोष्ट दिसून येते. ती ही कीं,-कोणीही नैतिक शक्तीच्या अप्रत्यक्ष व विशेष चिरस्थायी अशा जोरदार हस्तालंबाची विलकूल फिकीर न करितां केवळ आपल्या सामर्थ्यावर व सत्तेवर सारी भिस्त ठेवून जर तदनुसारच आपला वर्तनक्रम ठेवूं लागला तर तें त्याचें करणें अत्यंत चुकीचें, अविचाराचें, अदूरदृष्टीचें व अर्थात् धोक्याचें होईल. प्रजाजनांस असंतुष्ट होऊं देऊन त्यांच्या मनांचें संक्षोभन होण्यासारखीं कृत्यें, औरंगझेबाचे हातून घडून येण्यास जेव्हां आरंभ झाला तेव्हांच अकबरानें अत्यंत परिश्रमानें दागदुजी केलेली मोंगली राष्ट्राची भव्य व टोलेजंग इमारत आपल्या अत्यंत बळकट पायांतच ढांसळूं लागली. धुंद दिशा व पवनप्रकोप हीं जशीं भावी वादळाचीं पूर्व चिन्हें होत तशींच प्रजाजनांचा असंतोष, सरकारी अंमलदारांचे ताठ्याचें वर्तन व स्वाधिकार बळाविषयीं त्यास असणारी अत्यंत घमेंडी व तदनुसार प्रजाजनांवर होत असणारा जुलूम ह्या सर्व गोष्टी भावी राज्यक्रांतीच्या प्रचंड वादळाचीं पूर्व चिन्हेंच होत. १७८९ त फ्रान्स देशांत जी एवढी राज्यक्रांती झाली व वेळोवेळीं सोळावा लुई व पहिला चार्लस यासारखी मंडळी जी प्रजाजनाच्या मनःसंक्षोभास बळी पडली त्याचीं कारणें

पाहूं गेलें असतां विशेषतः प्रजाजनांच्या असंतोषाशिवाय दुसरीं कांहीं कारणें झालेलीं नाहींत असें स्पष्ट दिसून येतें. कोणत्याही काळांतील कोणत्याही देशाच्या इतिहासाकडे नजर द्या, त्यांत प्रजाजनांच्या संतोषांत राज्याचें चिरस्थायित्व सदासर्वकाल असतें असें पूर्ण अनुभवास येईल. प्रजाजनांचा संतोष हाच राष्ट्राच्या इमारतीचा दृढ व चिरस्थायी पाया होय. अशा प्रकारच्या मजबूत पायावरील इमारत जशी टिकाव धरून राहील तशी ती तरवारीचें टेंकू देऊन राहणार नाहीं हें अगदीं उघड आहे. या सर्व गोष्टी पक्या ध्यानांत धरून आपला नामांकित पूर्वज जो अकबर त्याच्याप्रमाणें आपल्या प्रजेवर प्रेम करून, त्यांजवर विश्वास टाकून जर औरंगजेब वागता, तर त्याचें राज्य नष्ट होतेंना? मोंगली राज्याचे ऱ्हासास औरंगझेबचे अंगीं आमरणपर्यंत असणारा सार्वत्रिक अविश्वास, साहजिक तज्जन्य घडून येणाऱ्या इतर गोष्टींचा मिलाफ, व प्रजाजनसंक्षोभक धर्मोच्छेदक प्रवृत्ति, व प्रतिपक्षाकडून त्याकाळीं चालू असलेली प्रतिक्रिया, या सर्व गोष्टींचा एककालींच चालू असलेल्या शक्तींचा एक दिशेलाच होत असणारा मारा कारणीभूत झाला असें पुनः एकवार सांगून सध्यां हें प्रकरण येथेंच आटपतों.

श्री

प्रतापसिंह-चरित्र.

[श्रीमंत छत्रपति प्रतापसिंह महाराज यांस इंग्रजांनीं बाजीराव पेशव्यांच्या कैदेतून सोडवून सातान्यास आणून राज्यावर आरुढ केलें, त्याबद्दलची संक्षिप्त हकीकत 'भारतवर्षांत' प्रसिद्ध होत असलेल्या क्याप्टन ग्रांट डफ यांच्या चरित्रांत दिलीच आहे. ह्या समयीं शाहूनगरच्या लोकांस फार आनंद व्हावा हें साहजिकच आहे. त्या आनंदप्रसंगावर चिटणीस घराण्यांतील कोणी कृष्णराव रामराव चिटणीस यांणी "प्रतापसिंह-चरित्र" ह्मणून एक लहानसें काव्य लिहिलें आहे. त्याची प्रत आमचे मित्र रा. रा. बळवंतराव चिटणीस यांनीं आह्मांकडे पाठविली आहे, त्याबद्दल आह्मी त्यांचे प्रेमपुरस्सर आभार मानितों. हें काव्य अगदीं साधें असून त्यावेळचें वर्णन त्यांत ग्रंथकारानें समक्ष पाहून लिहिलें आहे एवढाच त्यांत विशेष गुण आहे. ह्यांतील बरींच अशुद्धें दुरुस्त करून हें छापलें आहे. ह्या काव्यावरून पेशव्यांच्या बंधनांतून छत्रपति मुक्त होऊन स्वतंत्र रीतीनें राज्यकारभार करूं लागल्यामुळें शाहूनगरच्या लोकांस कसा आनंद झाला व त्यावेळच्या लोकांमध्यें इंग्रज लोकांविषयीं कसा प्रेमभाव होता हें व्यक्त होण्यासारखें आहे.]

आर्या.

गजवदना मी नमितों द्वयकर जोडोनिया यथामतिनें ।
गातों प्रतापचरिता संक्षेपें मी कथा यथामतिनें ॥ १ ॥
सज्जनगडासि वस्ती केली श्रीराम-रामदासानीं ।
त्याचे गुणासि गावें सकळांही रामदास-दासांनीं ॥ २ ॥

श्लोक.

राया छत्रपति प्रतापसिंहचरिता साकल्य सांगो असी ।
नाहीं बुद्धि तथापि अल्पमतीनें सांगे सुचे जे तसी ।
यावें त्या अवधान सावध मना ठेवोनि अत्यादरें ।
त्याला मान्य करोनि राजवंशज प्रभू रक्षील अत्यादरें ॥ १ ॥

आर्या.

नमितों श्रीगुरुचरणा भावें तैसाचि राजचरणांसी ।
गातों गुणासि आदरें जड जिव्हें प्रभुनाथचरणांसी ॥ ३ ॥

राया शिवछत्रपती यांच्या वंशीं प्रतापसिंह राजसुत ।
होउनि, कीर्तिध्वजातें उभवितसे जेंवि पंडुराजसुत ॥ ४ ॥

देवीवरप्रसादें झाला शिवराव मालुचे वंशीं ।
जैसा दैत्य वधाया अवतरला हृषिकेशि यादवावंशीं ॥ ५ ॥

श्लोक.

झाला हा अवतार ईश्वर दुजा वंशीं असा हिंदुच्या ।
म्लेंच्छा मारुनि स्थापिलें निजबळें धर्मासि या हिंदुच्या ।
त्याचे वंशज जाहले अति बळी नामें बरीं ऐकिजे ।
संभाजीसुत शाहुराज विजयी विख्यात तो जाणिजे ॥ २ ॥

राजा-राम अराम काम सकळा पूर्वील ऐसा प्रभु ।
झाला त्या उदरांत जाणहि तसा विख्यात तोही विभु ।
दुर्गीं वास करोनि राज्य अवघें नामेंच त्या राखिलें ।
गाई ब्राह्मग तोषवोनि सकळीं प्रेमासि संपादिलें ॥ ३ ॥

त्याचा शाहु दुजा नृप महा औदार्य-गांभीर्य तो ।
त्यापासाव प्रतापसिंह नृपती वंशीं ध्वजा लावितो ।
त्याचे कीर्तिस ऐकतां बहु मना संतोष वाटेल तो ।
लक्ष्मीनाथ कृपा करोनि सदयें दीनासि पावेल तो ॥ ४ ॥

सातारा दुर्ग मोठा रचित बहु तटा बस्तिचें स्थान तेथें ।
केलें शाहू नृपानें बहुतचि बरवें मंदिरालागिं तेथें ।
सेवे सेवाधिकारी सकळहि असती राजया सन्निधानीं ।
ऐशी लक्ष्मी विलासे सकळ सुख वसे मुख्य ते राजधानी ॥ ५ ॥

राज्यभार सकळही प्रधानहातें ।
होतसे सततही न राजहातें ।
यापरी लोटले दिनवत्सर कांहीं ।
योग येत उत्तम दिसां मग कांहीं ॥ ६ ॥

बाजीराव प्रधान राज्य सकळी नानापरी राखितो ।
त्याचे संनिध पाठवी वकिलही ताम्राधिकारीय तो ।
त्याणें राहुनि आत्मबुद्धिबळ तें प्रेरोनि नानापरीं ।
बुद्धीनाश करोनि राज्यहरणा युक्ती बहूता करीं ॥ ७ ॥

यात्रेलागीं प्रधान पंढरपुरा गेला विठ्ठदर्शना ।
तेथें अद्भुत जाहलें बिघडलें वीकल्प आला मना ।
गंगाधर नाम उत्तम तया शास्त्र्यासि मृत्यूपथा ।
धाडी त्रिंबक हूजन्या न कळतां श्रीराउळीच्या पथा ॥ ८ ॥

दाहा पांच मिळोन धांवुनि अले मार्गीं तया गांठुनी ।
केला त्यासि पुराच त्या अवसरीं शस्त्रें बळें मारुनी ।
तेव्हां पासनि माजला कलि बहू ताम्रप्रधानामधीं ।
आतां दारुण युद्ध होईल अशी वार्ता उठे सन्निधीं ॥ ९ ॥

पुनरपि मग आले पुण्यग्रामीं त्वरेनें ।
मिळविति मग सारे सैनिकांतें त्वरेनें ।
मसलत मग केली युद्ध द्यावें तयासी ।
सकळ उदित झाले ताम्र मारावयासी ॥ १० ॥

ठेवोनि सैन्य मग नूतन तेचि काळीं ।
प्रार्थीयली त्वरित माउलि भद्रकाळीं ।
हल्ला करोनि वकिलावरि सैनिकांनीं ।
काढीयले पिटुनि बाहिर जात रानीं ॥ ११ ॥

त्याहीवरी होउन युद्ध भारी ।
पाठी दिली त्यास प्रधान भारी ।
झाले त्वरें संगम माहुलीसी ।
श्री राजया दर्शन घ्यावयासी ॥ १२ ॥

सातारिया धाडुनि सैन्य थोडें ।
गजादि दासादिक जाण घोडे ।
विज्ञप्तिपत्र लिहिलें मृदु राजयासी ।
द्यावें कृपें सदय होउन दर्शनासी ॥ १३ ॥

आर्या.

पाहुनि प्रधानपत्रा निघतां झाला सबंधु राजश्री ।
तेव्हां गमलें नगरा कीं जाते मूर्तिमंत राजश्री ॥ ६ ॥

गजरें आनंदानें आले संगम कृष्णेसि दर्शना निकटीं ।
आला प्रधान सत्वर स्वारी पाहून दर्शना निकटीं ॥ ७ ॥

वंदुन रायापाया सांगे विस्तार सकळ झाला तो ।
असतां दासचि भावें ताम्रयवन सबळ शत्रु झाला तो ॥ ८ ॥

उदय दिशेसी असती ताम्रयवन ते बळेंचि बळकटक ।
येतां यम दिशेसी राज्य हराया बळ करोनिया कटक ॥ ९ ॥

यास्तव स्वामीवर्या चालावें त्वरित सकळ सैन्य घेउनियां ।
असतां स्वामिशिरावर पामर ते लुटुन येउं यश घेउनियां ॥ १० ॥

यापरि विनवुन राया सकल कलत्र ठेवुनि वासुव्यावरती ।
निघते झाले गजरें सेनेसह ताम्रयवन पामरावरती ॥ ११ ॥

फिरती देश विदेशीं यवनासी युद्ध द्यावयालागीं ।
तेही फिरती मागें मागें लागोन राज्य घ्यावया लागीं ॥ १२ ॥

तेव्हां दोहिं दळांची पडतां गांठी रणीं बहू निकरें ।
यंत्रें उडताति शिरें बहु वीरांचीं उडोनि जात करें ॥ १३ ॥

यंत्रें बहु दारूचीं वर्षति शत्रुदळावरी भारी ।
अश्वपदातिसहितें, येती मग तुरंग अग्निचे भारी ॥ १४ ॥

ऐसें पाहुन तेव्हां निघती सेनेसहीत पुढती ते ।
ताम्रही येती मागें गांठिति धावोन सैन्य पुढती तें ॥ १५ ॥

हिंदुस्थानी चाल.

चलता राजा हुवा स्वार । बांधो पाचो हतियार ।
सिधे हातनमो तरवार । झला झलक चमकते ॥ १ ॥

दोनो भाई पिछे सांथ । तिजी म्याने बैठे मात ।
चलत सबही सांथ सांथ । सबी फौज जमादरें ॥ २ ॥

अंगरेज आया दौड । सबही सात तुंडमुंड ।
तुरुक स्वारनकी झुंड । पाईं बेगनके ॥ ३ ॥
बाजीराय छुटा संग । दौडत जावें निःसंग ।
पाया जलदी श्रीगंग- । पार उतर जायके ॥ ४ ॥

पाछो हुवे सबही धुंद । दौडत आये तुंद तुंद ।
जैसा बरसे मेहबुंद । वैसे जोर जोरसे ॥ ५ ॥

राजा पीछे देखे डोल । नजिक पाया अलिगोल ।
उसी देर बोलत बोल । अपने छोटे भाईकूं ॥ ६ ॥

दील करके बडो धीट । माताजिकूं बांधो पीट ।
सहन करो अश्व झीट । चलो अबी दौडके ॥ ७ ॥

जैसा हुकूम वैसी बात । मातार्जीको दियो हात ।
पीट बांध दौड जात । कोई फौज साथसें ॥ ८ ॥

जमात सबही तुरुक स्वार । और पायनको भार ।
चमकत सबही तरवार । अये आगे राजके ॥ ९ ॥

चारो बाजुनकुं फौज । बिच राजाजीका पुंज ।
अबी करना कहां झुंज । तनक जमेत अपनी ॥ १० ॥

श्लोक.

ऐसें समजुनियां मनीं मग त्वरें अश्वांसि आटोपिले ।
उरले जे पळतां तयांसहि तईं तेथें उभे ठेविलें ।
आतां होइल जें तयासि बरवें मानोनिया बोलती ।
बापा स्वस्थ असें ह्मणोन मग ते माता तया बोलती ॥ १४ ॥

आर्या.

नेटें खंडू शिंदा धांवे उपसोनि शीघ्र तरवार ।
नाटोपेच कदापी राजा पाहोन शीघ्र तरवार ॥ १६ ॥
जाउं नको फिर मागें रागें बोलोनि त्यासि फिरवीला ।
शौर्योन्माद तयाचा रायें अवरोनि त्यासि हटवीला ॥ १७ ॥

श्लोक.

छत्रें चामरयुक्त जाण मग ते केलें उभे त्या स्थळीं ।
मल्लारीसुत बळवंत नाम करुनी चिटणीस यांचे कुळीं ।
त्याला पाठविती पुढें सकळही सांगावया वृत्त तें ।
जातां होय अति त्वरें करुनियां सोडोनि सर्वां तिथें ॥ १८ ॥

ताम्राचा सेनाधिकारी सकळ बळयुता त्याचिये संनिधानीं ।
जावोनीया तयानें कथिलि सविस्तर तया पूर्विची राजधानीं ।
आतांयावें मिळावें सकळहि मानच सर्व सोडोन द्यावें ।
तुह्मां आह्मां नसावें द्वैत अवघें हेंचि देण्यासि यावें ॥ १६ ॥

घेती वदोन मग सत्यचि राजियासी ।
ठेवोनि शस्त्र अवघीं मग राजियासी ।
सांगा ह्मणे त्वरित जाउन शीघ्र आतां ।
शस्त्रांसि द्या आणुनि जाउनि शीघ्र आतां ॥ १७ ॥

आज्ञा मान्य करोनि सूज्ञवर तो बळवंत येवोनियां ।
सांगे सार विचार फार बरवा रायासि वंदूनियां ।
शस्त्रें सर्व अणोन देत मग तो संनीध ताम्राचिया ।
आतां सत्वर भेटि ध्या ह्मणतसे चालोनियां राजिया ॥ १८ ॥

शस्त्रें घेउनि ठेवुनी सकळही भेटीस आले तई ।
टोपी काढुन वंदिती अति त्वरें रायासि ते सर्वही ।
प्रेमें स्वागत दाविती उभयतां संतोष मानोनियां ।
राहावें ह्मणती समीप आमुच्या बंधुत्व मानोनियां ॥ १९ ॥

आर्या.

पडतां प्रसंग ऐसा तत्समयीं राजया निकट कटकीं ।
असतीं त्याचीं नामें ऐकावीं सांगतों सकट कटकीं ॥ १८ ॥

चिटणीस पुत्र दोवे नामें यशवंत आणि बळवंत ।
करिती सर्वहि कामें होउनियां यशवंत बळवंत ॥ १९ ॥

आणिति हालीं शिबिका घोडीं उष्ट्रादि भार शिबिराचा ।
देउनि स्थानासि करिती उत्तम शोभित फार शिबिराचा ॥ २० ॥

पितृव्य पुत्र आला नामें बळवंत चतुरसिंहसुत ।
नमिलें राया तेव्हां भासतसे जेंवि चतुर सिंहसुत ॥ २१ ॥

आले जमले सारे सेवकजन धावुनी तया स्थानीं ।
पुरवी ताम्र तयांसी देऊनियां द्रव्य तया स्थानीं ॥ २२ ॥

दुसरे दिनीं निघाले दोन्हीं सैन्यें करोनियां निकट ।
येती मार्ग क्रमोनी राहति ग्रामा करोनियां निकट ॥ २३ ॥

जेजुरिपर्वतशिखरीं नांदे मल्लारि ह्माळसाकांत ।
येउनि ते त्या स्थानीं राहुनियां पुजिति ह्माळसाकांत ॥ २४ ॥

अलपिस्तन मुख्य असे ताम्राचा श्रेष्ठ राज्य-अधिकारी ।
आला राजसभेसी भेटाया शिवराजराज्यअधिकारी ॥ २५ ॥

होउनि सख्याचि दोघां पुसती अवघें परस्परें कुशळ ।
राया छत्रपति तूं नांदे अपुले स्वराज्यि जाऊनि कुशळ ॥ २६ ॥

तुमचे जे कां असती सेवकजन आप्तलोक सकळांनीं ।
आज्ञेमाजि असावें नच चुकवावें समस्त सकळांनीं ॥ २७ ॥

ऐसें राया बोलुन ठेवुनि ग्रांटासि जाय साहेब तो ।
बंदोबस्तासि सकळही राखितसे नीट ग्रांट साहेब तो ॥ २८ ॥

परंतु न सह सेनेसी येती दुर्गासि व्याघ्रगडसमिप ।
तेथें राजकलत्रें असतीं त्यांना अणावया समिप ॥ २९ ॥

दुर्गावरतीं हल्ला करितां मग एकदांचि सकळांनीं ।
रायासि शरण आले मग ते जोडोन हात सकळांनीं ॥ ३० ॥

सह द्रव्यें सकुटुंबें घेउनियां एकदांचि ते आले ।
झाला आनंद मनासी पाहुनियां सर्व भेटले आले ॥ ३१ ॥

मोठ्या गजरें आणिती शिबिके वाहोनि राणियां सकळां ।
बहुताचे सुदीन मानुनी होता झाला अनंद मग सकळां ॥ ३२ ॥

श्लोक.

शृंगारिले सदन मंदिर राजवाडे ।
गाती समस्त जन ते पाहिले पवाडे ।
नारी उभ्या असति घेउनि अक्षवाणें ।
ओंवाळिती सगुण सुंदर राजनाणें ॥ २० ॥

दुकानें बाजारीं दिसलिं अवघीं रंगित बरीं ।
गुढ्या शृंगारिल्या सकळ सदनीं शाहुनगरीं ।
अशा आनंदानें नगर अवघें रम्यचि दिसे ।
जसें इंद्राचें तें भुवन दुसरें वाटत असे ॥ २१ ॥

शिर्के, महाडिक, मोहिते गुजरही स्वज्ञातिचे भोंसले ।
शिंदे यादव जाधवादिक असे रायासमीपें आले ।
भक्तीनें समयास येउन जयीं रायासि हो वंदिले ।
त्यां त्यां देउनि मानपान सकळां अत्यादरें रक्षिलें ॥ २२ ॥

जे जे भेटिस पातले नगरिंचे त्या त्यासि सन्मानुनी ।
वस्त्रें भूषण देत त्यांप्रति प्रभू आश्रीत हे जाणुनी ।
राजा स्वगृहिं पातला, नगरिला आनंद तो जाहला ।
गाती भाट अनेक बंदिजन ते राजा भला हो भला ॥ २३ ॥

घनाक्षरी.

राजद्वारीं घनदाट । सभा बैसलीसे थाट ।
मोठ मोठे ते जुनाट । वीर येउनी बैसले ॥

हातीं तरवार फिरंग । ढाला कटारीचे रंग ।
नानाप्रकारीं सुरंग । घेती वस्त्र चांगलें ॥
अष्टप्रधान फडणीस । चिटणीस सुरनीस ।
डबीर आणि वाकनीस । सभेमाजि ते आले ॥
मध्यें उंच सिंहासन । तेथें राजाजी बैसोन ।
दोहीं भागीं दोघेजण । दिव्य बंधु शोभले ॥ १ ॥

देवोनियां विडापान । केलें सभाविसर्जन ।
अंतर्गृहांत भोजन । करावया चालिले ॥
कर्दळीपात्रें विस्तारून । ताटें ठेविलीं वाढून ।
भात वरण ऊनऊन । लवण शाखेसी वाढिलें ॥
आंबे निंबू मायनमूळ । वंश कोंब कंदमूळ ।
सालफळ आणि जांबूळ । द्राक्ष आणि तें आलें ॥
पपड सांडगे मेतकूट । कोशिंबिरी बोरकूट ।
आंबियाचें आंब्रकूट । आणि रायआंवळे ॥ २ ॥

शेंगा वांगीं केळफूल । काल केळें कांचनफूल ।
भेंड्या तुरई तोंडूल । कृष्ण श्वेत भोंपळे ॥
शेवगाशेंग आणि वाल । कोंकणिचे कडूवाल ।
शेंडवेल मुनीफूल । कटू श्वेत कारलें ॥
पोकळा मेथी चाकवत । भाज्या अनेक शोभत ।
नानाप्रकार वाढीत । पात्रीं वेगवेगळे ॥
वड्या आणि सुरणमूळ । मठ आणि देठमूळ ।
याहीवरी जे अनकूळ । ते ते पदार्थ चांगले ॥ ३ ॥

खाज्या करंज्या आणि घीवर । अनारसे परीकर ।
बुंदी घालोनि साखर । लाडू फार गोजिरे ॥
पोळी क्षिरी नानाप्रकार । वाढितातीं हारोहार ।
कढी सांबारें सार । द्रोणामाजीं साजिरें ॥
साखरभात वडेभात । पीतवर्ण केशरीभात ।
शुभ्रवर्ण श्वेतभात । कनकाचळ दुसरें ॥
दुग्ध दधी उष्ण घृत । जेवणार होती तृप्त ।
आणीक तें नवनीत । ज्यासी ज्यासि जें प्रियकर ॥ ४ ॥

श्लोक.

ऐसें भोजन झालियावरि विडे देती त्रयोदशगुणी ।
आले गायक भाट बंदिजन ते गाती गितें सद्गुणी ।
जें जें इच्छित ज्यासि त्यासि मग तो राजा स्वयें देतसे ।
सर्वांसीं मग स्वगृहा प्रति सुखें आज्ञा प्रभू देतसे ॥ २६ ॥
ऐसा उत्सव जाहला स्वनगरीं रायाचिये मंदिरीं ।
गातां गर्जती सर्वही जन मनीं आनंदली ते पुरी ।
रायानें स्वबळें पराक्रम असा सद्बुद्धिनें दाविला ।
ताम्रा साह्य करोनि घेउनि स्वयें राज्यासि साधी भला ॥ २७ ॥

साकी, हिंदुस्तानी चाल.

ग्रांटसाहेब बडो थूर । सब राजनमो मशहूर ।
उसे राजा प्रताप चतुर । मिलाय लिया अपनमें ॥ ११ ॥
चार बरस उसके साथ । बहुत मिठी बोलत बात ।
हा मनजा नोक बहुभात । सबहि राजराजकी ॥ १२ ॥
जैसी बात कहत ग्रांट । वैसा दिलमो करत साट ।
राजकारन सबही वाट । लाई ध्यान आपने ॥ १३ ॥
दोन दील करके पाख । मुलूख कमाय तीस लाख ।
साहेब पास बडी साख । प्रतापसिंग राजकी ॥ १४ ॥
अमलदस्त सबहि राज । करता हुवा महाराज ।
दौलतका कियो काज । जमाव करके अपना ॥ १५ ॥
चारो प्रधान चिटणीस । फड के उपर फडणवीस ।
पोतनीस जमेनीस । वाकनीस जामदार ॥ १६ ॥
सबही मिलाय कामगार । वांकु करदियो पगार ।
शिपाई लोक जमादार । पाय लोक सबही कूं ॥ १७ ॥
खुसी किया सेवक लोक । दिये पोशाख बडे झोक ।
सब राजनमो नही शोक । नारी नरही बालकूं ॥ १८ ॥
बडो मंदिर गुलजार । नया बनाय रंगदार ।
दोही तर्फोंकूं बाजार । भरा भरपूर दीनकूं ॥ १९ ॥

श्लोक.

दोहीं बाजू दुकानें जडित दगडीं उंच दैदिप्यमानें ।
साधोनी चौक सारे फडकतीं भगवीं मध्यभागीं निशाणें ।
नाना वस्तू विपुल भरल्या गृहगृहिं अवघ्या वस्त्र द्रव्यादि धान्यें ।
कांहीं ऊणें नसेची नगरजन सुखी राजया गाति गाणें ॥ २८ ॥
चाटी आणि सराफ फार उदमी नाना दिशेचे आले ।
हिंदुस्थान तुरान आरब महा कारागिरे ते आले ।
वस्तीला नगरीं सुखप्रद अशी नाहीं दुजी वाटली ।
याळागीं प्रभु आश्रयें करुनियां तेथें वसों लागली ॥ २९ ॥

प्रजा पाळिली सर्व सूखी जयानें ।
दरिद्रा दुरी टाकिलें जयानें ।
असा हा प्रभूराज तो सौख्यदाता ।
प्रजा वाढवी जेंवि का दंति दंता ॥ ३० ॥

---

(२) सरकार दामानतकोट ह्यातील परगण्यांची नावे:--१ लोहो-आगरे. २ मंडान. ३ गरधित. ४ गजनी. ५ गोबक. ६ पनसेर. ७ खबरू. ८ बहिरामाबाद. ९ बिकरापूर. १० पिसावर.

(३) सरकार बहिरामातील परगण्यांची नावे:–१ माजूर. २ लेग-मात. ३ माजूर. ४ जापसरा. ५ संगनपहाड. ६ मदनात. ७ बागीकाले. ८ ज्यायेस अपदाम. ९ लष्करपूर. १० इसलामपूर. ११ बकारा.

ह्याची लांबी १५० कोस व रुंदी १२० कोस.

(९) **बहार ऊर्फ पाटणा.** ह्यात सरकारे ७ होती त्यांची नावे:–१ सरकार हवेली पाटणा. २ तिरहत. ३ आदिपूर. ४ शहापूर. ५ राहुतान. ६ सुदरनपूर. ७ मुंगेर. (मोंगीर.)

ह्याची लांबी १२० व रुंदी १०० कोस. ह्यात नद्या गंडकी, शरयू, कर्मनाशा वगैरे.

(१०) **गुजराथ ऊर्फ अहमदाबाद.** ह्या सुभ्यात सरकारे १० होती. पैकी नवाची नावे दिली आहेत ती अशी:–१ सरकार हवेली अहमदाबाद. २ पितानपट्टण. ३ इसलामाबाद ऊर्फ बडोदा. ४ जो [नो] रगच. ५ इस-लामाबाद. ६ चापानेर. ७ सोरट. ८ सुरत. ९ बडोदा[१].

ह्या सुभ्याची लांबी ३०० व रुंदी २६० होती.

(११) **उज्जन ऊर्फ माळवा ऊर्फ फतियाबाद.** ह्या सुभ्यात सर-कारे ११ त्यांची नावे:–१ सरकार हवेली उज्जन. २ चंदेर. ३ सगरपूर. [सारंगपूर?] ४ शहाबाद. ५ अलमगीरपूर. ६ खरगोण. ७ गतार किंवा गागर? ८ मंदोसर ९ हंडिया. १० कांबरी किंवा कांबेरी [कुंभेरी?] ११ पोनज दिनागड.

ह्याची लांबी ४९० व रुंदी ४८०.

ह्याच्या सीमा:–पूर्वेस मांडवगड, दक्षिणेस बागलाण, पश्चिमेस गुजराथ व उत्तरेस अजमीर अशा होत्या.

(१२) **बंगाला ऊर्फ ढाका, १३ उडीसा ऊर्फ जगन्नाथ, १४ काश्मीर,** १५ **ठट्टा** ह्यांची माहिती दिली नाहीं. १६ ह्याचे नावच कोठे सापडत नाहीं.

कृ. वि. आचार्य कालगावकर.

---

१ (ह्या नावात काही चूक दिसते. कारण बडोद्याचे नाव दोन वेळ आले आहे. व बडोद्याचे बितनाव जे इसलामाबाद तेहीं पुन्हा स्वतंत्र आले आहे.)

टीप –ह्यातील लेखनपद्धति लेखकाच्या मताप्रमाणे आहे.